
आज धनत्रयोदशी



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# अर्जुनराव खोतकर यांचा विजय आणि विकासरथ कोणीच रोखू शकणार नाही
# बुथप्रमुख, शिवदूत, गटप्रमुख, व प्रमुख पदाधिकारी मेळाव्यात विश्वास व्यक्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. अर्जुनराव पंडितराव खोतकर यांचा विकासरथ आणि विजय कोणीच रोखू शकत नाही असा दुर्दम्य विश्वास बूथ प्रमुख, शिवदूत गटप्रमुख, आणि प्रमुख पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण मेळाव्यातून व्यक्त करण्यात आला.

दर्शना बंगला भाग्यनगर येथे आयोजित या मेळाव्यास साडेतीनशे बूथप्रमुख, चारशेवर शिवदुत , तीनशे गटप्रमुखासह महत्वाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यात प्रचार कसा करायचा, मतदान कसे करून घ्यायचे, मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी सर्व समाजघटकांसाठी घेतलेले निर्णय लोकांना कोणत्या पद्धतीने सांगायचे, तसेच माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पदावर नसतानाही मतदारसंघात कोट्यावधी रुपयांची कामे सुरू केली आहे. त्याबाबत माहिती द्यायची. लाडकी बहीण योजना, मेडिकल कॉलेज, पाणीपुरवठा योजना, एक रुपयात शेतकरी पिक विमा योजना, महिलांच्या अनेक योजना, अशा शहर व ग्रामीण भागात राबवलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. जनतेची सेवा, सुरक्षा आणि विकास या आधारावर विकासपुरुष अर्जुनराव खोतकर यांच्या पाठीशी जनमत तयार झाले आहे. फेकाफेकी,उर्मट भाषेचा वापर आणि नुसतीच शेरोशायरी करणाऱ्यांना जनतेने ओळखले असून अर्जुनराव खोतकर यांचा विकासरथ आणि विजयरथ कोणीच रोखू शकणार नाही असा दुर्दम्य विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.





या मेळाव्यास अर्जुनराव खोतकर, पंडितराव भुतेकर, अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे ,कालींदाताई ढगे, भास्करराव मगरे, विष्णू पाचफुले ,आत्मानंद भक्त, श्रीकांत पांगारकर, महेश दुसाने ,विजाताई चौधरी, फिरोज आला तांबोळी, आदींनी देखील मार्गदर्शन केले . यावेळी डॉ.सुयोग कुलकर्णी, गणेश सुपारकर, संतोष मोहिते, दिनेश भगत, योगेश रत्नपारखे ,अमोल ठाकूर, सविता किवंडे, दिनेश भगत, योगेश रत्नपारखे, अमोल ठाकूर, अजय कदम, गणेश मोहिते,दीपक वैद्य, किरण शिरसाठ, शुभम टेकाळे, अंकुश पाचफुले ,जफर खान ,उज्वलाताई फोपलीया, लक्ष्मण आप्पा अवघड, गोपी किशन गोगडे,निखिल पगारे ,किशोर पांगारकर, श्रीकांत पांगारकर ,संतोष जांगडे ,राजू माधववाले, रमेश टेकूर ,संताजी वाघमारे, विशाल बनकर, संजू गायकवाड, राम सत्कार, महेश दुसाने, प्रताप वर्मा ,काशिनाथ मगरे ,नरेश खुदभैय, लक्ष्मण लखन कणसे,मनोज लाखोले ,जगदीश रत्नपारखे, कांतराव रांजणकर, भोला कांबळे, फिटर खंदारे, संजय डुकरे, गणपत धोत्रे, सुशील भावसार ,सागर पाटील, कृष्णा मुळे, शिवसिंग तिलवारवाले, गोविंद सोनवणे ,शिवाजी लाड, भगवानराव अंभोरे ,सचिन देशमुख, बाळासाहेब जाधव राहुल गवारे, रवींद्र ढगे, ब्रह्मा वाघ ,सुधाकर वाडेकर, काशिनाथ जाधव, बंडू राजे ,आप्पा उगले ,आप्पासाहेब घोडके, कडूबा इंदलकर, दत्ता थेटे ,पांडुरंग डोंगरे, गणेश भुतेकर ,वैजनाथ कावळे, सोपान कावळे, विश्वजीत कापसे ,महादेव वाघ, संजय वाघ ,बाबासाहेब जराड ,भाऊसाहेब गोरे, बाबा गोरे ,भागवत भोरे ,जगन चौरे ,गोविंद चौरे , नारायण तात्या ढगे ,जनार्दनराव चौधरी ,बाबा मोरे ,बाळू देवडे, प्रभाकर सुळसुळे, अशोकराव डेंगळे, लक्ष्मण राठोड , गणेश राठोड, संजय राठोड ,रमेश जाधव,कमलाकर कळकुंबे, सुखदेव कळकुंबे ,गणेश गायकवाड ,बालाजी गायकवाड ,गजानन शेजुळ, नागेश डवले, निवरती साबळे, दत्तात्रय चव्हाण, विठ्ठल टेकाळे ,संभाजीराजे जाधव, ज्ञानेश्वर जाधव विठ्ठल जाधव ,रामचंद्र फुलझाडे,संदीप शिरसागर ,गणेश म्हस्के ,उद्धवराव भुतेकर, कृष्णा दादा डोंगरे ,तुकाराम लकडे, गणेश भुतेकर,देविदास सोमधाने ,परमेश्वर गंडाळ, ज्ञानेश्वर माऊली उबाळे, संदीप उबाळे,भरत उबाळे ,मोहन वाडेकर ,सुदर्शन देवडे ,राजू पवार, उदय तात्या तनपुरे ,लक्ष्मण उंबरे, संदीप काळे ,दत्ता काळे, राम काळे ,ज्ञानेश्वर काळे, तुकाराम खर्जुले, भागवत गिराम, शाळुराम गिराम ,संजय चव्हाण ,लक्ष्मण चव्हाण ,रामदास डुकरे,निरंजन चव्हाण,भागवत काळे ,गजानन काळे, रामकिसन कांयदे ,राम झारखंडे, धनंजय बावणे ,विश्वजीत कापसे ,भरत कापसे, यांच्यासह बुथ प्रमुख शिवदूत गटप्रमुख शिवसैनिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाजतगाजत प्रवेश

विकास पुरुष अर्जुनराव खोतकर यांच्यावर विश्वास व्यक्त करीत विविध संघटनेचे,पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते वाजतगाजत शिवसेनेत प्रवेश करीत आहेत .देवमूर्ती, पवार तांडा ,प्रभाग क्रमांक तीन (मंठा चौफुली) ,या परिसरातील कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. विशेष म्हणजे कोणतीही अट न ठेवता संकटात साथ देणारा विकासपुरुष नेता म्हणून आम्ही प्रवेश करीत असल्याचे प्रवेश कार्यकर्त्यांनी सांगितले. यावेळी देवमूर्तीचे माजी उपसरपंच उत्तमराव कदम ,सुनील कदम ,विजय कदम, सोहेल शेख ,शेख मोशीन, पवार तांडा येथील अनिल पवार ज्ञानेश्वर आडे, विठ्ठल आडे, राजू पवार, परमेश्वर आडे, निलेश आडे, सतीश आ, संदीप पवार, बळीराम पवार, योगेश हाडे राजू पवार मच्छिंद्र आडे रमेश पवार गजानन पवार ज्ञानेश्वर पवार रामने शराडे प्रकाश आडे राम राठोड किशोर आडे भरत जाधव इत्यादी. मंठा चौफुली येथील बाळू बनसोडे नितीन खंदारे अजय काळे सौरभ थोरात गोपाल भुतेकर अजय डिखुळे गणेश काळे वैभव काळे गणेश लोखंडे शुभम कायदे सोनू गायकवाड वैभव सुरडकर शुभम साळवे संतोष पवार कृष्णा रोकडे आदींचा प्रवेश केलेल्या मध्ये समावेश आहे.

## मंगळवारी महारॅलीने भरणार उमेदवारी

मंगळवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी महा रॅली काढून महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव पंडितराव खोतकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार आहे .मामा चौक येथून सिंधी बाजार– फुल बाजार सराफा रोड– कादराबाद –पाणी वेस्ट –मंमादेवी– गांधी चव्हाण– शनी मंदिर मार्गे भाग्यनगर येथे महारॅली चा समारोप सभेने होईल. या महा रॅलीस पदाधिकारी बूथ प्रमुख गट प्रमुख शिवदुत यांच्यासह कार्यकर्त्यांनी व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन उमेदवार अर्जुनराव खोतकर यांच्यासह संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,महिला जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे ,शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, यांनी केले.

## संक्षिप्त

### पक्षाने निर्णय न घेतल्यास कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेऊन निर्णय घेणार – मा.आ.सुरेशकुमार जेथलिया



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

आपल्या काँग्रेस पक्षाने मला विधानसभेची उमेदवारी नाकारून जो अन्याय केलेला आहे तो येत्या दोन दिवसात दूर न झाल्यास कार्यकर्त्यांच्या भावना समजून निर्णय घेणार असे प्रतिपादन माजी आमदार सुरेश कुमार घेतल्या यांनी आयोजित पदयात्रेनंतर कार्यकर्त्यांना संबोध करताना केले. परतुर विधानसभेची जागा काँग्रेसची असतांना काँग्रेस उमेदवार सुरेशकुमार जेथलिया यांच्यावर अन्याय करीत शिवसेनेला सोडल्याने नाराज कार्यकर्त्यांनी आज भव्य पदयात्रेचे आयोजन करून बैठक घेतली या बैठकीत मार्गदर्शन करताना मा.आ.सुरेश जेथलिया म्हणाले की, दहा वर्षात सत्तेत नसताना अहोरात्र जनतेची कामे करत आलो. तरी आपली हक्काची जागा असताना या ठिकाणी शिवसेनेचा उमेदवार देण्यात आला. आपल्याला विधानसभेची उमेदवारी नाकारून काँग्रेस पक्षांनी माझ्याबरोबरच कार्यकर्त्यांवरही अन्याय केला आहे.त्यामुळे दोन दिवसात काही निर्णय झाला नाही तर आपण ४ तारखेपर्यंत मतदारांच्या कौल पाहून अपक्ष सामोरे जायचे की नाही हे निर्णय घेऊ.ही निवडणूक महत्त्वाची व प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे तुम्हीच निर्णय घ्या. असे सांगून कार्यकर्त्यांनी कुकर चिन्ह घ्या असे म्हणताच आ. जेथलिया म्हणाले की मी कुकरवर जरी निवडून आलो तरी पंजा सोडणार नाही कारण हा पंजा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारा काँग्रेस पक्षाचा आहे. मी फक्त तुमच्यासाठी लढणार असून तुम्हीच निर्णय घ्या असेही माजी आमदार सुरेश कुमार जेथलीया यांनी सांगितले. यावेळी परतूर आष्टी मंठा नेर शेवली या ठिकाणाहून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केले यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले. परतुर येथे भव्य पदयात्रेनंतर बैठकीत बोलताना युवा नेते नितीन जेथलिया म्हणाली की प्रत्येक वेळी आम्हाला संघर्ष करावा लागला. आम्ही परतुरला राहतो जालना औरंगाबाद पुणे मुंबईला राहत नाही या ठिकाणी राहून अहोरात्र जनतेची कामे करतो तरीही पक्षाकडून आम्हाला त्रास होतो व आज उमेदवारी ही नाकारली आम्ही धार्मिक व चारित्र्यसंपन्न आहोत. या निवडणुकीत टक्केवारी खाणाऱ्या लोकप्रतिनिधीला पाडायचं आहे. पक्षाने आपल्यावर अन्याय केला आहे आपल्याच पक्षातील काही काँग्रेस संपवायला निघाले आहेत मात्र काँग्रेस संपणार नाही.यावेळी बैठकीस मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### महाविकास आघाडीच्या वतीने चंद्रकांत दानवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघ १०३ सर्वत्रिक निवडणूक २०२४ विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीचे उमेदवार मा. आमदार चंद्रकांत पा.दानवे यांचा दि.२५ रोजी उमेद्वारी अर्ज दाखल करण्यात आला. उमेद्वारी अर्ज दाखल करण्यासाठी मतदार संघातील कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावर यावेळी महाविकास आघाडी तथा राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व आमदार रोहित पवार, बीडचे माजी खासदार जयसिंगराव गायकवाड, जालना लोकसभेचे खासदार डॉ कल्याणराव काळे,राजेश टोपे,राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष निसार देशमुख, बदनापूर चे उमेद्वार बबलु चौधरी, काँगेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश पा. गव्हाड, जिल्हाध्यक्षा सुरेखा लहाने, बाळासाहेब वाकुळनिकर, संजय काळबांडे, रामधन कळंबे, कुंडलिक मुह्रे, ज्ञानेश्वर शिंदे,नवनाथ दौंड, रमेश सपकाळ,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रोहित पवार, चंद्रकांत दानवे सह अनेक मान्यवरांची भाषणे झाली, त्यात रोहित पवार हे कार्यकर्त्यांना संबोधित करताना पुढे म्हणाले की, तुमच्या मतदारसंघातील अनेक प्रश्न आजही भेडसावत असून,पिण्याच्या पाण्याची समस्या,ऊस कारखान्याची समस्या,किंवा शेती सिंचनाची व्यवस्था असेल, सत्ताधाऱ्यांनी एवढे वर्षे सत्ता भोगून देखील,या कुठल्याही गोष्टीवर कायमस्वरूपी तोडगा काढला नाही.त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तुमच्या हक्काच्या माणसाला विधानसभेत पाठवण्यासाठी, कोणत्याही आमिषाला बळी न पडता, मतदान करावे व खूप मोठ्या मताधिक्याने चंद्रकांत दानवे यांना निवडून द्यावे,असे आवाहन केले.

## बदनापूर विधानसभा मतदारसंघातील निष्ठावंत शिवसैनिक संतोष सांबरे यांच्या पाठीशी एकवटले

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

दि २६ ऑगस्ट अंबड बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे प्रमुख लोकप्रतिनिधी ,पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी माजी आमदार संतोष सांबरे यांच्या निवासस्थानी ठिय्या देत होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत उभे राहावे असे आवाहन केले बदनापूर विधानसभा मतदारसंघ हा सातत्याने शिवसेनेचा बालेकिल्ला राहत आलेला आहे स्वर्गीय नारायणराव चव्हाण यांनी सलग तीन वेळा तर माजी आमदार संतोष सांबरे यांनी एक वेळा या मतदारसंघावर शिवसेनेचा झेंडा फडकवलेला आहे २०१९ च्या निवडणुकीत शिवसेना–भाजप युतीमुळे हा मतदारसंघ भाजपला सोडला त्यावेळीही येथील शिवसैनिकांनी इमाने इतबारे प्रयत्न करून नारायण कुचे यांना निवडून आणले निवडून आल्यानंतर नारायण कुचे कडून मतदारसंघातील एकाही शिवसैनिकाला न्याय मिळाला नाही सातत्याने त्यांनी शिवसैनिकांना गुंतवण्याकरताच प्रयत्न केले २०२४ च्या निवडणुकीत नारायण कुचेचा पराभव करण्याकरता सर्व शिवसैनिक सज्ज झाले असतानाच महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ही जागा सुटल्याने पुन्हा एकदा या मतदारसंघातील शिवसैनिकांचा हिरमोड झाला आणि त्यांनी संतोष सांबरे यांना या निवडणुकीत मनोज जरांगे पाटील



यांचा पाठिंबा घेऊन अपक्ष उमेदवारी भरण्याचे आवाहन केले या मतदारसंघातील शिवसैनिक अत्यंत इर्षाने पेटला असून या निवडणुकीत नारायण कुचेला पराभूत करण्याकरता प्रचंड मेहनत घेऊ आणि गावागावात जाऊन संतोष सांबरे यांचा प्रचार करून त्यांच्या विजया करता जीवाचं राण करू असल्याचे शिवसैनिकांनी यावेळी बोलून दाखवले माजी आमदार संतोष सांबरे यांनी देखील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या आग्रहाखातर ही निवडणूक लढणार असल्याचे सांगितले. यावेळी बोल–ताना माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले की बदनापूर विधानसभा मतदारसंघावर मागील वेळी अन्याय झाला आणि इथल्या कडवट निष्ठावंत शिवसैनिकांनी तो सहन करून पक्षाचा आदेश म्हणून युतीच्या उमेदवाराचा प्रचार करून निवडून आणले. राष्ट्रवादीने अतिरेकी आग्रह करून जागा सोडून घेतली जिल्ह्यात तीन मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावे एवढी ताकद त्यांची नक्कीच नाही बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकावर झालेल्या अन्यायाविरुद्ध निष्ठावंत शिवसैनिक लढा देणार आहेत निष्ठावंत शिवसैनिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या जोरावर बदनापूर विधानसभा मतदारसंघात जिद्दीने निवडणूकला सामोरे जाणारे असून या मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजयी होऊ असा विश्वास माजी आमदार संतोष सांबरे यांनी कार्यकर्त्यांना दिला. यावेळी उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे, तालुकाप्रमुख अशोक बर्डे, जिल्हा परिषद सदस्य कैलासराव चव्हाण, युवासेना विभागीय सचिव विनायक चोथे, जिल्हा परिषद सदस्य गणेश डोळस, दिनेश काकडे, शिवाजीराव मदन, ताराचंद जाधव, राजू घुसिंगे, उपतालुकाप्रमुख बंडू पागिरे, सिद्धेश्वर उबाळे, कल्याण टकले, संजय जाधव, रामेश्वर फंड, रामसिंग सोळुंके, अर्जुन ठोंबरे, भरत मदन, सिद्धूसिंह जराड, सुशीलकुमार रुपवते, गोवर्धन उगले, अंकुशराव शिंदे, लक्ष्मीकांत मालपाणी, श्रीराम कान्हेरे, किसन खंडेकर, अरुण डोळसे, विठ्ठल आदमाने, गजानन सानप, मुकुंद हुसे, सिताराम धुळे, शैलेश दिवटे, परमेश्वर म्हात्रे, केशव क्षीरसागर, रामभाऊ मसलेकर, अनिस पठाण, गणेश अंभोरे एकनाथ इंगळे गणपत गव्हाड, राजू जऱ्हाड, राहुल जराड, नंदू पुंड, रामेश्वर पारवे विजय जाधव, शाम तिकांडे, श्याम राठोड, रमेश वराडे, लक्ष्मण आढाव, बबनराव डोईफोडे, संभाजी टकले, संतोष बर्गे, सुरेश घोरपडे, सचिन पाय तोडे, प्रेमसिंग शिरे, हिंदू सिंग कोकड, संजय अंभोरे, तपन पडगने, राजू बदर, विठ्ठल बोरडे, बाबासाहेब इंगळे, राम इंगळे, शंकर फुके, रशीद पठाण, जनार्दन जाधव, गजानन पवार, रणधीर पिंपळे, सिताराम वीर, सोमनाथ मस्के, नारायण लोहकरे, शांताराम बोचरे, सुभाष मदन, कृष्णा ओवळेकर, वसीम तांबोळी, महादेव जाधव, लक्ष्मण गव्हाड, विजय जाधव, गणपत दादा भोजने, कडूबा इंगळे, सुजित पांढरे, अमोल बोरुडे, रत्नाकर लोखंडे, अशोक बोरडे, दीपक राजगिरे, रामेश्वर लोखंडे, राजू आटोळे, सतीश चव्हान, अशोक भसंडे, गोरख डोके, शाम तिकांडे, कृष्णा टोपे, बद्रीनाथ मोटकर, योगेश उबाळे, रामा दिवटे, राहुल वाघमारे, प्रल्हादराव डुबल, बाळासाहेब नारळे, हरिभाऊ नारळे, नितेश जाधव, बाबासाहेब वंजारे, साईनाथ काळे, नारायण सांगोळे, सिताराम दिवटे, लक्ष्मण गोडसे, केशर सिंग बमणावत, राहुल घुले, गोकुळ राजळवळ, यांच्यासह पदाधिकारी कार्यकते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आम्ही विकास करणारे तर विरोधक खालच्या पातळीवर जाऊन टिका टिप्पणी करणारे –मा.खा.रावसाहेब दानवे



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथे मा केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब दानवे व आ संतोष दानवे यांच्या उपस्थितीत भोकरदन तालुक्यातील जेष्ठ कार्यकर्ता सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता सदरील सन्मान सोहळ्यास भोकरदन तालुक्यातील मा खा रावसाहेब दानवे यांना १९८५ पासुन सहकार्य करणारे तथा श्री रावसाहेब दानवे यांना सरपंच ते केंद्रात मंत्री होण्यास मतदान करणारे सहकार्य करणारे भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळेस जेष्ठ कार्यकर्ता सन्मान मेळाव्यास संबोधित करताना मा खा रावसाहेब दानवे पुढे म्हणाले की मतदार संघाचा विकास हा रस्ते वीज पाणी यावर अवलंबून असून कुठलेही नेत्याने दूरदृष्टी ठेवून मतदार संघाचा विकास केला पाहिजे. मला मोदी सरकार मध्ये दहा वर्षे मंत्रीपदावर काम करण्याची संधी मिळाली असता त्या संधीचं सोनं करून मी जालना येथे देशातील पहिला ड्रायपोर्ट मंजूर करून आणला असून त्याचा फायदा उद्योजक व व्यावसायिकांप्रमाणेच शेतकरी बांधवांनाही त्यांचा शेतमाल जालन्यातून थेट विदेशामध्ये निर्यात करण्यासाठी होणार आहे. परंतु आपला शेतमाल ड्रायफूट पर्यंत पोहोचविण्यासाठी दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे हीच बाब असून आम्ही मागील दहा वर्षांमध्ये मतदारसंघातील रस्त्यांचा अनुशेष दूर करण्यासाठी सहा हजार कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे पूर्णत्वास दिली त्याचा फायदा आज होताना दिसत आहे. जालना येथे देशातील केवळ तिसरे आयसीटी कॉलेज आपण मंजूर करून आणले असून त्याचा जालना जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. काम सुरू करण्यात येणार आहे. तीन महिन्यापूर्वी झालेली लोकसभेची निवडणूक ही अनेक आघाड्यांवर अत्यंत वेगळी ठरली असून या निवडणुकीचा निकाल हा जालना लोकसभा मतदारसंघाच्या विकासाला खिळ घालणारा ठरला आहे. परंतु आता विधानसभेची निवडणूक आली असून या निवडणुकीमध्ये गाफील न राहता आमदार संतोष पाटील दानवे यांच्या नावासमोरील कमळ चिन्हाचे बटन दाबून विजयी करावे असे आवाहन माजी केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

## राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवण्यासाठी पदाधिकारी–कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे –डॉ.शर्मा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिवनावश्यक वस्तूंचे वाढलेले दर, मोठ्या प्रमाणात बोकाळ–लेली बेरोजगारी, गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण यामुळे राज्यातील महायुती सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवून आणण्यासाठी इंडिया महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेस पक्षाचे जालना लोकसभा प्रभारी माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा यांनी आज रविवारी येथे बोलतांना केले.



जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या निवडणुक प्रचाराचे नियोजन करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक आज रविवारी दुपारी आयोजीत करण्यात आली होते. या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, जालना विधानसभेचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, युवानेते अक्षय गोरंट्याल, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, कल्याणराव दळे, प्रमोद रत्नपारखे, विनयकुमार कोठारी, संजोग हिवाळे, बदर चाऊस, बाला परदेशी, माजी गटनेते गणेश राऊत, अब्दुल रऊफ परस–वाले, अब्दुल रफिक, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार, दुर्गेश काठोठीवाले, मनकर्णाताई डांगे, बाबुराव पवार, राम सावंत, दिपक भुरेवाल, दिनकर घेवंदे, किशोर मघाडे, अमेर पाशा, किशोर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना डॉ. शर्मा म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही मुळ पक्षांसह त्यांची चिन्ह बंडखोरांनी पळवून नेल्यानंतर देखील लोकसभा निवडणुकीत नविन चिन्ह असतांना या पक्षांना मिळालेले यश सर्व सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी अधोरेखीत करणारी आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत देखील इंडिया आघाडी राज्यात सत्तेत येईल असा विश्वास व्यक्त करून राज्यातील महायुती सरकारचे पाय खोलात गेल्यामुळे जाता–जाता त्यांनी लाडकी बहिन योजनेचा डाव टाकून कसाबसा बचाव करण्याचा प्रयत्न केला असला तरी राज्यातील जनता किती जागृत आहे हे लोकसभा निवडणुकीत दिसून आले असून या निवडणुकीत देखील तिच परिस्थिती कायम राहील असा ठाम विश्वास डॉ. पी. सी. शर्मा यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पुव जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, बाबुराव पवार, संजोग हिवाळे यांची समयोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद यांनी केले. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी गणेश राऊत यांनी आभार मानले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राज ठाकरेंची खेळी महाराष्ट्राच्या राजकारणाचे गणित बदलणार? मनसेचा शिवसनेकडे 10 जागांचा प्रस्ताव



मुंबई : निवडणूक आयोगाच्या घोषणेनंतर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा महासंग्राम सुरू झाला आहे. यंदाच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकाआघाडीसोबतच राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष (मनसे) देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. विधानसभा निवडणुकीत राज ठाकरेंनी 'एकला चलो'ची घोषणा केलीय. येत्या विधानसभेला 'ना युती, ना आघाड्या' म्हणत राज ठाकरेंनी स्वबळाचं रणशिंग फुंकलंय. राज ठाकरे यांनी थेट मुलाला निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. अमित ठाकरेच्यां रुपानं आणखी एक ठाकरे राजकीय आखाड्यात उतरलेत. मात्र, लोकसभेतील बिनशर्त पाठिंब्याची परतफेड करण्याची चर्चा सुरु असतानाच शिवसेना नेते सदा सरवणकर हे अमित ठाकरेंविरोधात निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. अशातच आता शिवसनेच्या मदतीने महाराष्ट्राच्या राजकारणाचे गणित बदलण्याची खेळी मनसे करणार आहे. मनसेचा शिवसेनेकडे १० जागांचा प्रस्ताव ठेवला आहे.

महायुती लोकसभेतील मनसेच्या बिनशर्त पाठिंब्याची परतफेड करण्यासाठी महायुतीने मनसेविरोधात उमेदवार देऊ नये अशी मागणी होती. असे असताना पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांना ही निवडणूक जड जाणार असल्याचे दिसत आहे. कारण, .शिवसेना नेते सदा सरवणकर दादर माहिममधून निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. मनसे नेते अमित ठाकरेंनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर, सरवणकर उद्या अर्ज दाखल करणारेत. मध्यंतरी आशीष शेलारांनी महायुतीनं परतफेड करण्यात हरकत काय असा सवाल केला होता. मात्र, सदा सरवणकर दादर माहिममधून निवडणूक लढण्यावर ठाम असल्याने अमित ठाकरें समोर निवडणूक जिंकण्याचे मोठे चॅलेंज आहे.

मनसेचा १० जांगाचा प्रस्ताव

दरम्यान, माहिम मतदार संघात निर्माण झालेला हा पेच सुटावा तसेच महत्वाच्या जागा जिंकण्यासाठी मनसेने आता थेट शिवसेनेला प्रस्ताव दिला आहे.

वरळी, शिवडी, माहिम, अंधेरी, जोगेश्वरी, दिंडोशी भांडुप, विक्रोळी, कल्याण सह एकूण दहा मतदार संघात बिनविरोध तसेच सहज विजय मिळवता येईल अशा लढती व्हाव्यात यासाठी मनसेने शिवसनेकडे प्रस्ताव दिला आहे. या दहा जांगावर उेमदवार देऊ नये तसेच उमेदवार दिला असल्यास माघार घ्यावी असा हा मनसेचे प्रस्ताव असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे.

## बारामती मतदारसंघातून अर्ज दाखल केल्यावर भावूक झाले अजित पवार



मुंबई: महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी(रींशालश्रू शश्रशलींळेप २०२४) उमेदवारांची अर्ज प्रक्रिया सुरू आहेत. त्यातच बारामती मतदारसंघातून सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. आपला अर्ज दाखल केल्यानंतर रॅलीला त्यांनी संबोधित केले. या दरम्यान अजित पवार भावूक झाले. सोबतच त्यांनी शरद पवार यांच्यावर कुटुंबात फूट पाडल्याचा आरोपही केला.

कार्यकर्त्यांशी बातचीत करताना अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत बारामती मतदार संगातून सुप्रिया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा यांना उतरवून खूप चूक केली होती. मला फक्त इतकंच म्हणायचे आहे की राजकारणाला इतक्या खालच्या पातळीवर नाही आणले पाहिजे, कारण पीढी एक होण्यास वेळ लागतो आणि कुटुंब तोडण्यास एक क्षणही पुरेसा असतो.

साहेबांनी कुटुंबात विभाजन केले

अजित पवार यावेळी बोलताना अतिशय भावूक झाले. त्यानंतर स्वत:ला सांभाळताना ते पुढे म्हणाले, साहेबांनी कुटुंबाच्या आत विभाजन केले. लोकसभेच्या वेळेस मतदार भावूक झाले होते. यावेळेस भावूक होऊ नका. कारण भावूक होण्याने समस्या सुटत नाहीत. विकासाने समस्या सुटतात. बारामतीच्या जनतेते ताईंना लोकसभेत निवडले आता दादांना आमदार म्हणून निवडले पाहिजे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने बारामती येथून अजित पवार यांच्याविरोधात युगेंद्र पवार यांना मैदानात उतरवले आहे.

## भाजपाच्या आशिर्वादाने टाटा एअरबसचे गुजरातमध्ये 'सेफ लॅंडिंग : नाना पटोले

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२८ ऑक्टोबर : भाजपा सातत्याने मुंबई व महाराष्ट्रावर अन्याय करत असून महाराष्ट्राच्या प्रगतीत मोदी शाह यांचा मोठा अडसर आहे. टाटा एअरबसचा राज्यातील प्रकल्प गुजरातला पळवून भाजपा व पंतप्रधान मोदींनी महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळले आहे. प्रकल्प व नोकऱ्या हिरावणाऱ्या महाराष्ट्रद्रोही भारतीय जनता पक्ष युतीला विधानसभा निवडणुकीत जनताच धडा शिकवेल, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

टाटा एअरबस प्रकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमध्ये उद्घाटन केले, त्याबाबत प्रतिक्रिया देताना नाना पटोले म्हणाले की, या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात २२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार होती. १० हजार रोजगार उपलब्ध होणार होते पण हा प्रकल्प महाराष्ट्रात होऊ दिला नाही.राज्यातील शिंदे, फडणवीस व अजित पवार यांचे नेतृत्व कुचकामी असल्याने मोठे प्रकल्प गुजरातला पळवले जात आहेत. केंद्रातील सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शाह यांच्या महाराष्ट्रद्रोही भूमिकेमुळे हा मोठा प्रकल्प गुजरातला पळवला. राज्यातील महाभ्रष्ट युती सरकारमुळेच महाराष्ट्राची प्रगती खुंटली असून राज्य पिछाडीवर गेले आहे. 'मोदीजी यापेक्षा मोठा प्रकल्प महाराष्ट्राला देणार' अशा थापा मात्र आता शिंदे फडणवीसांनी मारू नयेत, असेही नाना पटोले म्हणाले.

## बार्शीतील आ. राजा राऊत यांनी हाती घेतला धनुष्यबाण

### शिवसेना शिंदे गटात प्रवेश

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२८ ऑक्टोबर:

मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात आंदोलन करून चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील बार्शीतील अपक्ष आमदार राजा उर्फ राजेन्द्र राऊत यांनी आता हातात धनुष्यबाण घेतले आहे. शिवसेना शिंदे गटात त्यांनी सोमवारी प्रवेश केला. महायुतीमध्ये ही जागा शिंदे गटाच्या वाट्याला आल्याने ते आता धनुष्यबाणावर निवडणूक लढवतील, हे निश्चित झाले आहे. महाविकास आघाडीकडून या ठिकाणी ठाकरे गटाचे नेते दिलीप सोपल यांना उमेदवारी मिळाली आहे.



त्यामुळे दोन्ही शिवसेनेत लढाई होणार असून मराठा आंदोलक मनोज जरांगे- पाटील या मतदारसंघात कोणती भूमिका घेतात? ,याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे

महिन्याभरापूर्वी अपक्ष आमदार राजा राऊत यांनी जरांगे पाटील यांच्यावर आरोप करीत आंदोलन केले पुकारले होते. राज्य सरकारने आश्वासन दिल्यानंतर त्यांनी ते मागे घेतले होते. आज राजेंद्र राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. उमेदवारी देण्याचे निश्चित झाल्यानंतर त्यांनी भगवा झेंडा घेत शिवसेनेमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी त्यांच्यासह त्यांच्या काही जवळच्या साथीदारांनीही पक्षप्रवेश केला. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, माजी खासदार राहुल शेवाळे हे उपस्थित होते.

## पश्चिम रेल्वेच्या केळवे रोड स्थानकाजवळ मालगाडीचे इंजिन फेल; वाहतूक विस्कळीत!

पालघर :- पश्चिम रेल्वेच्या मुंबईकडे जाणाऱ्या मालगाडीचे केळवे रोड रेल्वे स्थानकाजवळ इंजिन फेल झाल्याने रेल्वे वाहतूक पूर्ण ठप्प झाली आहे. यामुळे मुंबईकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या गाड्यांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असून, सध्या रेल्वे २० ते २५ मिनिटे उशिराने धावत आहेत.

मुंबईकडे जाणाऱ्या मालगाडीचे केळवे रोडजवळ इंजिन अचानक फेल झाल्याने पश्चिम रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. या घटनेमुळे मुंबईकडे जाणारी वंदे भारत एक्सप्रेस देखील पालघर रेल्वे स्थानकावरचं थांबून राहिली आहे. तसेच, गुजरातवरून येणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यासुद्धा पालघर स्थानकावर थांबवण्यात आल्या आहेत.

रेल्वे अधिकाऱ्यांची तत्काळ कारवाई

या घटनेची माहिती मिळताच रेल्वे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने केळवे रोड परिसरात दाखल झाले आहेत. मालगाडीच्या फेल झालेल्या इंजिनची दुरुस्ती करण्याचं काम हाती घेण्यात आले आहे. रेल्वेच्या तांत्रिक पथकाने घटनास्थळी पोहोचून दुरुस्ती प्रक्रिया सुरु केली आहे, ज्यामुळे लवकरच वाहतूक सुरळीत होण्याची शक्यता आहे.

रेल्वे प्रवाशांना रेल्वेच्या या इंजिन फेलमुळे काही काळासाठी त्रास सहन करावा लागला आहे. परंतु रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीप्रमाणे, मालगाडीच्या इंजिनची दुरुस्ती प्रक्रिया गतीने चालू आहे आणि लवकरच रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यात येईल.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा उत्सव पारदर्शकपणे साजरा करा : जिल्हाधिकारी

अहिल्यानगर दि. २७- विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा उत्सव पारदर्शकपणे साजरा करावा. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना आनंद देणारे वातावरण निर्माण करुन मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

शहरातील नंदनवन लॉन्स येथे मतदान कामकाज संबंधी प्रशिक्षण आणि भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे मतदान यंत्र हाताळणीबाबतच्या प्रशिक्षण सत्राला जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली, यावेळी ते बोलत होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय शिंदे, अपर तहसीलदार स्वप्निल ढवळे, नायब तहसीलदार अभिजीत वांढेकर, सुधीर उबाळे, अनिल तोरडमल उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. सालीमठ म्हणाले, निवडणूक आयोगामार्फत निवडणुकीचे काम अत्यंत पारदर्शी व बिनचूकपणे होण्यावर भर देण्यात येतो. निवडणुकीच्या कामातील चुका टाळण्यासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. निवडणूक कामकाजाचे प्रशिक्षण अत्यंत बारकाईने घेऊन निवडणूक प्रक्रिया बिनचूक व गतिमान होईल यासाठी प्रयत्न करावे. मतदान प्रक्रियेला भंग करणारी कृती होणार नाही याची दक्षता घेतांना सर्वांनी एकसंघपणे काम करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

निवडणुकीतील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. परंतू मतदान केंद्रावर येणाऱ्या मतदाराला आनंददायी वातावरणाची अनुभूती येऊन मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठीही प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. मतदानासाठी मोठी रांग असेल तर बाजूच्या खोलीमध्ये मतदारांसाठी आसन व्यवस्था तयार करावी. मतदान केंद्रावर येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच गरोदर महिलांना रांगेमध्ये उभे न करता त्यांना मतदान करण्याची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. मतदारांना मतदान केंद्रावर आनंददायी वातावरणासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने अधिक प्रमाणात प्रयत्न करावेत, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी केले.

मतदानाची कार्यपद्धती सांगून निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर



पाटील म्हणाले, सर्वसमावेशक आणि सर्वांना सोयीची होईल अशी निवडणूक घेण्यासाठी तयारी पूर्ण झाली आहे. मतदान हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. निवडणूक कर्तव्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रिया, माहिती पुस्तिका यांचे अवलोकन करून कामकाज करावे. मतदान प्रक्रिया राबविताना काही अडचणी असल्यास वरिष्ठांचे मार्गदर्शन घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान यंत्र व कार्यपद्धतीबाबत आयोजित प्रशिक्षण मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दिवसभरातील दोन सत्रात २ हजार ४० अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतले प्रशिक्षण

अहमदनगर विधानसभा मतदारसंघासाठी सकाळ व दुपार अशा दोन सत्रामध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण २ हजार ४० अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणामध्ये ईव्हीएम यंत्र हाताळणे, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी करावयाची कार्यवाही, ईव्हीएमची वाहतूक, मतदान केद्रांची रचना, केंद्रावरील सुरक्षाव्यवस्था, निवडणुकीच्या दिवशी मतदान सुरू होण्यापूर्वी करण्यात येणारे अभिरूप मतदान, मतदानाच्यावेळी तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यास करावयाच्या उपायोजनांबाबतही माहिती देण्यात आली. मतदानाच्यावेळी निवडणूक आयोगांच्या सूचनांबाबतही यावेळी सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सेल्फी

नंदनवन लॉन्स परिसरामध्ये स्वीप समितीमार्फत मतदान जनजागृतीबाबत सेल्फी पॉईंटची उभारणी करण्यात आली होती. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी सेल्फी घेत मतदारांनामध्ये मतदानाची अधिकाधिक जागृती करण्याचा संदेश दिला. त्यांनी प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदानाची शपथ दिली. जिल्ह्यातील विविध प्रशिक्षण सत्रांना जिल्हाधिकाऱ्यांचे चित्रफीतीद्वारे मार्गदर्शन

जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघामध्ये निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना संबंधित मतदारसंघात निवडणूक विषयक प्रशिक्षण देण्यात आले. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी चित्रफीतीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

नाविन्यपूर्ण संकल्पनेतून मतदान यंत्र व कार्यपद्धतीबाबत चित्रफीत तयार करण्यात आली आहे. या चित्रफीतीत मतदान केंद्राची रचना, केंद्रावर आवश्यक साहित्याची मोजणी, मतदान केंद्राची मांडणी, मतदानाच्या आधीच्या दिवशी आणि मतदानाच्या दिवशी घ्यावयाची काळजी, मतदान प्रक्रियेदरम्यान भरावयाचे फॉर्म्स, अहवाल, मतदान संपल्यानंतर करावयाची कार्यवाही, मतदान यंत्र जमा करणे यासह चित्रफीतीत प्रदर्शित विविध माहितीचा कर्मचाऱ्यांनी उपयोग करावा, असे आवाहन आपल्या संदेशाद्वारे त्यांनी केले.

निवडणूक प्रशिक्षणादरम्यान सर्व प्रक्रियेची माहिती करून घ्यावी. निवडणुकीचे कामकाज आणि मतदान यंत्राविषयी असलेल्या शंकांचे तज्ज्ञांकडून निरसन करून घ्यावे. कामाचा ताण न घेता निवडणुकीचे कामकाज आनंददायी वातावरणात आणि परस्पर सहकार्याने पार पाडावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी केले आहे.

## आता जनगणनेचे चक्र बदलणार, २०२५ पासून सुरु होणार जनगणना

नवी दिल्ली : आता देशात जनगणनेस सुरुवात होणार आहे. मात्र जनगणनेचे चक्र बदलणार आहे. नेहमी दहा वर्षांनी होणारी जनगणना यंदा १४ वर्षांनी होणार आहे. जनगणना २०११ नंतर आता २०२५ मध्ये होणार असून त्यानंतर २०३५, २०४५, २०५५ अशी पुन्हा दहा, दहा वर्षांनी जनगणना होणार आहे. यापूर्वी १९९१, २००१, २०११ अशी जनगणना झाली होती. आता २०२५ मध्ये होणाऱ्या जनगणनेमध्ये संप्रदायाची माहिती घेतली जाणार आहे. २०२५ मध्ये सुरु होणार जनगणना २०२६ पर्यंत चालू राहणार आहे. कोरोनामुळे २०२१ मध्ये जनगणना झाली नव्हती. परंतु या जनगणनेत जातीय जनगणना होणार का? यासंदर्भात कोणताही खुलासा अजून झालेला नाही.

जातीय जनगणनेची अनेक विरोधी पक्षांकडून मागणी होत आहे. सरकारने मात्र याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. धर्म आणि वर्ग जनगणनेत विचारले जातात. सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि जमातीची गणना केली जाते. लोकांना या वेळी ते कोणत्या पंथाचे अनुयायी आहेत हे देखील विचारले जाऊ शकते. आतापर्यंत जनगणनेत धर्म आणि वर्ग विचारला जात होता. सामान्यपणे अनुसूचित जाती आणि जनजातीची गणना केली जात होती. मात्र यंदा संप्रदाय विचारला जाणार आहे. कर्नाटकात जसे सामान्य वर्गात असलेले लिंगायत समाज स्वत: वेगळा संप्रदाय मानतात. तसेच अनुसूचित जातीत वाल्मीकी, रविदासी सारखा संप्रदाय आहे. म्हणजेच आता धर्म, वर्ग सोबत संप्रदाय गणनेचा आधार असणार आहे. सरकारचा त्याबाबत विचार सुरु आहे.

जनगणना पूर्ण झाल्यानंतर २०२६ मध्ये लोकसभेच्या जागांचे सीमांकन सुरू होणार आहे. त्यानंतर हे काम २०२८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष आणि एनडीएमधील काही पक्षांनी जातीय जनगणनेची मागणीसुद्धा केली आहे. मात्र केंद्र सरकारने अद्याप याबाबत निर्णय घेतलेला नाही.

जनगणनेचा इतिहास

१८७२ मध्ये भारतातील पहिली जनगणना गव्हर्नर-जनरल लॉर्ड मेयो यांच्या काळात झाली होती. १८८१ मध्ये भारताची पहिली संपूर्ण जनगणना आयुक्त डब्ल्यू.सी. प्लॉडेन यांनी केली होती. त्यानंतर हे दर १० वर्षांनी एकदा जनगणना होत आली. मात्र, त्यातही काही वेळा अंतर दिसून आले.

## माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांचे मंगळवारी राहुरीत मोठे शक्तिप्रदर्शन
## बड्या नेत्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार

राहुरी : राहुरी विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी प्रचाराला वेग दिला आहे. कर्डिले यांनी मंगळवार दि.२९ ऑक्टोबर २०२४ रोजी राहुरी येथे मोठे शक्तिप्रदर्शन करीत आणखी एक उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे नियोजन केले आहे. राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य मिरवणूक काढून कर्डिले अर्ज दाखल करणार आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच उमेदवारांनी व्यूहरचना आखली आहे. राहुरी मतदारसंघात उमेदवारी जाहीर झाल्यापासून शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी तालुका पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. गावनिहाय भेटी देत कर्डिले मतदारांशी संवाद साधत आहेत. या प्रचारा दरम्यान त्यांना मोठे समर्थन मिळत असल्याचेही सांगण्यात येत आहे. प्रत्येक गावात होणारे उत्स्फूर्त स्वागत आणि स्थानिक पदाधिकारी, मतदारांकडून व्यक्त होणाऱ्या भावना पाहता यंदा परिवर्तन अटळ असल्याचे कर्डिले यांनी म्हटले आहे.

कर्डिले यांनी सलग दहा वर्षे



राहुरी मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. त्यावेळी केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा ते सादर करीत आहेत. सन २०१४ च्या निवडणुकीत कर्डिले यांना अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागले. असे असले तरी त्यांनी राहुरी तालुक्यात जनसंपर्क कायम ठेवला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यातील जवळपास प्रत्येक गावात अनेक विकासकामे मार्गी लावली. नवीन रोहित्रांसाठी विशेष प्रयत्न करून निधी आणत वीजेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी मोठे योगदान दिले. याशिवाय जनता दरबार घेवून तालुक्यातील जनतेचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर कर्डिले यांच्या प्रचारात उत्साह निर्माण झाला आहे.

राहुरी तालुक्यातील गावांमध्ये आमदार नसताना केलेली विकासकामे सादर करतानाच विद्यमान लोकप्रतिनिधीची निष्क्रियता कर्डिलेंनी प्रचाराचा मुद्दा बनवला आहे. त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय महायुती सरकारच्या लाडक्या बहिणींपासून लाडक्या भावांसाठीच्या कल्याणकारी योजना समोर ठेवून ते मतदारांना साकडे घालत आहेत. राहुरी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अनेक दिग्गज नेत्यांनी तसेच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून कर्डिलेंना पाठिंबा दिला आहे. याशिवाय भाजप नेते सत्यजित कदम यांनीही एकदिलाने कर्डिले यांनाच साथ देण्याचे जाहीर केल्याने राहुरी तालुक्यात कर्डिलेंचा जोर वाढला आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# 'इंडिया' आघाडीत चाललंय् तरी काय?

भारतीय जनता पक्षासारख्या 'केडरबेस' पक्षाला पराभूत करायचे, तर विरोधी पक्षांमध्ये एकवाक्यता आणि जिंकण्याची विजिगीषू वृत्ती हवी. लक्ष्यभेद करण्याची व्यूहनीती आखता यायला हवी; परंतु महाविकास आघाडीतील पक्ष नियमित अंतराने स्वबळाची भाषा करतात. परस्परांचे पाय खेचतात आणि आपल्या मर्यादा लक्षात न घेता मागण्या करतात. हरयाणाच्या निकालांमधून त्यांनी काही बोध घेतला नाही, असे दिसते. हरयाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये समाजवादी पक्ष आणि आम आदमी पक्षाला एकही जागा न दिल्याचा परिणाम काँग्रेसला भोगावा लागला. काँग्रेस बॅकफूटवर गेली असती, तरी त्यातून धडा घ्यायला तयार नाही. सत्ता मिळवायची असेल, तर सर्वच मित्रांनी थोडा त्याग करण्याची आवश्यकता असते; परंतु लोकसभेतील यशाने फाजील आत्मविश्वास अनुभवणाऱ्या काँग्रेसला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद आपल्या हाती आले, असे वाटायला लागले आहे. काँग्रेस पक्ष सत्ताधारी पक्षाऐवजी मित्रपक्षांचेच अवकाश व्यापण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातून मित्रपक्षाबाबत संदेह निर्माण होईल, असे वातावरण उभे राहते. वास्तविक, अशा प्रकारचे वातावरण मित्रपक्षाविरोधात केले, तर त्याचा दबाव म्हणून काँग्रेसला फायदा होईल; परंतु मित्रपक्षाचे नुकसान होऊन, अंतिम चुरशीच्या लढाईत 'इंडिया' आघाडीचे नुकसान होईल, एवढे साधे गणित पक्षाच्या धुरिणांना कळत नाही. एखादा भाग वा पक्षाचा बालेकिल्ला असू शकतो. याचा अर्थ त्या भागातील एकही जागा मित्रपक्षांना द्यायची नाही, असा होत नाही. एकीकडे महायुतीत कितीतरी वाद असताना वा वादावर पडदा पडून अंतिमतः जागावाटप निश्चित करण्यात आले. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात महायुतीने आघाडी घेतली; परंतु महाविकास आघाडीच्या बैठकांमागून बैठका होऊनही जागावाटपाचा घोळ घातला गेला. शिवसेनेच्या शिल्लक गटानेही हरयाणातील पराभवानंतर काँग्रेसला कस्पटासमान तुच्छ लेखायला सुरुवात केली. लोकसभेला सांगलीच्या जागेबाबत केला, तसाच अडेलतट्टूपणा विधानसभेच्या निवडणुकीतही केला. अशा घटनांमुळे इंडिया आघाडीमधला विसंवाद सतत समोर येत आहे. विधानसभेच्या जागावाटपावर शिक्कामोर्तब झाले नसताना अन्य पक्षातील उमेदवार आयात करून त्याचे नाव जाहीर करण्याची घाई उद्धव ठाकरे यांनी अलिकडे केली. वास्तविक शरद पवार गटातील दीपक साळुंके यांना घेऊन शिवसेनेने त्यांची उमेदवारी जाहीर केली. जागावाटपाअगोदर शिल्लक गटाने त्यांच्या उमेदवारांना एबी फॉर्मही दिले. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाचे अस्तित्व हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या मतदारसंघात असताना दुसरीकडे त्यांच्याच बालेकिल्ल्यातील जागा उबाठा परस्पर जाहीर करत असल्याने महाविकास आघाडीमध्ये ठिणगी पडली आणि शेतकरी कामगार पक्षाने १२ जागा लढवण्याची घोषणा करून टाकली. त्यामुळे महाविकास आघाडी एकसंध नाही आणि ती एकसंधपणे विधानसभा निवडणुकीला सामोरी जाऊ शकत नाही, हे चित्र दुर्दैवाने पुढे आले. निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी महाराष्ट्र आणि झारखंडमधील 'इंडिया' आघाडीत मतभेद निर्माण होताना दिसत आहेत. या दोन्ही राज्यांमध्ये आघाडीमध्ये जागावाटपावर खऱ्या अर्थाने एकमत झाल्याचे दिसले नाही. झारखंडमध्ये राष्ट्रीय जनता दलाने काँग्रेस-झारखंड मुक्ती मोर्चाच्या अडवणुकीचे धोरण अवलंबले आहे. त्याच वेळी समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्रातील आग्रहामुळे जागावाटपाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा ४१ जागांवर तर काँग्रेस २९ जागांवर निवडणूक लढवणार आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी राष्ट्रीय जनता दलाची अवघ्या सात जागांवर बोळवण केल्यामुळे राष्ट्रीय जनता दल नाराज झाला. तेजस्वी यादव यांनी झारखंडमध्ये स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा इशारा दिला. पक्षाचे राज्यसभा खासदार मनोज झा म्हणाले, सर्व पक्षांचे नेते रांचीमध्ये उपस्थित असतात, तेव्हा आम्हाला युती स्थापनेच्या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आले नाही, याचे दुःख होत आहे. आमच्यासमोर अनेक पर्याय खुले आहेत. महाराष्ट्रातही विरोधी महाविकास आघाडीतील जागावाटपाचा फॉर्म्युला बरेच दिवस आकाराला आला नाही. काँग्रेस, उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्यामध्ये जागावाटपाबाबत अनेक बैठका झाल्यानंतरही प्रकरण चिघळले आणि ताण वाढत गेल्याचे आपण पाहिलेच आहे. त्याच वेळी समाजवादी पक्षाने महाराष्ट्रात महाविकास आघाडीकडे १२ जागांची मागणी केली. पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी धुळे विधानसभा मतदारसंघातील उमेदवारी परस्पर जाहीर केली. यानंतर राज्यात जागावाटपावरून वाद होण्याची शक्यता निर्माण झाली. काँग्रेस आणि उबाठा आपल्या जागा अखिलेश यादव यांना देऊ इच्छित नाहीत. दोन्ही राज्यांमध्ये जागावाटपाबाबत शेवटच्या क्षणापर्यंत चर्चा सुरू राहण्याची शक्यता असल्याचे पक्षातील सूत्रांचे म्हणणे होते. हा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा, अशी सर्व पक्षांची इच्छा दिसली; मात्र प्रत्यक्षात तसे घडले नाही. झारखंड आणि महाराष्ट्र निवडणुकीत जागावाटपात विरोधी आघाडीच्या पक्षांमध्ये एकमत नाही. काँग्रेससोबतच समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उबाठा महाराष्ट्रात जास्तीत जास्त जागांची मागणी करीत राहिले. झारखंडमध्ये काँग्रेस, झामुमो आणि राजद यांच्यामध्ये सारे काही आलबेल नव्हते. झारखंडमध्येही 'इंडिया' आघाडीच्या मित्रपक्षांमध्ये जागावाटपावर चर्चेचे गुऱ्हाळ होत राहिले. सध्या राज्यात हेमंत सोरेन यांच्या झारखंड मुक्ती मोर्चाचे सरकार सत्तेवर आहे, तर बिहारमध्ये मजबूत पकड असलेला पक्ष राष्ट्रीय जनता दल झारखंडमध्ये एकट्याने निवडणूक लढवू शकतो. काँग्रेस झामुमोसोबत जागावाटपावर सातत्याने चर्चा करत आहे; पण झामुमो आणि काँग्रेस राजदला हव्या त्या जागा देण्यास तयार नव्हतेच मुळात. ही बाब लक्षात घेता हे मित्र पक्ष आपसांत समन्वय ठेवून निवडणूक लढतील, याची शक्यता नाहीच. देशातील परिस्थिती लक्षात घेता मोठ्या उद्दिष्टांसाठी एकत्र येणे आवश्यक आहे. हरयाणानंतर काँग्रेसची प्रतिष्ठा कमी झाली. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्ष पुन्हा आघाडी करण्याला अनुकूल दिसला; मात्र हरयाणातील अनपेक्षित पराभवानंतर काँग्रेसचा प्रभाव ओसरला. काँग्रेसचे मित्रपक्षही त्यांच्याविरोधात बोलू लागले. हरयाणातील निकालानंतर महाराष्ट्रातील त्यांचा मित्रपक्ष उबाठा म्हणाले की, काँग्रेस एकट्याने निवडणूक लढवते, तिथे चांगली कामगिरी करत नाही. हरयाणाच्या निकालानंतर काँग्रेस जागावाटपाच्या मुद्यावरही पुढे येऊ शकलेली नाही. त्यांचे मित्रपक्ष काँग्रेसकडे अधिक जागांची मागणी करीत आहेत. एकूणच 'इंडिया' आघाडीतील मित्रपक्षांमध्ये खोल दरी दिसून आली. महाराष्ट्र आणि झारखंडच्या विधानसभा निवडणुका असोत किंवा आठ राज्यांच्या विधानसभा पोटनिवडणुका; जागावाटपाचा वाद थांबत नाही. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रत्येक राज्यातील काही जागा 'इंडिया' आघाडीच्या मित्रपक्षांनी थेट आपल्या प्रतिष्ठेशी जोडल्या आहेत. पाहावे तिकडे जागांसाठी सौदेबाजी सुरू दिसली. राष्ट्रीय पातळीवर विरोधी पक्ष युती करून निवडणूक लढवण्याचा दावा करत आहेत, आश्वासने देत आहेत; मात्र त्यांच्यातले मतभेद कमी होताना दिसत नाहीत. पक्षाचे प्रमुख नेते काही भाष्य करत नाहीत. मात्र, संजय राऊतांसारखे वाचाळ प्रवक्ते इंडिया आघाडीची मजबुती कमी करत आहेत. शेवटच्या क्षणी जरी इंडिया आघाडी ऐक्य घडून आले तरी त्याचा लाभ त्यांना मिळणार नाही, हे निश्चित!

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# झेलम पुन्हा लाल झाली...!

श्रीनगर-लेह रस्त्यावर बांधल्या जात असलेल्या एका बोगद्यावर काम करणाऱ्या कामगारांवर बेछूट हल्ला करीत अतिरेक्यांनी निष्पाप जीवांची हत्या केली. नंतर बारामुल्ला भागात पुन्हा एकदा लष्करी पथकावर हल्ला झाला. काश्मीर खोऱ्यातील मतदारांनी भारताच्या निवडणूक प्रक्रियेत मोठ्या संख्येत सहभागी होत एकप्रकारे बाजूने कौल दिला आहे. राज्यात एक लोकनिर्वाचित व लोकप्रिय सरकार सत्तारूढ झाले आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर झालेले हे हल्ले देशासाठी निश्चितच चिंता निर्माण करणारे आहेत.

**आता काश्मीर खोरे** : जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचे हल्ले होत आले आहेत. मात्र, त्या हल्ल्यांमध्ये आणि या हल्ल्यात एक फरक आहे. मागील काही वर्षांत दहशतवाद्यांनी आपले हल्ले करण्यासाठी काश्मीर खोऱ्याऐवजी जम्मू भागाला निवडले होते. जम्मू भागाची दुर्गम भौगोलिक स्थिती हे याचे मुख्य कारण होते. पूंछ व राजौरी या भागात हे हल्ले केले जात होते. काश्मीर खोरे तसे शांत होते. दहशतवाद्यांनी स्थानिक नागरिकांना वा मजुरांना आपले लक्ष्य न बनविता सुरक्षा जवानांवर हल्ले करणे सुरू केले होते. त्यात त्यांना यशही मिळत होते. यावेळी दहशतवाद्यांनी हल्ला करण्यासाठी काश्मीर खोऱ्याची निवड केली आणि नागरी लोकांना म्हणजे मजुरांना आपले लक्ष्य बनविले. दुसरा हल्लाही काश्मीर खोऱ्यात झाला, हे विशेष.

**अब्दुल्लांचे योग्य पाऊल** : राज्यातील विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्सला बहुमत मिळाल्यानंतर उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री झाले. आपले सरकार गठित करताना त्यांनी अतिशय योग्य निर्णय घेत जम्मू भागातून निवडून आलेल्या सुरिंदरकुमार चौधरी या हिंदू आमदारास उपमुख्यमंत्री केले. हा त्यांचा सुखद निर्णय होता. या राज्याचे नाव जम्मू आणि काश्मीर असले, तरी प्रत्यक्षात या भागांचे संबंध जम्मू विरुद्ध काश्मीर, असे राहात आले आहे. या पृष्ठभूमीवर उमर अब्दुल्ला यांनी जम्मूला उपमुख्यमंत्रिपद देत दोन्ही भागांत सलोखा राहण्यासाठी एक चांगले पाऊल उचलले. दहशतवादी हल्ल्यानंतर डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी पाकिस्तानच्या विरोधात केलेले निवेदनही सकारात्मक होते. पण अब्दुल्ला पिता-पुत्रांची समस्या म्हणजे ते केव्हा पलटी मारतील, हे सांगता येत नाही. सध्या दोन्ही अब्दुल्लांनी घेतलेली भूमिका चांगली आहे आणि याच भूमिकेवर ते कायम राहतील, अशी आशा करावयास हरकत नाही.

**हल्ल्याची वेळ** : दहशतवाद्यांनी केलेला हा हल्ला नेमकी वेळ साधून केला आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेच्या बैठकीसाठी इस्लामाबादला गेले होते. यावेळी त्यांची पाक नेत्यांशी चर्चा झाली. पाकिस्तान सरकारचे सर्वेसर्वा नवाझ शरीफ यांनी भारताच्या पंतप्रधानांना दूरध्वनी करीत, आता भूतकाळ विसरून भविष्याकडे पाहण्याची वेळ आली असल्याचे म्हटले होते. त्यानंतर लगेचच हा हल्ला झाला. भारत-पाकिस्तान संबंधात हेच नेहमी होत आले आहे. जेव्हा जेव्हा मुलकी सरकारांनी, सरकारच्या नेत्यांनी भारतासोबत संबंध सुरळीत करण्याची भाषा उच्चारली आहे, त्याला लष्करी नेतृत्वाने सुरुंग लावला आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनी बसने लाहोरला जाण्याचा निर्णय घेतला. याचे दोन्ही देशांत स्वागत झाले आणि काही महिन्यांतच कारगिल घडले. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर त्यांनी नवाझ शरीफ यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून रशियाहून परतताना पाकिस्तानचा थांबा घेतला. मोदी आणि नवाझ शरीफ यांच्यात चर्चा झाली आणि काही दिवसात भारतीय वायुदळाच्या पठाणकोट तळावर दहशतवाद्यांनी हल्ला केला. यावेळी दहशतवाद्यांनी एका बोगद्यावर काम करणाऱ्या मजुरांवर हल्ला चढविला.

**चीनची फूस** : काश्मीर खोऱ्यात झालेल्या या हल्ल्यामागे आयएसआय आहे, हे तर स्पष्टच आहे. पण आयएसआयला चीनची फूस आहे, हे नाकारता येणार नाही. पाकिस्तानातील एका संघटनेने याची माहिती दिली आहे. भारताने लेह भागात रस्ते-बोगदे यांचे जाळे विणू नये, ही चीनची भूमिका असून त्यापोटी एका बोगद्याच्या कामावर हा हल्ला करण्यात आल्याचे या संघटनेने म्हटले आहे. दुसरीकडे जागतिक राजकारणात चीनने आपला दबदबा निर्माण केला आहे. रशिया-चीन-पाकिस्तान-इराण-अफगाणिस्तान ही महायुती तयार झाली असून आयएसआयला आता आपल्या सरकारची भीती राहिलेली नाही.

**पुन्हा अपयश** : काश्मीरमध्ये निवडणुका होऊन नवे सरकार आल्यावर राज्यात अस्थिरता माजविण्याचा प्रयत्न आयएसआय करू शकते. राज्यात पुन्हा दहशतवादी हल्ले सुरू होऊ शकतात, याचा अंदाज भारताच्या गुप्तचर विभागाला यावयास हवा होता. त्यानुसार योग्य ती खबरदारी घेतली जाणे अपेक्षित होते. ते झालेले दिसत नाही.

**नवा तणाव** : जम्मू- काश्मीरमधील जनतेने निवडणुकीत सहभागी होणे, राज्यात लोकप्रिय सरकार गठित होणे, आयएसआय आणि चीन दोघांनाही मान्य होऊ शकत नाही. चीनला हाताळण्यासाठी भारत-अमेरिका यांच्यात घट्ट मैत्री होणे आवश्यक असताना यात तणाव निर्माण करणाऱ्या घटना घडत आहेत. अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन या तपास यंत्रणेने विकास यादव या भारतीय अधिकाऱ्यास 'वॉण्टेड' म्हणून घोषित केले असून त्याच्या प्रत्यार्पणाची मागणी केली आहे.

**वसुलीची केस** : पन्नू व निज्जर या दोघा खलिस्तानी नेत्यांच्या गाजत असलेल्या हत्या व हत्येचा कट प्रकरणात आता एक नवा पैलू आला आहे. अमेरिकेने मागणी केलेल्या विकास यादव या अधिकाऱ्यावर अगोदरच भारतात वसुलीची एक केस सुरू आहे. एका व्यापाऱ्याकडून त्याने पैशाची मागणी केली होती, असे हे प्रकरण आहे. हरयाणाचा रहिवासी असलेला विकास केंद्रीय राखीव पोलिस दलात अधिकारी होता. नंतर त्याला प्रतिनियुक्तीवर 'रॉ' मध्ये पाठवून त्याची नियुक्ती अमेरिकेत करण्यात आली. तो तेथे तैनात असताना पन्नू प्रकरण घडले. त्याला मायदेशी बोलाविण्यात आले. आता तो भारत सरकारच्या सेवेत नसल्याचे सांगण्यात आले आहे. याचा अर्थ विकास यादवने केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या सेवेतून एकतर राजीनामा दिला आहे वा त्याला नोकरीतून काढून टाकण्यात आले आहे. या प्रकरणाची आंतरराष्ट्रीय संवेदनशीलता पाहता सरकारने याबाबत अधिक माहिती जारी केलेली नाही.

२०२३ च्या डिसेंबरमध्ये यादववर वसुलीचा एक गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. तीन-चार महिने तिहारमध्ये राहिल्यानंतर त्याला जामिनावर सोडण्यात आले आहे. या गुन्ह्यासाठी त्याला १० वर्षांची शिक्षा होऊ शकते. म्हणजे तोपर्यंत त्याचे अमेरिकेला प्रत्यार्पण केले जाऊ शकत नाही. भारतातील न्यायव्यवस्था पाहता हा खटलाच सुरू होण्यास काही वर्षे लागतील. नंतर त्याचा निकाल लागेल, त्याला शिक्षा होईल. मग कुठे त्याच्या प्रत्यार्पणाचा विचार भारताला करता येईल. या मधल्या काळात मग अमेरिका हा मुद्दा ताणून धरणार की भारताशी संबंध सामान्य करून पुढे जाण्याचा निर्णय घेणार, हा यातील मुख्य प्रश्न आहे. नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत राष्ट्रपतिपदाची निवडणूक होत असून त्या निवडणुकीच्या निकालावर या प्रश्नाचे उत्तर काही प्रमाणात अवलंबून आहे.

दरम्यान, भारत-कॅनडा दोन्ही देशांनी परस्परांच्या अधिकाऱ्यांची हकालपट्टी केल्यानंतर दोन्ही देशांतील संबंध अधिक विकोपास गेले आहेत. यास कॅनडा जबाबदार आहे. कॅनडात स्थायिक झालेले काही शीख उघडपणे भारताच्या विरोधात भूमिका घेत आहेत आणि कॅनडा सरकार त्यांना पाठीशी घालत आहे, हे चित्र स्पष्ट झाले आहे. भारताला जसा कॅनडाच्या अंतर्गत मामल्यांमध्ये दखल देण्याचा अधिकार नाही तसेच कॅनडालाही भारताच्या अंतर्गत मामल्यांमध्ये दखल देण्याचा अधिकार नाही. मागील काही वर्षांपासून फुटीरवादी खलिस्तानींसाठी कॅनडा हा एक सुरक्षित अड्डा झाला आहे. याचा विचार कॅनडाने केला पाहिजे.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# झगमगाट सोन्याचा...!

कोणी काहीही म्हणो, सोन्याचा झगमगाट काही कमी होत नाही आहे. चारच दिवसांपूर्वी, २४ ऑक्टोबर २०२४ या दिवशी सोन्याचा भाव होता ७८,६०० रुपये. सोन्याचे भाव कितीही होवोत, आम्हा भारतीयांना त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही. आमचे, विशेषतः या देशातील महिलांचे सोन्याबद्दलचे आकर्षण काही कमी होत नाही. सोने ही गुंतवणूक आहे की बचत, हा एक वादाचा विषय असतो नेहमीच. सोने ही पारंपरिक गुंतवणूक मानली तर ही अत्यंत सोयीस्कर आणि खात्रीची गुंतवणूक आहे. त्याचे एक कारण म्हणजे, सोन्याचा भाव कधीच कमी होणार नाही, हा सोन्यासारखा विश्वास. आजपर्यंत तरी अनुभव असाच आहे. सोन्याची किंमत वाढतच गेली आहे, चालली आहे. दुसरे कारण म्हणजे, तत्काळ होणारी 'लिक्विडिटी.' एका हाताने सोने खिशातून काढा आणि दुसऱ्या हाताने पैसे खिशात टाका, इतकी सहज सोपी गुंतवणूक दुसरी कोणतीच नाही. सोन्याची आजची ८ हजार रुपये ग्रॅम ही किंमत लक्षात घेतली तर खूपच कमी जागेत खूपच मोठी संपत्ती हे नशीब दुसऱ्या कोणत्याच गुंतवणुकीचे नाही. एखाद्याने ठरवले तर तो एक कोटी रुपयांचे, सव्वा किलोच्या जवळपास सोने, सहज खिशात घेऊन फिरू शकतो. म्हणूनच तर कायम अशांत देशांमध्ये सोने सांभाळून ठेवले जाते. संकटकाळात कधी देश, गाव सोडून जावे लागले तर एका कुटुंबाजवळ दहा कोटी रुपयांची संपत्ती जवळ ठेवून घरदार सोडून जाता येऊ शकते. अशा काही 'अस्थिर' देशांमध्ये तर सोने नवीन ठिकाणी 'स्थिर' करण्यासाठी खूपच कामाचे ठरते, असा अनुभव अनेकांनी घेतलाही आहे.

सोन्याचे लगेच पैसे होतात, ते मूळ गुंतवणुकीपेक्षा कधीच आणि मुळीच कमी होत नाहीत, हे खरेच आहे. पण आपल्या देशात सोन्यातील गुंतवणूक ही प्रामुख्याने भावनात्मक पातळीवरचीच असते. बारशातील गोफ, साक्षगंधातील अंगठी, लग्नातील मंगळसूत्र अशा भावनात्मक कारणांसाठी असलेले सोने ही एक प्रकारची मृत गुंतवणूक असते व ती तशी अधिकृतपणे मृत मानलीही जाते. हे असे 'भावनाप्रधान सोने' फारच अटीतटीचा प्रसंग आल्यासच घराबाहेर जाते. खरे तर आपल्याकडच्या ९० टक्के सोन्याची त्या अर्थाने मृत गुंतवणूकच असते. ही गुंतवणूक मृत असली तरी खूपच संवेदनशीलही असते. बदलत्या परिस्थितीची सोन्याला जणू जाणीवच होते. कोरोना काळात आर्थिक व्यवहार विस्कळीत असताना, व्यापार, उत्पादन थंडावले असताना, टाळेबंदीमुळे जगभर निर्बंध असताना, २०२१ मध्ये भारतात १,०६८ टन सोन्याची आयात झाली. लगेच दुसऱ्या वर्षी २०२२ मध्ये अर्थव्यवहार मोकळे झाल्यानंतर भारतात ही आयात कमी होऊन ७०६ टनांवर उतरली. म्हणजेच, आर्थिक गुंतवणुकीचे आणि बचतीचे मार्ग मोकळे झाल्यानंतर गुंतवणूकदार सोन्याकडून आर्थिक बाजाराकडे वळले. भारतात सोन्याची मागणी पूर्ण करण्यासाठी ९० टक्के सोने आयात केले जाते. यापैकी ५० टक्के सोने फक्त स्वित्झर्लंडमधून तर उर्वरित दुबईमधून येते. जगात चीननंतर भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा सोने आयात करणारा देश आहे. भारताचे ५०० टनांहून अधिक सोने इंग्लंडसह काही देशांमध्ये सुरक्षित आहे. ते आता भारतात परत आणण्याची प्रक्रिया सुरू झाली असून इंग्रजांनी १९४७ पूर्वीचे त्यांच्याजवळ असलेल्यापैकी १०० टन सोने नुकतेच भारतीय रिझर्व्ह बँकेला परत केले आहे.

अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपया घसरला की सोन्याचा भाव वाढतो. सोन्याची आयात डॉलरमध्ये होत असल्यामुळे तो सक्षम झाला की सोने महागते. बँकांच्या व्याजदरात घसरण झाली की लोक सोन्यातील गुंतवणुकीकडे वळतात आणि भाव वाढतात. लग्नसराई, सणांचे दिवस, गुरुपुष्य, साडेतीन मुहूर्त हे दिवससुद्धा सोन्याचे भाव वाढवतात. सोन्याची गेल्या १०० वर्षांतली भाववाढही रंजक आहे. १९२५ साली सोन्याच्या १० ग्रॅमचा दर १८ रुपये होता असे म्हणतात. १९२४ साली तो साधारण ८० हजार रुपये झाला आहे. म्हणजे सुमारे ४,४०० पट वाढ आहे १०० वर्षांत. १९२५ मध्ये १८ रुपये, १९५० मध्ये ९९ रुपये, १९७५ मध्ये ५४०, २००० मध्ये ५२००, २००७ मध्ये १०,५००, २०१२ मध्ये ३१,०००, २०१९ मध्ये ४०,००० आणि पाचच वर्षांत दुप्पट, म्हणजे २०२४ मध्ये ८० हजारांच्या घरात. अशा सोन्याच्या उंचच उंच उड्या आहेत. म्हणजेच १९५० दरम्यान ज्यांनी १०० रुपयांप्रमाणे घेतलेले सोने राखून ठेवले असेल ते आज २०२४ मध्ये जवळपास ८०० पट किंमत वाढवून बसले आहे. याचवर्षी २०२४ च्या लग्नसराईच्या मे महिन्यात छत्रपती संभाजीनगरसारख्या एकाच शहरात रोज ७ किलो सोने विकले गेले असल्याचा एक अहवाल आहे. संपूर्ण भारतात वर्षभरात ६०० ते ७०० टन सोने विकले जाते. भारतीय मंदिरांमध्ये ३ ते ४ हजार टन सोने असल्याचा एक अंदाज आहे तर भारतातील गृहिणींजवळ १८ हजार टन म्हणजे जगातील सोन्याच्या एकूण साठ्यापैकी चक्क ११ टक्के सोने आहे. भारत सरकारजवळ ८०३.५८ मेट्रिक टन सोन्याचा साठा आहे. आहेत की नाही सोन्याच्या गोष्टी सोन्यासारख्या मौल्यवान...!

९८८१७१७८२९


## कानोसा

अमोल पुसदकर

# गोवंश रक्षणाचा संकल्प

गोवत्स द्वादशी किंवा वसुबारस हा धनत्रयोदशीच्या एक दिवस आधी साजरा केला जाणारा उत्सव आहे. या दिवशी गाय आणि तिच्या वासराची पूजा केली जाते. खेड्यापाड्यांमध्ये गायींच्या शरीरावर विविध प्रकारांचे रंगाचे शिक्के मारून तसेच त्यांच्या शिंगांना मोरपीस बांधून त्यांना सजविले जाते व त्यांची पूजा केली जाते. आपली संस्कृती ही कृषिप्रधान संस्कृती आहे. गाय या संस्कृतीचा प्रमुख आधार आहे. प्राचीन काळापासून जी शेती होत होती त्यामध्ये शेत वखरणे, नांगरणे व इतर सर्वच कामांकरिता बैलांची गरज भासायची. गायीचे गोऱ्हे हे पुढे बैल म्हणून शेतीला उपयोगी ठरायचे. त्याचप्रमाणे गायीपासून बैलांची प्राप्ती व्हायची. भविष्यात दूध देणाऱ्या गायीसुद्धा गायीपासूनच प्राप्त व्हायच्या. त्यामुळे गायीचे अनन्यसाधारण महत्त्व होते आणि आहे. केवळ शेतीसाठी बैल प्राप्त होतात म्हणून गायीचे महत्त्व आहे, असे नाही तर धार्मिकदृष्ट्या गायीच्या संपूर्ण शरीरामध्ये देवतांचा वास आहे, अशा पद्धतीची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे गाय ही पवित्र आहे.

नंदिनी, सुशीला या गायींचा पौराणिक काळामध्ये उल्लेख येतो. रामायणामध्ये एका ठिकाणी दशरथ राजाला पुत्रवियोगाचे दुःख का प्राप्त झाले. याबद्दल उल्लेख आहे की, ज्यावेळेस एक गाय रस्ता पार करीत होती त्यावेळेस दशरथ राजा आपला रथ घेऊन चालला होता. त्याने आपला रथ हळू करून गायीला जाऊ दिले नाही तर स्वतः पहिले निघून गेला. या त्याच्या कृत्यामुळे त्याला पुत्रवियोगाचे दुःख प्राप्त झाले. पांडव जेव्हा अज्ञातवासात होते तेव्हा पांडवांना बाहेर काढण्यासाठी कौरवांनी विराट राजाच्या गायी पळविल्या होत्या. गाय म्हणजे प्रत्येकाची प्रतिष्ठा होती. गायींना पळविल्यानंतर पांडव अज्ञातवास सोडून बाहेर येतील व आपल्याशी युद्ध करतील, हा कौरवांना विश्वास होता. गायीला 'गोधन' असे म्हटलेले आहे. गायीपासून पंचगव्याची म्हणजे दही, दूध, तूप-लोणी, गोमूत्र-शेण या सर्वांची प्राप्ती होते. त्यामुळे गाईचे अनन्यसाधारण स्थान आहे. गाय हा दयाळू प्राणी आहे. गायीचे दूध हे अर्भकांनासुद्धा चालते. ज्या बालकांची आई त्यांना दूध देऊ शकत नाही अशा



बालकांचे पोषण गायीच्या दुधावर होऊ शकते; इतके गायीचे महत्त्व आहे. श्रीकृष्णाच्या कपिला गायीचा उल्लेख महाभारतामध्ये आलेला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे पुसद येथे गेले असता त्यांना असे दिसले की, एक कसाई गायीला मारण्यासाठी घेऊन जात आहे. त्यांनी कसायाला थांबवले. ''तू या गायीला मारू नको. तुला जी काही किंमत पाहिजे, ती मी देतो,'' असे म्हणून त्यांनी कसायाला गायीचे मोल विचारले. तरीही तो कसाई गाय द्यायला तयार होत नव्हता. त्यांनी गायीचे अधिकचे पैसे देऊ केले. कसाई म्हणाला की, ''मला गायीचे पैसे नको, मला हिचे मांस हवे आहे. मी हिला मारणारच!'' तेव्हा डॉ. हेडगेवारांनी आपले रौद्ररूप धारण केले व त्याच्याकडून गाय हिसकावून घेतली.

गोंदवलेकर महाराजांनी अनेक वेळा गायींचे रक्षण केले होते. एकदा ते बाजारामध्ये गेले असता त्यांना एक कसाई गायींना घेऊन चाललेला दिसला. त्यांनी त्या कसायाला गायीचे अधिक मूल्य देऊ केले तरी तो कसाई गाय देईना. शेवटी महाराजांनी त्याला आणखीन मूल्य दिले व त्याच्याकडून ती गाय विकत घेतली. महाराज त्या गायीला म्हणाले की, ''बाई, तुझ्यावर आज खूप कठीण प्रसंग आला होता. परंतु रामाच्या कृपेने तू वाचली आहेस.'' शेगावचे संत गजानन महाराज यांच्याकडे काही लोकांनी उनाड गायीला साखळदंडाने बांधून आणले. महाराज म्हणाले की, 'अरे, ही गाय अवघ्या जगाची माय आहे. हिला अशा यातना देणे बरे नव्हे.' त्यानंतर त्या उनाड गायीला महाराजांनी शांत होण्यास सांगितले. ती गाय मरेपर्यंत महाराजांच्या जवळच राहिली. यावरून आपल्याला संतांची गायीबद्दलची प्रीती, गोभक्ती लक्षात येते.

योगी आदित्यनाथ हे सुद्धा गोभक्त आहेत. बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते कुठलाही मानसन्मान, सामाजिक स्तुती किंवा राजकीय स्तुती याची अपेक्षा न करता गोवंश संरक्षणाचे कार्य आपल्या जिवाची बाजी लावून करत असतात. ठिकठिकाणी जो गोवंश कत्तलीसाठी जात असतो, त्याला पकडून गायींची गोशाळेमध्ये रवानगी करण्याचे काम विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते नेहमीच करीत असतात.

आताच महाराष्ट्र सरकारने गायीला 'राजमाता' अशा पद्धतीचा दर्जा दिलेला आहे. या आधीच्या फडणवीस सरकारने महाराष्ट्रामध्ये गोहत्या बंदीचा कायदा केला. त्या आधीच्या सरकारने गायींची कत्तलच करण्याची परवानगी दिली होती. त्यामुळे येणाऱ्या काळात गोवंश रक्षकांचे सरकार आपल्याला आणायचे आहे. गायीला राजमाता दर्जा देणाऱ्यांचे सरकार आणायचे आहे की कसायांचे सरकार आणायचे आहे, याचा विचार सर्वसामान्य जनतेने केला पाहिजे. एखादा कसाई जर सूटबूट घालून उभा असेल व एखादा गोभक्त अगदी धोतर घालून उभा असेल, दोघांच्याही हातामध्ये हिरवा चारा असेल तर गायीला कसायाच्या अंगाचा वास घेऊनसुद्धा तिला समजू शकते की, हा आपला प्राणहर्ता आहे अन् धोतर घातलेल्या गरीब शेतकऱ्याकडे बघूनसुद्धा तिला समजू शकते की, हाच आपला रक्षक आहे. असा हा दैवी प्राणी आहे. या गोवंशाचे रक्षण झाले पाहिजे, ही तुमची-आमची सर्वांची जबाबदारी आहे.

पूर्वी ६८ पेक्षा अधिक देशी वंशाच्या गायी होत्या; आता त्यांची संख्या ३८ पेक्षा कमी झाली आहे. भारतीय वंशाच्या गायी समाप्त होऊ नये, त्यांचे अत्यंत पौष्टिक आणि अमृततुल्य दूध आपल्या देशातील बालकांना मिळावे यासाठी देशी वंशाच्या गायींचे संरक्षण होणे आवश्यक आहे. गोवत्स बारस हा दिवस गाईंचे पूजन करण्याचा दिवस आहे. या दिवशी आपण गोवंशाचे संरक्षण करण्याचा व त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करूया. हीच त्यांची खरी पूजा ठरेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### गंदरबाल दहशतवादी हल्ला

जम्मू-काश्मीरमधील गंदरबाल जिल्ह्यातील सोनमार्ग भागात २० तारखेला दहशतवाद्यांनी सात जणांची गोळ्या झाडून हत्या केली. यात मरण पावलेले दोन अधिकारी, तीन मजूर गैरकाश्मिरी होते. यात एक स्थानिक डॉक्टरही होता. ओमर अब्दुल्लाचे सरकार स्थापन होऊन चार दिवस झाले नव्हते म्हणून लगेच दहशतवाद्यांचे धाडस वाढले, असे कोणाला वाटल्यास नवल नाही. हा हल्ला बांधकाम सुरू असलेल्या बोगद्याजवळ कामावरून परत आलेले मजूर व कर्मचारी कॅम्पमधून जेवायला जायच्या तयारीत असताना झाला. यात डॉक्टरसह सात मजूर परप्रांतातून आलेले मारले गेले. हा दहशतवादी हल्ला पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केला, हे फारुख अब्दुल्ला यांनी पाकिस्तानवर केलेल्या आरोपांनी सिद्ध होते. पण जम्मू-काश्मीर सरकारच्या हाताखाली असलेले पोलिस दल राष्ट्रपती राजवट असताना जसे काम करत होते; तितक्याच समर्थपणे ते ओमरचे सरकार असताना करू शकेल का? याची शाश्वती राहील का? आपले शेजारी असलेला पाकिस्तान देश गव्हाण्यातल्या कुत्र्यासारखा आहे. कुत्रा स्वतःही गवत खात नाही व गाईलाही खाऊ देत नाही. त्याचप्रमाणे जगात दहशतवादासाठी बदनाम झालेला देश पाकिस्तान स्वतः सुखी राहत नाही व शेजारी असलेल्या भारतालाही सुखी राहू देत नाही. सध्या भीक मागून पाकिस्तानी सरकार जनतेचे कसेतरी पोषण करते आहे. सौदी अरेबियाने तर, आमच्या देशात भिकारी पाठवू नका, अशी पाकिस्तानला तंबी दिली आहे. दहशतवादावर पैसा खर्च करण्यापेक्षा गरिबांना भिकारी होण्यापासून वाचवण्यासाठी त्यांच्यावर पैसा खर्च करावा, हे सौदी अरेबियाने पाकिस्तानला सांगायला पाहिजे. जम्मू-काश्मीरला सुखाने निवडणुका झाल्या याबद्दलची पाकिस्तानची ही तडफड आहे. पाकिस्तानला झालेला दहशतवादाचा कॅन्सर लवकरच पाकिस्तानचे तुकडे करणार हे नक्की. सध्या तरी पाकिस्तानात दहशतवादात तरुणांना ढकलायचे हा एकच रोजगार आहे. निष्पाप निरपराध लोकांना मारून पाकिस्तानचे कधीही भले होणार नाही. हे पाकिस्तानातले मुल्ला-मौलवी पाकिस्तान सरकारला सांगायचे धाडस करतील का? इतके विरोधी पक्ष आहेत, पण त्यातल्या एकाही पक्षाच्या नेत्याने घडलेल्या घटनेबद्दल पाकिस्तानचा निषेध व मेलेल्या लोकांबद्दल सहानुभूती व्यक्त केल्याचे आठवत नाही. सगळे इंडिया आघाडीचे पक्ष सत्ता प्राप्तीसाठी निवडणुकीच्या धामधुमीत देशाचा विचार बाजूला ठेवून व्यस्त असलेले दिसतात. ही विरोधी पक्षांची मेलेल्या लोकांबद्दलची आस्था.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

••••

### दिवाळीला 'किंडर जॉय' नको

दिवाळीचा सण आला की दूरदर्शनवर 'किंडर जॉय' चॉकलेटची जाहिरात प्रसारित करण्यात येते. या जाहिरातीमध्ये दोन लहान मुले आणि त्यांचे आई-वडील दाखवले आहेत. लहान मुलांना त्यांची आई म्हणते की, मोठ्या माणसांना नमस्कार करा आणि त्यांचे आशीर्वाद घ्या. ती मुले आधी आजीला, नंतर काकूला नमस्कार करतात. नमस्कार केल्यावर काकू त्यांच्या हातामध्ये हे चॉकलेट ठेवते. मुले खूश होतात. मग जाहिरातीमधील नरेटर म्हणजे निवेदक या चॉकलेटवर मोठमोठी बक्षिसे असल्याचे सांगतो. ही जाहिरात मुलांचा बुद्धिभेद करते. कारण दिवाळीत लाडू, करंजी, चिरोटे, शंकरपाळी, चकली, चिवडा हे पदार्थ करतात. या जाहिराती भारतीय परंपरेला छेद देण्याचे काम करतात. भारतीय मिठाई आणि फराळाचे पदार्थ जगाच्या पाठीवर कुठेही मिळणार नाहीत. भारतीय मिठाई व फराळ यातील प्रत्येक पदार्थाची स्वतःची एक खासियत आहे. भारतीय पालकांनी दिवाळीसारख्या सणांना अशी चॉकलेट खायला न देता फराळाचेच पदार्थ देऊन संस्कृती टिकवणे अनिवार्य आहे. चॉकलेट विक्रीतून कंपनीचा लाभ होतो आणि मुलांवर चुकीचे संस्कार.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

••••

### 'हलाल'मुक्त दिवाळी

दिवाळीनिमित्त सगळीकडे घराची साफसफाई, रंगरंगोटी, सजावट होत आहे. नवीन कपड्यांची खरेदी, फराळाच्या पदार्थांसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी उत्साहात सुरू आहे. अशावेळी एक आवाहन वारंवार होत असल्याचे वाचण्यात आले. यंदाची दिवाळी 'हलाल'मुक्त दिवाळी म्हणून साजरी करूया! तसं बघितलं तर 'हलाल' या विषयावर व्यापक प्रमाणावर जनजागृती होत आहे. हलाल ही इस्लामवर आधारित अर्थव्यवस्था आहे. आज तर हलाल ही संकल्पना केवळ मांसाहारापुरती म्हणजे खाद्य पदार्थांपुरती मर्यादित राहिलेली नसून ती औषध, दवाखाने, बांधकाम, बिल्डिंग, उपाहारगृह, सौंदर्य प्रसाधने अशा अनेक ठिकाणी येऊन पोहोचली आहे. हलालप्रमाणित लोगो या विविध ठिकाणी बघायला मिळतो. मुळातच प्रश्न हा आहे की, जर हलाल इस्लाम मान्य आहे तर केवळ मुसलमानांपुरतेच ते मर्यादित असायला हवे. यातून मिळणारा पैसा देशविघातक कृत्ये करणाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी वापरला जातो, हे उघड झाले आहे. तेव्हा या हलाल अर्थव्यवस्थेला रोखण्यासाठी यावर्षीची दिवाळी हलालमुक्त दिवाळी साजरी केली तर नक्कीच काही प्रमाणात यावर आळा बसेल. त्यासाठी हलाल प्रमाणित मिठाई, खाद्यपदार्थ, भेटवस्तू खरेदी न करणे. हिंदू बांधवांना जागृत करणे इत्यादी प्रयत्न संघटित होऊन केल्यास ही दिवाळी हलालमुक्त दिवाळी ठरेल आणि देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी सहायक ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







नांदेड- विधानसभा निवडणुकीसाठी तिकडून श्रीजया चव्हाण यांनी भोकर मतदारसंघ, आमदार बालाजी कल्याणकर नांदेड उत्तर मतदारसंघ तर माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी लोहा - कंधार मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज भरतेवेळी तिन्ही उमेदवाराकडून रॅली काढून जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात आले. यावेळी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधीकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### 'सुगीचे दिवस' आत्मकथनाची दुसरी आवृत्ती प्रकाशित

**नांदेड**-प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर घोडगे यांनी लिहिलेले 'सुगीचे दिवस' हे आत्मकथन बहुचर्चित ठरले असून या आत्मकथनाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जगदीश कदम यांच्या हस्ते निर्मल प्रकाशनाच्या कार्यालयात करण्यात आले. अध्यक्षस्थानी ॲड. सी.आर. पंडित हे होते. प्राचार्य घोडगे यांनी आपल्या आयुष्यातील घटना आडपडदा न ठेवता सांगितल्या आहेत.बाबासाहेबांना सांगितलेल्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या शिकवणीचा खरा सार या आत्मकथनातून आलेला दिसतो.सामाजिक अभिसरणाच्या काळातील लेखकाला आलेले अनुभव अत्यंत प्रांजळपणे मांडलेले आहेत. हे आत्मकथन म्हणजे एक पिढीच्या घडण्याची प्रामाणिक कहाणी होय. भाषा आणि सामाजिक आशय यामुळे या आत्मकथनात कमालीची वाचनीयता आलेली आहे, असे उद्गार डॉ.कदम यांनी काढले. दुसऱ्या आवृत्तीमध्ये काही राहून गेलेल्या महत्त्वाच्या नोंदी समाविष्ट करण्यात आलेल्या असून अनावधानाने आलेले कटू प्रसंग वगळण्यात आले आहेत, असे लेखक डॉ, घोडगे यांनी सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ लेखक डॉ. भगवान अंजनीकर, अनुवादक भीमराव राऊत, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी लेखकाला शुभेच्छा दिल्या. ॲड. पंडित यांनी समारोप केला. इंजि. अभिजीत घोडगे कारलेकर यांनी आभार मानले.

### दीपावलीनिमित्त स्वारातीम विद्यापीठास सुट्टी

**नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास दीपावली सणानिमित्त दि. ३१ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर दरम्यान पाच दिवस सुटी जाहीर करण्यात आलेली आहे. या सुट्या विद्यापीठाचे उपपरिसर लातूर, परभणी, हिंगोली येथील न्यू मॉडेल डिग्री कॉलेज तसेच किनवट येथील कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट यांनाही लागू करण्यात आलेल्या आहेत. या दरम्यान विद्यापीठाचे सर्व कामकाज बंद राहणार आहे. तरी संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांनी कळविले आहे.

### मतदानासाठी विद्यार्थ्यांचे पालकांना साकडे

**नांदेड**-नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी स्वीप कक्षाच्या वतीने मतदान जनजागृतीचे विविध उपक्रम घेतले जात आहेत. नांदेड-वाघाळा महानगरपालिका वजीराबाद येथील शाळा क्रमांक १ मध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी मतदान संकल्पपत्र लिहिले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व समजावून सांगणारे संकल्पपत्र लिहून आपल्या पालकांना दिले. त्यांना मतदान करण्याचे वचन देण्यास प्रवृत्त केले आहे. यामुळे हा उपक्रम प्रभावी ठरला आहे. याशिवाय मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी, रॅली यासारखे उपक्रमही घेतले जात आहेत. यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपालसिंग संधू व शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे, सर्व शिक्षक व पालकांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

### अक्षर परिवाराची अभ्यास दिवाळी

**नांदेड**-दीपोत्सव अर्थात दिवाळी म्हटले की प्रत्येकाच्या आनंदाला उधाण आलेले आपण पाहतो. सर्वत्र विद्युत रोषणाई, मंद, उबदार दिव्यांची आरास घरांची शोभा वाढवत असते. तसेच घराघरात आपापल्या ऐपतीप्रमाणे निरनिराळे रुचकर, चविष्ट खाद्यपदार्थांची मेजवानी असते. दीपावली सुट्ट्यांमध्ये ह्या सर्व आनंदोत्सवात कृतियुक्त, सृजनात्मक घरच्या अभ्यासाची गोड भेट देऊन अक्षर परिवार नावाने राज्यभर सुपरिचित असणाऱ्या वाजेगाव बीट ने अक्षर दिवाळी साजरी करत आपले वेगळेपण जपले आहे. या माध्यमातून बीट मधील तेराही जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पहिली ते नववी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना मोफत दिवाळी अभ्यासाच्या कृतीपुस्तिकांचे वाटप करण्यात आले आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या दिवाळी सुट्ट्यांमध्ये अभ्यासाला पडणाऱ्या खंडाला आळा बसणार आहे. अनेकदा दिवाळी सण संपल्यावर उर्वरित सुट्ट्यांमध्ये मुलांनी करावे काय असा प्रश्न त्यांना पडतो. त्यावेळी ह्या कृतीपुस्तिकांच्या माध्यमातून अनेक कृतींचा सराव केल्याने विद्यार्थ्यांच्या सृजन क्षमतेला वाव मिळणार आहे.शिवाय अभ्यासाची गोडी कायम राहून दिवाळी सुट्ट्या संपल्यानंतर शाळा प्रारंभानंतर शाळेच्या अभ्यासाचा कंटाळा देखील विद्यार्थ्यांना येणार नाही.

# आमदार केराम आणि सचिन नाईकांचा उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २८ ऑक्टोबर**

महायुतीकडून आमदार भीमराव केराम आणि सचिन नाईक मित्रमंडळाकडून सचिन नाईकांनी उमेदवारी दाखल केली.मोठ्या उत्साही वातावरणात आणि अदिवासी दंडार ढोल ताशा, डिजे, चित्र रथ , त्याच बरोबर विविध जाती धर्मातील ताल वाद्यांच्या गजरात निघालेल्या या रॅलीत आमदार भिमराव केराम यांचे खंदे समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते पुरुषांपेक्षा महिलांची अलोटगर्दी करुन लक्षवेधी शक्तीप्रदर्शन केले.

महायुतीचे आमदार भिमराव केराम यांनी मोठे शक्ती प्रदर्शन करत २८ ऑंक्टोबर रोजी दुपारी हुतात्मा गोंडराजे शंकरशहा रघूनाथशहा मैदानापासून शहराच्या मुख्य मार्गाने उपविभागीय कार्यालयात महायुतीकडून नामनिर्देशनपत्र दाखल केले असून भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या उपस्थितीत आणि आनंद मच्छेवार, अविनाश राठोड, दिनकर चाडावार, बाबूराव केंद्रे, बालाजी आलेवार, सुनिल पाटील, संतोष चनमनवार, स्वागत आयनेनीवार, राधा कांबळे, पद्मा गिऱ्हे, सागर शिंदे, सुजाता उपलेंचवार, मुसाखान या सुचकांच्या उपस्थितीत नामांकन



भरण्यात आले.

तर सचिन नाईक यांनी सचीन नाईक मित्रमंडळाच्या वतीने शहरातील कलावती गार्डन येथुन जोरदार शक्तीप्रदर्शन करुन २९ ऑंक्टोबर रोजी नामांकन भरणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या प्रदीप नाईकांना इशारा दिला असल्याची चर्चा दूमदूमतांना ऐकायला मिळाली.

यावेळी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेमानेवार सुधाकर भोयर अनिल तिरमनवार अशोक नेमानी वार रमेश बद्देवार सुनील आयनिवार लक्ष्मण कासाडीवार शिवा आंधळे बालाजी धोत्रे संजीव रेड्डी पळशी शैलेश गटलेवार गौरव सुनील मच्छेवार विवेक ओंकार अजय चाडावार सतीश बिराजदार श्रीनिवास नेमानिवारा दत्ता आडे आशुतोष बेदरे काशिनाथ शिंदे पत्रकार श्रीनिवास गोपाळराव निमनिवार गोविंद अंकुरवार आदी उपस्थित होते.

# मतदान जनजागृती रांगोळी व चित्रकला स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ ऑक्टोबर**

आगामी लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या वाढावी यासाठी नांदेड जिल्हा प्रशासनाने जनजागृतीसाठी विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्विपच्या प्रमुख मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी वजीराबाद येथील मल्टीपर्पज हायस्कूलमध्ये नांदेड दक्षिण मतदार संघातील नागरिकांसाठी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मतदान जनजागृती हा या स्पर्धेचा मुख्य विषय आहे. सहभागी स्पर्धकांनी मतदानाचे महत्त्व आणि लोकशाहीच्या प्रक्रियेत त्याचा मोलाचा वाटा कसा आहे, हे चित्रकला व रांगोळी मधून दाखवून द्यायचे आहे.

# निवडणूक निरीक्षक कालु राम रावत यांचे आगमन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीसाठी राजस्थान कॅडरचे २००८ तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे वरिष्ठ अधिकारी कालु राम रावत यांचे आज नांदेड येथे आगमन झाले.



जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी त्यांचे स्वागत केले. श्री. कालुराम रावत शासकीय विश्रामगृहावर निवडणूक काळात कार्यालयीन वेळेमध्ये सामान्य जनतेसाठी उपलब्ध असतील. त्यांचा निवडणूक काळातील स्थानिक संपर्क क्रमांक ८१८०८३०६९९ आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आशिष बोराडे ( ८८८८८९२१जज)त्यांच्यासोबत असतील. नागरिकांना नांदेड विश्रामगृहातील व्हीआयपी सूट क्रमांक एक मध्ये त्यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

## मोटार सायकल वाहनांसाठी नवीन मालिका सुरु

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ ऑक्टोबर**

परिवहनेत्तर संवर्गातील मोटार सायकल वाहनांसाठी एमएच २६-सीआर ही नवीन मालिका २९ ऑक्टोंबर २०२४ पासून सुरु होत आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल क्रमांक व ईमेलसह अर्ज २९ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी २.३० पर्यत स्विकारण्यात येणार आहे. त्यानंतर पसंती क्रमांकासाठी अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

# नांदेड लोकसभेसाठी डॉ.संतुक हंबर्डे यांना भाजपाकडुन उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ ऑक्टोबर**

नांदेड नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने उमेदवार जाहीर केला असून डॉ. संतुक हंबर्डे यांना संधी देण्यात आली आहे.



कॉंग्रेसचे खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे नांदेड लोकसभेची जागा रिक्त झाली होती.विधानसभा निवडणुकीबरोबरच येत्या २० नोव्हेंबर रोजी नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. कॉंग्रेसकडून स्व. वसंत चव्हाण यांचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली तर भारतीय जनता पार्टी कडून उमेदवार कोण असेल याबाबत अनेक चर्चा रंगू लागल्या होत्या. माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर, खासदार अशोक चव्हाण यांच्याही नावाची चर्चा झाली. दरम्यान भारतीय जनता पार्टीने आज दिनांक २८ ऑक्टोबर रोजी उमेदवार जाहीर केला असून डॉ. संतूक हंबर्डे यांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे नांदेड लोकसभेची निवडणूक थेट भाजप आणि कॉंग्रेस विरुद्ध होणार आहे.

# नांदेड अड्डा अंतर्गत पर्यावरण प्रेमी शिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ ऑक्टोबर**

जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून मागील तीन महिन्यापासून जिल्ह्यातील विविध शाळा आणि गावांमधून पर्यावरणाचे महत्त्व व संवर्धन याबाबत गावपातळीवर मोठ्या प्रमाणात मोहीम चालविली जात आहे. त्यासाठी बेंगलोर येथील सामाजिक संस्था रिप बेनीफिट ही पुढाकार घेत आहे. याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी लोहा तालुक्यातील पारडी येथील सह्याद्री प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयात लोहा तालुका पर्यावरण अड्डा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती




मीनल करनवाल, शिक्षणाधिकारी (मा.) माधव सलगर, दिलीप बनसोडे, शिक्षण विस्तार अधिकारी हनुमंत पोकले, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक सूदर्शन शिंदे, सह्याद्री प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयात लोहाचे संचालक दहिवाल, प्राचार्य तसेच लोहा अड्डा अंतर्गतचे सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात श्रीमती मीनल करनवाल पर्यावरणाचे महत्त्व व त्याचे संवर्धन याबाबत सर्व विद्यार्थ्यांना माहिती दिली व सर्व विद्यार्थ्यांनी दिवाळी पर्यावरण पूरक उपक्रम राबवून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. मारतळा येथील विद्यार्थिनीने त्यांची शाळा प्लास्टिकमुक्त झाल्याचे सांगितले. तिचे कौतुक करण्यात आले. लोहा तालुक्यातून निवडक शिक्षक व विद्यार्थी यांनी त्यांचे शाळा आणि गावात प्लास्टिकमुक्त गाव व शाळा, पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल जिल्हा केंद्रीय प्राथमिक शाळा मारतळा येथील उपक्रमशील शिक्षक रवी ढगे, सोहम सोरटे, वेदिका गिरी, प्र.शा. रामाचीवाडी शिक्षक तुकाराम चव्हाण, अंजली मुंडे, जि.प.हायस्कूल वडेपुरी शिक्षिका दीपा गिरी, राजश्री आठवडे, प्रा.शा. सोनखेड कविता मुदखडे, अर्जुन मोरे, शिक्षक व विद्यार्थ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सह्याद्री प्राथमिक ते माध्यमिक विद्यालय पारडी यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी ढगे, दीपा गिरी यांनी केले. तर या कार्यशाळेसाठी ऑनलाईन पद्धतीने रिन बेनीफिटचे विकास, शिवानी, भरत, चंद्रिका यांची उपस्थिती होती.

# आदमपूर, थडीसावळी, गळेगांव परिसरात रब्बी पेरणीस सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २८ ऑक्टोबर**

खरीप हंगामाची सुरूवात पावसाने दमदार झाली.नंतर उघडीप आणि ऐन बहरात अतिवृष्टीचा फटकाही बसल्याने परिसरातील शेतकरी हवालदिल झाले होते.काही प्रमाणात सोयाबीनचे उत्पादन निघूनही योग्य हमीभाव नसल्याने शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन घरातच राखून ठेवल्याचे चित्र आहे.आदमपूर,थडीसावळी, गळेगांव,अटकळी,टाकळी,खतगांव परिसरात शेत शिवारात रब्बी हंगामाची पेरणी करताना शेतकरी दिसून येत आहेत.काही ठिकाणी अतिवृष्टीत बाधीत झालेल्या शेत शिवाराची अजून



पेरणीयोग्य तयारी झालेली नाही.

त्यामुळे कचरा वेचणीची लगबगही रानात आयाबाया मजूर करताना दिसून येत आहेत.गावोगावी कचरा वेचणी मजूरही मिळेनासे झाले आहेत.हे वास्तव चित्र पहावयास मिळत आहे. घरातील सदस्यांची जुळवाजुळव करीत शेतात कचरा वेचावे लागत असल्याचे शेतकरी बोलताना दिसून येत होते.

गावोगावी बैलांची संख्याही ही आता कमी झालेली आहे.बैलजोडी ने औतफाटा बाळगून ठेवताना शेतकरी आता दिसून येत नाहीत.गावात साधारणतः कमीतकमी बैलजोडी अंदाजीत असल्याचे वास्तव चित्र कुणीही नाकारू शकत नाही.कुणबी शेतकऱ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे.आता दरवर्षी प्रत्येक शेतकरी ट्रॅक्टरद्वारे पेरणी करताना आपण पाहतो आहोत.रब्बी हंगामास सुरूवात झाल्याने शेतकरीवर्गात आगामी पीक उत्पादन संदर्भात उत्सुकता आहेच.यंदा ज्वारीचा पेरा वाढण्याची शक्यता शेतकरी वर्ग वर्तवताना दिसत आहेत. एकीकडे पेरणीची लगबग सुरू आहे मात्र,हवामान बदलाचे संकेतही मिळत आहेत.



नांदेड-महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार रवींद्र चव्हाण यांच्यासह नादेड दक्षिणसाठी आमदार मोहन हंबर्डे तर नांदेड उत्तरमधुन माजी महापौर अब्दुल सत्तार यांनी रॅली काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# नांदेड लोकसभा व विधानसभांची मतमोजणी स्वारातीम विद्यापिठात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ ऑक्टोबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापाठीच्या ज्ञान स्रोत केंद्र इमारतीमध्ये लोकसभा पोटनिवडणूक व सहा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. याठिकाणी लोकसभेसाठी ६ व विधानसभेसाठी ६ अशा १२ मतमोजणी केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच स्ट्रॉंग रूमची निर्मिती करण्यात आली आहे. लोहा, हदगाव, किनवट या तीन विधानसभा क्षेत्राची मतमोजणी त्या-त्या ठिकाणी होणार आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक एकाच वेळेस येत असल्यामुळे यावेळी जिल्ह्यातील सहा विधानसभा क्षेत्राची मतमोजणी देखील नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठात होणार आहे. अन्यवेळी नांदेड दक्षिण व नांदेड उत्तर अशीच विधानसभेची मतमोजणी शहरात होत होती. मात्र यावेळी दोन्ही निवडणुका सोबत असल्यामुळे भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, नायगाव, देगलूर, मुखेड या लोकसभा क्षेत्रातील विधानसभेची मतमोजणी देखील विद्यापिठामध्ये होणार आहे. यासाठी १२ स्ट्रॉंग रूम तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये लोकसभेतील ६ मतदारसंघातील मतपेट्या तसेच ६ विधानसभा क्षेत्रातील मतपेट्या ठेवण्यात येणार आहेत.

२० नोव्हेंबरला मतदान व २३ नोव्हेंबरला मतमोजणी असल्यामुळे केवळ २० रोजीच्या रात्री पर्यंत पोलिंग पार्टी नांदेडला पोहचतील. २१ व २२ रोजी मतपेट्या स्ट्रॉंग रूममध्ये असेल. २३ नोव्हेंबरच्या पहाटे निवडणूक विभागाच्या निर्दे शानुसार स्ट्रॉंग रूममधून मतपेटीतून उमेदवारांच्या उपस्थितीत ईव्हिएम बाहेर काढल्या जातील. त्यानंतर मतमोजणी होईल. त्यामुळे विद्यापिठाच्या उपलब्ध पायाभूत सुविधांमध्ये काही अंशिक बदल करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामकृष्ण गलधर, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता विजय पुसदकर, तहसिलदार संजय वारकड, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहायक अभियंता सावन कासलीवाल आदी अधिकारी यासंदर्भात कार्यरत आहेत. आज जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांच्यासह ललीतकुमार वऱ्हाडे, डॉ सचिन खल्लाळ आदींनी या केंद्रांची पाहणी केली.

जिल्ह्यातील लोहा, हदगाव, किनवट या मतदारसंघातील मतमोजणी त्या-त्या ठिकाणी होणार आहे. लोहा विधानसभेसाठी महसूल हॉल तहसिल कार्यालय लोहा येथे तर हदगाव विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी समाज कल्याण भवन येथे अनुसूचित जाती मुलींचे शासकीय वसतिगृह तामसा रोड हदगाव येथे होणार आहे. किनवट विधानसभेसाठी येथील आयटीआय कॉलेज येथे मतमोजणी होणार आहे.

# आचारसंहितेत महसूल, पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचुन वाळू माफियांचा धुमाकूळ

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २८ ऑक्टोबर**

ऐन आचारसंहितेत तामसा रोड मार्ग हदगाव शहरासह पूर्णा तालुक्यात अवैध वाळू माफीयांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून महसूल तथा पोलीस प्रशासन यांनी या माफियांपुढे सपशेल नांगी टाकले की यांचे या माफियांसोबत मधुर संबंध आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तरी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आबिनाश कुमार यांनी राबविलेल्या पूर्ण जिल्ह्यात ऑपरेशन फ्लॅश आऊटच्या पथकामार्फत या मुजोर व शासनाच्या करोडो रुपयांचा महसूल बुडविणाऱ्यावरती कठोरास कठोर कारवाई करावी अशी



मागणी या निमित्ताने होत आहे.

महाराष्ट्र राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही दिवसापूर्वीच आदर्श आचारसंहिता लागू झाली असून सगळ्याच विभागाचे कर्मचारी हे आप-आपले कर्तव्याचे पालन करत निवडणुकीच्या कामात व्यस्त असताना ही संधी साधून हदगाव शहरासह पूर्ण तालुक्यात तामसा मार्गाने ट्रॅक्टर, हायवा व टिप्पर च्या साह्याने होणारी अवैध वाळू वाहतूक हे रात्री दहा ते सकाळी नऊच्या सुमारास मोठ्या प्रमाणात चालू असते. विशेष म्हणजे या माफियांना कोणाचाही धाक व जरब नसल्याकारणाने यांचे मनोबल चांगलेच वाढल्याचे दिसून येत आहेत. तरी गोरगरीब जनतेच्या आवाक्यात असणारी वाळू ही आता त्यांच्या आवक्या बाहेर जात असून यामुळे त्यांच्या घर बांधकामांचे स्वप्न भंगल्याशिवाय राहणार नाहीत तरी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या अवैध वाळूला लगाम लावावी अशी मागणी या निमित्ताने जनतेतून पुढे येत आहे

## मुख्यमंत्री, अमित ठाकरे, नसीम खानसह दिग्गजांचे अर्ज दाखल, नवाब मलिक, सदा सरवणकर उमेदवारी अर्ज भरणार

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२८ ऑक्टोबर: विधानसभा निवडणुकीसाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे माजी मंत्री नसीम खान यामिनी जाधव सना मलिक यांच्यासह दिग्गज उमेदवारांनी आज मुंबई व ठाणे जिल्ह्यातील आपापल्या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले जोरदार भव्य मिरवणूक काढत वाजत गाजत भव्य मिरवणूक काढत शक्ती प्रदर्शन केले. दरम्यान , महायुतीतून उमेदवारी दाखल करण्यास पक्षातील नेतृत्वाचा विरोध असतानाही अजित पवार गटाचे आमदार नवाब मलिक व शिंदे गटातील आमदार माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज सदा सरवणकर उद्या मंगळवारी अर्ज दाखल करणार आहेत .शक्तीप्रदर्शन करीत अर्ज दाखल करण्याचा त्यांचा निर्धार आहे. मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी आज कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबीय आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक मुख्यमंत्र्यांचे वडील वडील संभाजी शिंदे, पत्नी सौ. लता शिंदे, सून सौ. वृषाली शिंदे, नातू रुद्रांश उपस्थित होते. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र आम्हीच ठाकरे यांनी शक्तिप्रदर्शन करीत माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला यावे त्यांच्या समवेत राज ठाकरे आई शर्मिला ठाकरे पत्नी, बहीण व पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते . याच मतदारसंघातून ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.नवाब मलिक यांची कन्या सना मलिक यांना अजित पवार गटाने अनुशक्तीनगर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे त्यांनी आज भव्य मिरवणूक गाडीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला त्यांच्यासमवेत त्यांचे वडील नवाब मलिक व चुलते कॅप्टन मलिक व अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजकारणात मैत्रीला किंमत नसते! उद्धव ठाकरेंच्या 'त्या' उमेदवाराला घ्यावा लागला मोठा निर्णय

छत्रपती संभाजीनगर : राजकारणात मैत्रीला किंमत नसते याची प्रचिती येणारी घडामोड महाराष्ट्राच्या राजकारणात घडली आहे. यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवाराला मोठा निर्णय घ्यावा लागला आहे. छत्रपती संभाजीनगरमधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार किशनचंद तनवाणी यांनी माघार घेतली आहे. उमेदवारी पक्षाला परत देत असल्याचं त्यांनी सांगितलंय.

या मतदारसंघात शिवसेनेचे प्रदीप जयस्वाल आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे किशन तनवाणी यांच्यात थेट लढत होणारे...२०१४ साली झालेल्या लढतीत थेट एमआयएम पक्षाला फायदा झाला आणि दोघांचं नुकसान झालं... त्यामुळे प्रदीप जयस्वाल मित्र असल्याने त्यांना उमेदवारी मागे घेण्यास सांगितल मात्र त्यांनी तसं न केल्यानं अखेर आपल्याला माघार घ्यावी लागल्याचं तनवाणी म्हणालेत...उद्धव ठाकरे देतील त्या उमेदवाराच्या पाठिशी उभं राहणार असल्याचं तनवाणी म्हणालेत...तर तनवाणीच इथे उमेदवार असणार ते नाहीच म्हणाले तर तुल्यबळ उमेदवार देणार असल्याचं अंबादास दानवे म्हणालेत. छत्रपती संभाजी नगरच्या औरंगाबाद मध्य संघातून किशनचंद तनवाणी यांनी माघार घेतली आहे. त्यामुळं आम्ही नवा उमेदवार देतोय बाळासाहेब थोरात असे नव्या उमेदवारांचे नाव आहे. उद्धव ठाकरे यांचा आदेशानुसार किशनचंद तनवाणी यांना जिल्हा प्रमुख पदावरून पदमुक्त करण्यात आले. भंडारा विधानसभा मतदारसंघात मविआत बिघाडी झाल्याचं दिसून आलं. काँग्रेसकडून पूजा ठाकर यांना उमेदवारी दिली असताना उद्धव ठाकरे पक्षाकडून नरेंद्र पाळी उमेदवारी अर्ज दाखल करतायेत. त्यांना ठाकरे पक्षाकडून एबी फॉर्म देण्यात आल्याचीही माहिती आहे. कसब्यामध्ये याहीवेळी धंगेकर पॅटर्न चालणार, असा दावा काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केलाय. धंगेकरांनी कसबा गणपतीची आरती करून उमेदवारी अर्ज भरला. पोटनिवडणुकीत भाजपाच्या हेमंत रासनेंचा धंगेकरांनी पराभव केला होता. आता पुन्हा धंगेकर विरुद्ध रासने लढत होणार आहे.

राज्याचं लक्ष लागून असलेल्या ठाण्यातील कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यांच्याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार केदार दिघे यांनीही अर्ज दाखल केला. या मतदारसंघात एकनाथ शिंदे विरुद्ध आनंद दिघेंचे पुतणे केदार दिघे असा सामना रंगणार आहे. तर अजित पवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत बारामतीतून उमेदवारी अर्ज दाखल केला. अजित पवारांचे पुतणे आणि बारामतीतील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांनी बारामतीतून अर्ज भरला. सिंधुदुर्गच्या कणकवली-देवगड मतदारसंघात महायुतीचे उमेदवार निलेश राणेंनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यापूर्वी राणेंनी सहकुटुंब त्यांच्या ग्रामदैवत भैरवनाथाचे दर्शन घेतलं. मुंबईत मनसेचे उमेदवार आणि राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी दादर-माहीम मतदारसंघामधून उमेदवारी अर्ज भरला. त्याआधी त्यांनीबाळासाहेब ठाकरे, प्रबोधनकार ठाकरे स्मृतिस्थळ आणि चैत्यभूमीवर जाऊन त्यांनी अभिवादन केलं. नंतर सिद्धीविनायक मंदिरात जाऊन दर्शन घेतलं.

## रमेश आडसकर यांचा शक्तिप्रदर्शन करत अर्ज दाखल

### विरोधकांना हाबाडा देणार : रमेशराव आडसकर

माजलगाव प्रतिनिधी : शरद पवार गटाकडून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले रमेश आडसकर यांना ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने रमेश आडसकर यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला.

रमेश आडसकर यांनी निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात प्रवेश करून उमेदवारीसाठी प्रयत्न केले परंतु पक्षाने त्यांच्या ऐवजी मोहनराव जगताप यांना पक्षाने उमेदवारी दिली. त्यामुळे रमेश आडसकर यांनी सोमवारी प्रचंड शक्तिप्रदर्शन करत अपक्ष म्हणून उमेदवारी भरला. यावेळी माजी आ. मोहनराव सोळंके, माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, अशोक होके, बबनराव सोळंके, हरिभाऊ सोळंके,विठ्ठल लगड यांची प्रमुख उपस्थिती होती. उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी शक्ती प्रदर्शन करत सभा घेतली.यावेळी बोलताना ते म्हणाले की मी मागील सत्तावीस वर्षांपासून प्रामाणिकपणे काम करत आहे.स्वर्गीय गोपीनाथ मुंडे, स्वर्गीय केशर काकू आणि स्वर्गीय बाबुराव आडसकर यांचा आदर्श घेऊन काम करनार आहे २३ दिवसापासून खेळवत ठेवले. जनतेची मला साथ आहे.या प्रवासात परिवर्तनाची लढाई आपण सर्व मिळून लढूया. मी अपक्ष उमेदवार असल्याने मतदारांनी निवडणूक हातात घ्यावी.आपल्या ताकतीवर मी विरोधकांना हाबाडा देणार असे त्यांनी सांगितले.

## वसुबारस उत्साहात, घरोघर गाय-वासरांचे पूजन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : मंगळवार, २९ ऑक्टोबर रोजी पारंपरिक पद्धतीने वसू-बारस उत्साहात साजरी झाली. दिवे लागन करून घरोघर गाय-वासरांचे मनोभावे पूजन करण्यात आले. ग्रामीण भागात दावणीला असलेल्या गायी-वासरांचे गृहलक्ष्मींनी पूजन करून दिवे लागण केली. शहरात मातीच्या गाय-वासरांची पूजा करण्यात आली.

घरांच्या अंगणात गाय-वासराच्या आकर्षक आणि सुबक रांगोळ्याही काढण्यात आल्या होत्या. उद्या, मंगळवारी २९ रोजी धनत्रयोदशी आणि धन्वंतरी पूजन आहे. दीपावलीच्या सणांमध्ये दिव्याची महत्त्व अनन्य साधारण आहे. धनत्रयोदशी या दिवशी यमराजाला प्रसन्न करून घेण्यासाठी दीपदान करण्याची प्रथा आहे. घर आणि परिसरात उंच जागी तेलाचे दिवे लावतात. या दिवशी उपवास करून श्रीगणेश विष्णू-लक्ष्मी-कुबेर, योगिनी, नाग आणि द्रव्यनिधी या देवतांचे पूजन करतात. विशेषत: या दिवशी गरिबांना, गरजूंना दिवे, गोड पदार्थ वस्त्र, धन इत्यादी गोष्टी दान करून परोपकार करण्यास सांगण्यात आले आहे. दान म्हणजे डोनेशन नव्हे. डोनेशन देताना कोणी डोनेशन दिले आणि किती आणि काय डोनेशन दिले हे जाहीर करण्यात येते. परंतु, दान हे गुप्त ठेवायचे असते. एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हाताला कळू नये, असे म्हणतात ते अगदी खरे आहे. भारतीय संस्कृतीमध्ये दानाला विशेष महत्त्व आहे. दीपावलीचा सण गरिबांनाही साजरा करता यावा, हा धनत्रयोदशीच्या दिवशी दीपदान करण्यामागील हेतू आहे. आधुनिक काळात ग्रंथदान, रक्तदान, विद्यादान, जलदान, श्रमदान, सेवादान ही दानेही करण्यास हरकत नाही.

दागिने, चोपडीपूजन

काही घराण्यांत धनत्रयोदशीच्या दिवशी घरातील दागिन्यांची साफसफाई करून त्यांची पूजा करण्याची पद्धत आहे तसेच धने आणि गूळ यांचा नैवेद्य दाखविण्याची प्रथा आहे. व्यापारी लोक धनत्रयोदशीच्या दिवशी शुभ चोपडी-वहिची वेळ पाहून नवीन वर्षातील हिशोब लिहितात. आयुर्वेदाचा प्रवर्तक धन्वंतरी याचा जन्म धनत्रयोदशीच्या दिवशी झाला, असे काही संशोधकांचे मत आहे म्हणून धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी जयंती साजरी केली जाते. या दिवशी धन्वंतरीच्या मूर्तीची किंवा चित्राची पूजा करतात. परिसरातील ज्येष्ठ व श्रेष्ठ डॉक्टरांना धन्वंतरी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्याची काही ठिकाणी प्रथा आहे. प्राचीन काळी दोन धन्वंतरी होऊन गेल्याचा उल्लेख सापडतो. यापैकी पहिला धन्वंतरी म्हणजे देवांचा वैद्य जो विष्णूचाच एक अवतार मानला जातो तर दुसरा धन्वंतरी हा आद्य धन्वंतरीचाच पुनर्रावतार मानला जातो. त्याची भारद्वाजकडून आयुर्वेद ज्ञान प्राप्त करून त्याची आठ विभागात विभागणी केली ते ज्ञान अनेक शिष्यांना दिले व आयुर्वेदावर तेरा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिले. धन्वंतरीच्या हातात अमृत कलश दाखविलेला असतो. आज संपूर्ण जगात आयुर्वेदाचा प्रचार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे, ही एक आनंद व समाधानाची गोष्ट आहे.

## आदर्श दिवाळी !

प्रस्तावना - 'तमसो मा ज्योतिर्गमय' या श्लोकाचा अर्थ : 'हे भगवंता ! आपण मला असत्याकडून सत्याकडे,अंधकारातून प्रकाशाकडे न्यावे 'अशी प्रार्थना आहे.प्रत्येक प्राणिमात्रांची धडपड प्रकाशाकडे जाण्याची असते. ज्या स्थितीत आहोत त्याच्या पुढील स्थितीत जाण्यासाठी, प्रगती करण्याकडे असते. अर्थात नकारात्मकते कडून सकारात्मकतेकडे जायचे असते. जीवनात सकारात्मकता शिकवणारा, प्रकाशाकडे वाटचाल करण्यास शिकवणारा सण म्हणजे दिवाळी.

सत्याच्या विजयाचे प्रतिक ! - प्रभू श्रीरामचंद्र हे १४ वर्षाचा वनवास पूर्ण करून दिवाळीच्या दिवशी अयोध्येत परत आले. प्रभू श्रीरामचंद्राच्या आगमनाने प्रजेला खूप आनंद झाला. त्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण अयोध्या नगरीत घरोघरी तुपाचे दिवे लावून आनंद व्यक्त करण्यात आला. प्रभू श्रीराम सत्याचे मूर्तिमंत रूप असल्याने त्यांचा विजय म्हणजे सत्याचाच विजय होता. या विजयाचा उत्सव म्हणून आपण दिवाळी दीपोत्सव, प्रकाशोत्सव म्हणून साजरी करतो.

सकारात्मकता वाढविणारा सण ! - दिवाळी जवळ येताच घर, दुकाने, आस्थापने, आपल्या आजूबाजूचा परिसर,शहर यांची स्वच्छता सुरू होते. जाळे जळमटे काढून रंगरंगोटी केली जाते. तुटक्या फुटक्या साहित्याची डागडुजी होते. त्यामुळे स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांसोबतच वातावरणातील सकारात्मकता वाढते. त्याचा प्रत्येक जिवाच्या मन आणि बुध्दीवर सकारात्मक परिणाम होतो. मनातील नकारात्मकता दूर होऊन आपल्याला आनंद प्राप्त होतो.

गुणवृद्धीसाठी लक्ष्मीपूजन ! - लक्ष्मीपूजन हे अश्विन अमावस्येला संध्याकाळी करतात. तसेच रात्री बारा वाजता अलक्ष्मी निःसारण करतात. शास्त्रानुसार लक्ष्मीपूजनामुळे पूजाकरणाऱ्याला लक्ष्मी तत्वाचा लाभ होतो. तो टिकवून ठेवण्यासाठी धर्माचरण करणे आवश्यक आहे. अधर्माची कास धरली किंवा कर्ते पणा निर्माण झाला तर आपण स्थिर राहू शकत नाही. लक्ष्मी चंचल आहे ! असे म्हणतात, पण खरेच लक्ष्मी चंचल आहे का ? याचे उत्तर नाही असे आहे. ती नेहमीच भगवंताच्या अनुसंधानात स्थिर असते. जेथे अनुसंधान असते, जिथे धर्माचरण असते तिथे लक्ष्मी विराजमान होते. ऐश्वर्य, सौंदर्य, शांती, सत्य, समृद्धी आणि संपत्ती याची अधिष्ठात्री देवी श्री लक्ष्मी कमलासनावर विराजमान होऊन समुद्रमंथनातून आली. अशा या लक्ष्मीचे वर्षातून केवळ एकदा पूजन करून ती प्रसन्न होईल का ? तिला प्रसन्न ठेवायचे असेल तर कमळ ज्या प्रमाणे चिखलातून बाहेर येते त्या प्रमाणे स्वभाव दोषांचा चिखल दूर सारून धर्माचरण करायला हवे. असे धर्माचरण करीत ईश्वराच्या अनुसंधानात रममाण झाल्यास श्री लक्ष्मी हृदयकमळावर निश्चितच विराजमान होईल. तसेच धन धान्याच्या रूपात आपल्याजवळ स्थिर होईल. आपल्यातील दुर्गुण घालविण्यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे, तेच खऱ्या अर्थाने अलक्ष्मी निःसारण होय.

सांप्रत काळातील दिवाळीचे बदलते स्वरूप ! - समृद्धीकडे, आनंदाकडे, प्रकाशाकडे नेणारी दिवाळी



आहे. परंतु, सद्य परिस्थिती बघता दिवाळी म्हणजे देवता, थोरपुरूष यांची चित्रे असणाऱ्या फटाक्याची आतशबाजी, चित्रपटातील गाण्यांनी रंगणारी दिवाळी पहाट, डोळ्यांना त्रासदायक आणि घातक ठरणाऱ्या चिनी दीपमाळा आणि आकाशदिवे यांचा झगमगाट या सगळ्यामुळे दिवाळीचे संपूर्ण स्वरूप बदलून गेले आहे. यामुळे नकारात्मकता वाढते आहे. ज्या लक्ष्मीची घरात पूजा करतो तिचेच फोटो असलेले फटाके फोडून आपण चिंध्या करतो. हे योग्य आहे का ? अश्याने ती प्रसन्न होईल का ? घरात केलेल्या पूजेचा काही परिणाम न होता यातून देवतांचे विडंबन होणार आहे. या विडंबनातून होणारे पातक जर आपल्या कृतीतून घडत असेल तर ती पूजा फलित होईल का ? त्याचप्रमाणे अश्या चुकीच्या कृतीमुळे युवा पिढी समोर आपण काय आदर्श ठेवणार ? याचा विचार करायला हवा. स्वदेशी आणि पारंपरिक सहित्यापेक्षा झगमगाट आणि इन्स्टंटकडे कल वाढतो आहे.हि परिस्थिती बदलायला हवी त्यामुळे आपल्याला दिवाळीचा खरा आनंद मिळू शकेल.

आदर्श दिवाळी साजरी करण्याचे ध्येय घेऊया ! - देवता, थोरपुरूष यांच्या फटाक्यांची विक्री होत असल्यास हिंदूंनी एकत्र येऊन त्या विषयी प्रबोधन करायला हवे. आपल्या संपर्कात येणाऱ्या बाल आणि युवकांचे प्रबोधन करायला हवे.दिवाळी पहाट मधे होणाऱ्या अशास्त्रीय आणि अश्लील गाण्यांच्या ऐवजी भावभक्ती तसेच देशप्रेम निर्माण करणाऱ्या गाण्यांसाठी आग्रह धरायला हवा.भावी पिढीचा कौशल्य विकास व्हावा, त्यांच्यात हिंदूधर्म - राष्ट्र - संस्कृती विषयी प्रेम आणि कृतज्ञता भाव निर्माण व्हावा यासाठी रांगोळी स्पर्धा, किल्ले स्पर्धा, परिसर स्वच्छता आणि सजावट स्पर्धा घ्यायला हव्या.शरीर आणि पर्यावरणावर घातक परिणाम करणारे विदेशी आणि चिनी उत्पादने न घेता स्वदेशी आणि हलाल मुक्त उत्पादने घेऊया. त्या विषयी स्वतः जागरूक राहून कृती करुन इतरांनाही जागृत करायला हवे.

अशी आदर्श दिवाळीच आपल्याला ' मृत्योर्मा अमृतं गमय'

अर्थ : मृत्यूपासून जीवनाकडे वाटचाल करायला शिकवते. त्यातूनच आपले जीवन अमृता समान आनंदी होत असते.

आपल्या कुलदेतेचे स्मरण करून तिला प्रार्थना करूया,

'हे भगवंता! आपणच आमच्या कडून आदर्श दिवाळी यंदाच्या वर्षी पासून साजरी करवून घ्या. आमच्या वैयक्तिक उन्नती सोबतच राष्ट्र - धर्म यांच्या रक्षणासाठी आणि उन्नतीसाठी आमच्याकडून धर्माचरण करून घ्या हीच प्रार्थना आहे.'

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

**संपर्क- ९२८४०२७१८०**



**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 231 - Ashti**

**Name of the candidate : SURESH RAMCHANDRA DHAS**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | **Criminal antecedents** | | |
| 1 | a. | Nature of the offences | 1) FIR No. 0386/2022, u/s. 420, 465, 467, 468, 171, 120B, 109 of IPC, Sec. 13(1), (A), (B), 13 (2) of Prevention of Corruption Act, 1988, with Ashti Police Station, Beed.<br>2) FIR No. 207/2020, u/s. 188, 269, 270 of IPC, Sec.51(B) of Disaster Management Act-2005 with Amalner Police Station, Beed.<br>3) FIR No. 0224/2021, u/s. 143, 147, 148, 149, 427, 448, 504, 506 of IPC with Ashti Police Station, Beed.<br>4) FIR No. 0117/2021, u/s. 188, 269, 270 of IPC, Sec.51(B) of Disaster Management Act-2005 & Sec. 2, 3, 4 of the Epidemic Diseases Act, 1897 with Peth Beed Police Station, Beed.<br>5) FIR No. 161/2020, u/s. 188, 269, 270 of IPC, Sec.51 (B) of Disaster Management Act-2005 with Shirur Kasar Police Station, Beed. |
| | b. | Case no. | 1) Nil<br>2) SCC No. 203/2022<br>3) RCC No. 141/2022<br>4) SCC No. 104/2022<br>5) SCC No. 12/2021 |
| | c. | Name of the Court | 1) 2nd Jt. CJJD & JMFC, Patoda, Beed.<br>2) Civil & Criminal Court, Ashti, Beed.<br>3) Chief Judicial Magistrate, Beed.<br>4) 1st Civil Judge J.D., JMFC, Shirur, Beed. |
| | d. | Whether charges have been framed or | 1) No<br>2) No<br>3) Yes<br>4) Yes<br>5) No |
| | e. | Date of conviction, if any | NIL |
| | f. | Details of punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | The Cases are still under consideration before Hon'bl Court. |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **Suresh Ramchandra Dhas** has been Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 231 - Ashti**

**Name of the candidate : SURESH RAMCHANDRA DHAS** ............................ and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President,**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Date : 28/10/2024**

**Place : Mumbai**

# आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी केला अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ ऑक्टोबर**

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, एसआयपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी सोमवार, दिनांक २८ ऑक्टोबर रोजी केज तहसील कार्यालयात सहकाऱ्यांसह जाऊन अत्यंत साध्या पद्धतीने आपला २३२ केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.



प्रारंभी केज विधानसभा मतदारसंघासाठी भाजप - महायुतीतर्फे उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सोमवारी सकाळी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या गोपीनाथ गड (परळी वैजनाथ) या स्मृतीस्थळी नतमस्तक होत अभिवादन केले. तसेच उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी केज विधानसभा मतदारसंघाच्या भाग्यविधात्या स्वर्गीय डॉ.विमलताई मुंदडा यांच्या चनई (अंबाजोगाई) येथील स्मृतिस्थळी नतमस्तक होत अभिवादन केले. केज तहसील कार्यालयात सहकाऱ्यांसह जाऊन अत्यंत साध्या पद्धतीने आपला २३२ केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्यासोबत ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा, भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण आदींसह महायुतीतील घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, आशीर्वाद जनतेचा, आणि वसा केज विधानसभेच्या प्रगतीचा घेऊन आम्ही काम करीत आहोत. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आरपीआय (ए), एसआरपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या २३२ केज विधानसभेच्या अधिकृत उमेदवार म्हणून मी नमिता मुंदडा आज रोजी केज विधानसभेतील जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा निवडणूक लढविण्यासाठी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. केजच्या जनतेने २०१९ मध्ये मला सर्वप्रथम आमदार केले मिळालेल्या संधीचे मी विकास कामे करून सोने करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मागील पाच वर्षांत आम्ही जनतेसाठी पूर्ण वेळ उपलब्ध राहिलो. या काळात आम्ही जनतेची सेवा केली. पाच वर्षे संपली आहेत. आम्ही परीक्षेसाठी पुन्हा नव्याने सज्ज झालो आहोत. आम्हाला विश्वास आहे. की, जनता आम्हाला या परीक्षेत ही पुन्हा उत्तीर्ण करेल. जनता आम्हाला परत एकदा पाच वर्षांसाठी निवडून देईल. सगळ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. जनता आम्ही केलेल्या विकासकामांना समोर ठेवून नक्कीच आम्हाला मतदान करतील. आम्ही आरपीआय सह सर्वांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. विकास हाच आमचा मुख्य मुद्दा आहे. आम्ही पाच वर्षांत सातत्यपूर्ण जनसंपर्क ठेवला आहे. मूलभूत सुविधा पुरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या पाच वर्षांत जे करता आले नाही. ते पुढील पाच वर्षांत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असा विश्वास माजी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी व्यक्त केला. यावेळी महायुतीच्या सर्व पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# साध्या पध्दतीने आ.लक्ष्मण पवारांनी भरला आपला उमेदवारी अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२७ ऑक्टोबर**

गेल्या दहा वर्षां पुर्वी मतदारसंघात असलेली परिस्थिती व आज मतदार संघात झालेला बदल जनतेला माहीत आहे पुर्वी गोरगरीब रेशनकार्ड धारकास राशन मिळत नव्हते पण आमदार म्हणून गेवराई तालुक्यातील राशन वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करीत बायोमेट्रिक प्रणाली सुरु करुन गोरगरीबांना हाक्काचे राशन मिळवुन देण्यासाठी केलेले प्रमाणिक प्रयत्न जनता कधीच विसरणार नाही असा मला विश्वास आसल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी म्हटले आहे

मतदारसंघातील लोकप्रिय आमदार लक्ष्मण माधवराव पवार यांनी आज दि.२८ ऑक्टोबर रोजी एकदम साध्या पध्दतीने आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला



यावेळी शिवराज पवार जे.डी. शहा, राहुल खंडागळे,शिनुभाऊ बेद्रे,धम्मपाल सौदरमल, जमील सेठ, काशिनाथ पवार, आदीच्या उपस्थितीत आ.लक्ष्मण पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे

# रमेश आडसकर यांचा शक्तिप्रदर्शन करत अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ ऑक्टोबर**



शरद पवार गटाकडून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले रमेश आडसकर यांना ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने रमेश आडसकर यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला.

रमेश आडसकर यांनी निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात प्रवेश करून उमेदवारीसाठी प्रयत्न केले परंतु पक्षाने त्यांच्या ऐवजी मोहनराव जगताप यांना पक्षाने उमेदवारी दिली. त्यामुळे रमेश आडसकर यांनी सोमवारी प्रचंड शक्तिप्रदर्शन करत अपक्ष म्हणून उमेदवारी भरला. यावेळी माजी आ. मोहनराव सोळंके, माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, अशोक होके, बबनराव सोळंके, हरिभाऊ सोळंके,विठ्ठल लगड यांची प्रमुख उपस्थिती होती.उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी शक्ती प्रदर्शन करत सभा घेतली.यावेळी बोलताना ते म्हणाले की मी मागील सत्तावीस वर्षांपासून प्रामाणिकपणे काम करत आहे.स्वर्गीय गोपीनाथ मुंडे, स्वर्गीय केशर काकू आणि स्वर्गीय बाबुराव आडसकर यांचा आदर्श घेऊन काम करनार आहे २३ दिवसापासून खेळवत ठेवले. जनतेची मला साथ आहे.या प्रवासात परिवर्तनाची लढाई आपण सर्व मिळून लढूया. मी अपक्ष उमेदवार असल्याने मतदारांनी निवडणूक हातात घ्यावी.आपल्या ताकतीवर मी विरोधकांना हाबाडा देणार असे त्यांनी सांगितले.

# ट्रॅक्टर चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेने आणली उघडकीस

## चार आरोपी निष्पन्न करुन चोरीस गेलेला ट्रॅक्टर केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**

पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी वाहन चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी वाहन सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक २७/१०/२०२४ रोजी पो.स्टे.माजलगाव ग्रामीण गुरनं २२७/२०२४ कलम ३०३(२) इछड मधील ट्रॅक्टर चोरीचा स्थानिक गुन्हे शाखा,बीड समांतर तपास करीत असतांना स्थागुशा येथील पोलीस हवालदार जफर पठाण यांना ट्रॅक्ट चोरी केलेल्या आरोपीची गोपनिय माहिती मिळाली की, इमस नामे रोहन अभंग हा अंमलवाडी येथे फाटा येथे ट्रॅक्टर घेवुन आल्याची माहिती मिळाली तेव्हा पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांनी पुढील कारवाई करण्यासाठी ग्रे.पोउपनि श्री. हनुमान खेडकर यांचे पथकास पाचारण केले. स्था.गु.शा.पथकाने अंबलवाडी फाटा ता.परळी वै. येथे सापळा रचुन अंमलवाडी फाटा ता.परळी वै. येथे उभा असलेल्या ट्रॅक्ट वरील संशयीत दोन इसमांना ताब्यात घेतले त्यांची नावे १) हनुमंत सिताराम वय २८ रा.अंबलवाडी ता.परळी वै. २) रोहन अनिल अभंग वय २८ रा. संगमनेर ता.अहिल्यानगर(अहमदनगर) असे सांगितले तेव्हा त्यांना ट्रॅक्टर बाबत बारकाईने चौकशी केली असता त्यांनी सदर टॅक्टर पवारवाडी शिवार माजलगाव येथुन त्यांच्या इतर दोन साथीदारांसह मिळुन ट्रॅक्टर चोरी केल्याचे सांगितले.



निष्पन्न आरोपीचे ताब्यातुन वर नमुद गुन्हयातील एक गुन्हयात गेलामाल स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर रोटरसह कि.अं.३,००,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळुन आलेले दोन आरोपी व जप्त ट्रॅक्टर पो.स्टे.माजलगाव ग्रामीणचे ताब्यात देण्यात आला असुन पुढील तपास पो.स्टे.माजलगाव ग्रामीण करीत आहेत. इतर दोन निष्पन्न आरोपींचा शोध स्थागुशा व पो.स्टे.घेत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली ग्रेपोउपनि श्री. हनुमान खेडकर, पोह/ जफर पठाण, महेश जोगदंड, देविदास जमदाडे, तुषार गायकवाड, पोअं/बप्पासाहेब घोडके, अश्विनकुमार सुरवसे, चालक गणेश मराडे यांनी केली आहे.

# गडचिरोलीच्या झाडीपट्टी रंगभूमीवरिल गद्दार नाटकाला उदंड प्रतिसाद, नाट्य परिषदेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ ऑक्टोबर**

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद बीडच्या वतीने १०० व्या नाट्यसंमेलना निमित्त झाडीपट्टी रंगभूमी वरिल गद्दार या नाटकाचा नुकताच बीड येथे प्रयोग संपन्न झाला. या प्रयोगास बीड येथील रसिकांनी उदंड असा प्रतिसाद दिला व कलावंताचे भरभरून कौतुक केले. या प्रसंगी बीड अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते सर्व कलावंताचे व तंत्रज्ञ यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.



गडचिरोली,चंद्रपूर,भंडारा व गोंदिया या पूर्व वैर्दभिय भागात होणारा ह्या नाटकाच्या प्रकाराला झाडीपट्टी रंगभूमी म्हणतात १५० वर्षाची परंपरा असलेले या रंगभूमीवरील गद्दार हे नाटक खास बीडच्या रसिकांसाठी सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात जसे आहे तसे म्हणजे ज्या शैलीने ज्या पार्श्वभूमीवर नाटक घडत तर बीडला हे नाटक झाले. म्हणजे एक माईक, प्रॉक्टींग, लाऊड अभिनय, रंगीत पडदे,लाईव्ह संगीत गाणे, नृत्य,संपूर्ण कथानक त्यातील पात्र, भाषा,आदिचा वापर केला गेला. गद्दार नाटकाचे लेखक आनंद भिमरे हे होते तर दिग्दर्शक नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष नरेशा गडेकर यांनी केले आहे. निर्मात्याची जबाबदारी नित्यानंद बुध्दे पाटील यांनी पार पाडली. नेपथ्य प्रमोद ढोंगे,प्रकाश योजना नरेश भोयर, संगीत राकेश राऊत , ज्ञानेश्वर बोटंकावार, राधेशाम दोनाडकर, व्यवस्थापक प्रफुल्ल फुकटे, अ.भा.मराठी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेच्या संयोजनात गद्दार नाटकात खालील कलावंतानी सहभाग घेतला. असावरी तिडके, अरविंद झाडे, देवेंद्र लुटे, शुभम मसाराम, निशांत अजबेले, चैतन्य डुबे, करिष्मा मेश्राम, सुनैना खोब्रागडे, देवेंद्र दोडके, व नरेश गडेकर बालकलावंत गंधर्व नरेश गडेकर आदि. यावेळी सर्व कलावंताचे कौतुक करण्यात आले. सर्वच कलावंतानी अतिशय उत्तम अभिनय केला. यावेळी कार्यकारिणी सदस्य प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, नियामक मंडळ सदस्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,भरत आण्णा लोळगे,विद्यासागर पाटांगणकर सह नाट्य परिषदेचे सर्व सदस्य, नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी , बीड व आसपासचे नाट्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये आजी आजोबा दिवस अद्वितीय सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ ऑक्टोबर**

आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलतर्फे 'ग्रँड पेरेंट्स डे' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सध्याच्या परिस्थितीत आई-वडील नोकरी किंवा व्यवसायासाठी घराबाहेर असतात, त्यामुळे मुलांच्या संगोपनात आजी-आजोबांचा मोलाचा सहभाग असतो. शाळेबाहेर मुलं आजी-आजोबांसोबत अधिक वेळ घालवतात, त्यामुळे त्यांचे अनुभव आणि संस्कार मुलांच्या जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. या पार्श्वभूमीवर आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलने 'आजी-आजोबा दिवस' या अनोख्या सोहळ्याचे आयोजन केले.



या सोहळ्याची सुरुवात ढोल-ताशांच्या गजरात आजी-आजोबांचे जल्लोषात स्वागत करून झाली. रॅम्प वॉकच्या माध्यमातून नातवांसह आजी-आजोबांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. सिनियर केजी वर्गातील विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांसाठी विशेष स्वागत गीत सादर केले, तर नर्सरी व ज्युनिअर केजीच्या मुलांनी विविध नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमादरम्यान, जुन्या काळातील विटी-दांडू, काच-कांग्ड्या, गोट्या, चक्का यांसारखे पारंपरिक खेळ आजी-आजोबांसाठी आयोजित करण्यात आले. तसेच, त्यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांच्या काळातील चित्रे रेखाटून सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला होता. हे सर्व पाहून आजी-आजोबा आपल्या बालपणात रंगून गेले.

कार्यक्रमात आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांविषयी एक अद्भुत नाटक सादर केले, ज्यामुळे उपस्थित सर्वजण भावूक झाले. या वेळी शाळेच्या संस्थापिका भाग्यश्री करवा मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि सांगितले की, आजी आजोबा आणि नातवंडांचे नाते हे विलक्षण असते. संचालक सागर करवा सर यांनी या नात्यातून खऱ्या अर्थाने जडणघडण होत असल्याचे सांगितले.त्यानंतर, शाळेच्या व्हाइस प्रिन्सिपल बिंदू मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पुनम ललवाणी मॅडम व अंकिता लाटे मॅडम यांनी केले. या सोहळ्याचे यश संपूर्ण शिक्षक वृंदाच्या अथक परिश्रमांमुळे साध्य झाले.

# आ.प्रकाश सोळंके आज उमेदवारी दाखल करणार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ ऑक्टोबर**

राष्ट्रवादी अजित पवार गट, भाजपा, शिवसेना शिंदे गट, आरपीआय यांचे संयुक्त उमेदवार माजलगाव विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार प्रकाश दादा सोळंके आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तर हा डाव देखील जिंकता येईल – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ ऑक्टोबर**

बढता बढता कारवा बन गया अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. स्व. काकू - नाना हे आपल्यासाठी शक्तीपीठ आहे आपण एवढा मोठा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद दिला हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे आता आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तरच पुढचा डाव जिंकता येईल असे भावनिक आवाहन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.रविवार दि.२७ रोजी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे आगमन होणार असल्याची माहिती मिळतात तरुण कार्यकर्त्यांनी पाडळसिंगी टोल नाक्यापासून ते बीड शहरापर्यंत भव्य मोटरसायकल रॅली काढून स्वागत केले २००० गाड्यांचा ताफा जेव्हा शहरातून जात होता तेव्हा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर देखील भारावून गेले होते. रस्त्यात ठीक-ठिकाणी लोकांचा समुदाय त्यांच्या स्वागतासाठी उभा होता. अनेक कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी तोफांची सलामी देत आपल्या लाडक्या नेत्याचे स्वागत केले. स्व.काकू-नाना यांच्या समाधीला अभिवादन केल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला.




# सत्तेत असो किंवा नसो माझ्या मातीतील माणसांची सेवा करण्याची शक्ती प्रभू वैद्यनाथ आणि मला द्यावी-धनंजय मुंडे

**मुंबईतील चेंबूर व ठाण्यातील घोडबंदर येथील परळीकरांशी धनंजय मुंडेंनी साधला संवाद**
**सेवा हीच माझी जात आणि विकास हाच माझा धर्म – धनंजय मुंडे यांची साद**

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.२७ ऑक्टोबर**

मी आज इथपर्यंतचा प्रवास केला तो माझ्या परळीतील जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर केला. परळी जनता आणि मी यांच्यात जिव्हाळा आणि विश्वासाचे नाते आहे. परळीचा माणूस पुण्या मुंबईतच काय देशाच्या पाठीवर कुठेही राहत असला तरी त्याच्या प्रत्येक अडीअडचणीला धावून जाणे हे माझे कर्तव्य आहे. आपण सत्तेत असोत किंवा नसोत, मात्र आपल्या मातीतील माणसाची सेवा करण्याचे बळ मात्र मला प्रभू वैद्यनाथाने द्यावे, अशी मी कायम प्रार्थना करत असतो, असे वक्तव्य धनंजय मुंडे यांनी मुंबईत बोलताना केले आहे.





मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या निर्देशानुसार २३० - बीड विधानसभा मतदार संघातून शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.



केज राखीव जागेसाठी सोमवारी माजी आ.संगीताताई ठोंबरे यांनी उमेदवारी दाखल केली.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## सासरच्यांकडून विवाहितेचा छळ

छत्रपती संभाजीनगर : महिनेच्या चारित्र्यावर संशय घेत लग्नात सोन्याची अंगठी चैन दिली नसल्याने सासरच्या मंडळींनी विवाहितेचा छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २७ ऑक्टोबर रोजी कोपरखैरे पोलीस ठाणे नवी मुंबई परिसरात घडली. पती महादेव निवृत्ती कांबळे, सासू रत्नाबाई निवृत्ती कांबळे, नणंद कालींदा वैजनाथ कांबळे, रेखा महादेव सुरासे अशी आरोपींची नावे आहेत. महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार लग्न झाल्यानंतर फिर्यादी महिलेवर चारित्र्याचा संशय घेऊन लग्नामध्ये दोन तोळ्याची सोन्याची अंगठी व चैन मागितली असता श्री आणि महिलेच्या आई-वडिलांनी दिली नाही म्हणून फिर्यादी महिलेचा शारीरिक मानसिक तसेच आर्थिक त्रास देऊन छळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अनोळखी पदार्थाचे सेवन केलेल्या तरुणाचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : सासरवाडीत अनोळखी पदार्थाचे सेवन केलेल्या एका तरुणाचा घाटी रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. सोमीनाथ एकनाथ कर्डीले (वय ३८, रा. मांजरी, ता. गंगापूर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमीनाथ कर्डीले यांनी २१ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास भोकरदन तालुक्यातील जोनपूर येथे सासरवाडीत अनोळखी पदार्थाचे सेवन केल्याने त्रास होत होता. कुटुंबियांनी त्यांना प्रथम सिल्लोड सरकारी दवाखान्यात दाखवून घाटीत दाखल केले होते. मात्र उपचार सुरु असताना आज रविवारी (दि २७) रात्री एक वाजेच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

## विषारी द्रव्य प्राशन केल्याने मुलीचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : रागाच्या भरात विषारी द्रव्य प्राशन केलेल्या मुलीचा घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. छाया कोंडीराम शिसोदे ( वय १६, रा. हिवरा, ता. फुलंब्री ) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. छायाने २६ ऑक्टोबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजेच्या सुमारास घरी विषारी द्रव्य प्राशन केले होते. कुटुंबियांनी तिला बाबरा येथे उपचार करून घाटीत दाखल केले होते. मात्र उपचार सुरु असताना दुपारी एक वाजेच्या सुमारास तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी पिशोर पोलीस ठाण्यात नोंद करून पोलीस तपास करीत आहेत.

## गळफास घेऊन आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : रागाच्या भरात महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली असून ही घटना आज रविवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास बजाजनगर मधील सारा व्यकटेश सोसायटीमध्ये घडली आहे. रुपाली मयूर अन्व्हेकर (वय २५, मूळ रा. शिरपूर, जि. वाशिम) असे आत्महत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे. रुपाली यांनी आज पहाटे घरातील किचन मधील छताच्या हुकला साडी बांधून गळफास घेतला. ही बाब कुटुंबियांच्या लक्षात आल्याने त्यानी रुपाली यांना घाटी रुग्णालयात बेशुद्धावस्थेत आणले. मात्र पहाटे पावणे पाच वाजेच्या सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात नोंद करून पोलीस तपास करीत आहेत.

## शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू

सिल्लोड, (प्रतिनिधी): पिकाला पाणी देण्यासाठी विहिरीवर कृषिपंप चालू करण्याकरिता गेलेल्या तरुण शेतकऱ्याचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना पिंपळगाव (ता. सिल्लोड) येथे रविवारी (दि. २७) सकाळी उघडकीस आली. परमेश्वर हरिचंद गुंजाळ असे शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी, घेत शिवारातील शेतात पिकाला पाणी देण्यासाठी परमेश्वर गुंजाळ हे पहाटे ते चारच्या दरम्यान विहिरीवर गेले होते. मात्र कृषीपंप चालू करताना त्यांना शॉक लागला. ही बाब समजताच बाजूचे शेतकरी धावून आले.

# शहरवासीयांचा दिवाळीचा पहिला दिवस पाण्याविना

## बाराशेची पाईपलाईन फुटल्याने शहरात पाण्याचा ठणठणाट!

छत्रपती संभाजीनगर : शहराला पाणीपुरवठा करणारी १२०० मिमी व्यासाची मुख्य जलवाहिनी पिंपळवाडी येथे रविवारी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास फुटली आहे. जलवाहिनी दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली असली तरी काम पूर्ण होण्यास रात्र होण्याची शक्यता आहे. दिवाळी सणाच्या पहिल्याच दिव्याला शहरवासीयांच्या घशाला कोरड पडली आहे. तर पहिलाच दिवस पाण्याविना साजरा करण्याची वेळ शहरवासीयांवर आली आहे.

शहराचा पाणीपुरवठा दिवाळी सणात सुरळीत करण्याचा मनपाचा प्रयत्न सुरू असताना रविवारी मध्यरात्री दुपारी पिंपळवाडी जवळ शहराला पाणीपुरवठा करणारी १२०० मिमी व्यासाची मुख्य जलवाहिनी अचानक फुटली. जलवाहिनी फुटल्याने रस्त्यावरून पाण्याचे पाट वाहत होते. मनपा प्रशासनाला जलवाहिनी फुटल्याची माहिती मिळताच तातडीने जायकवाडीतून पाणी उपसा बंद केला. त्यानंतर मनपाचे कार्यकारी अभियंता आणि कामगारांनी शहरवासीयांचा दिवाळीचा...

तातडीने पिंपळवाडी येथे धाव घेतली. ही जलवाहिनी रिकामी करण्याचे काम सुरु केले.

कर्मचारी घटनास्थळी ढोरकिन व फारोळा जलशुद्धीकरण केंद्रात पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याची हि सहावी घटना असल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात आहे. वारंवार जलवाहिनीच्या दुरुस्ती ची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असताना हि जलवाहिनी फुटायची वेळ चुकत नाही.

घटनास्थळी महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी आणि फारोळा जलशुद्धीकरण केंद्रातील स्थानिक कर्मचारी यांच्या वतीने दुरुस्ती चे काम सुरू आहे.

कोणत्या जलवाहिनीचा कुठे पुरवठा ?

शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ७०० आणि १२०० मिलीमीटर व्यासाची पाणीपुरवठा योजना सध्या अस्तित्वात आहे. ७०० मिलीमीटर व्यासाच्या पाणीपुरवठा योजनेतून जुन्या शहराला पाणीपुरवठा होतो, तर १२०० मिलीमीटर व्यासाच्या पाणीपुरवठा योजनेवरून उर्वरित शहराला पाणीपुरवठा केला जातो.

काय घडला प्रकार ?

रविवारी मध्यरात्री १.४५ वाजता जायकवाडी पंप हाऊसची लाईट गेल्याने पंपिंग बंद झाली. त्यानंतर १.५५ वाजता लाईट आल्यानंतर जायकवाडी येथील पंपिंग सुरू करण्यात आली. परंतु १२०० मी मी व्यासाच्या जलवाहिनी चे प्रेशर झिरो दाखवत होते. तसेच फारोळा येथे पाणी पडत नव्हते. फारोळा ते जायकवाडी पर्यंत जलवाहिनी तपासण्यात आली असता जायकवाडी धरणात पिंपळवाडी येथे १२०० मी मी व्यासाच्या जलवाहिनीचा पाईप फुटल्याचे दिसून आले. त्यामुळे १२०० मी मी व्यासाच्या जलवाहिनीतून पाणी पुरवठा बंद आहे. दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

आजारांनी शहराला पछाडले...

शहरात गेल्या काही दिवसांपासून सर्दी खोकल्याची साथ पसरली असतानाच, डेंग्यू आणि मलेरियाच्या हिवताप चिकनगुनिया कावीळ या साथीसह कोरोना सारख्या विषाणूनही डोकेवर काढले असून अशा विविध आजारांनी शहर पछाडले असतानाच पाणीटंचाईचे संकट शहरवासीयांसमोर उभे आहे. अशा परिस्थितीत कोरडधा पाण्यात डासांची उत्पत्ती जास्त होत असल्यामुळे पाणी साठवून ठेवणे देखील नागरिकांना धोक्याचे झालेले आहे. मात्र शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटली. त्यामुळे शहरवासीयांकडे कुठलाही पर्याय उरला नसल्याने पाणीटंचाईची झळ शहरवासीयांना सोसावी लागत असून नागरिकांचे आरोग्य पुन्हा धोक्यात येणार का अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## हिंदी विद्यालयात आकाश कंदीलातून केली मतदान जनजागृती

छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व अंगी असणाऱ्या सुप्त कलाविष्कारांना वाव मिळावा, राष्ट्रसेवेत त्यांचा सहभाग असावा. यासाठी शाळेमध्ये वर्षभर विविध सहशालेय व अभ्यासक्रमपूरक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून विद्यावर्धक समितीद्वारा संचालित शहागंज येथील महाराष्ट्र हिंदी विद्यालयामध्ये दिवाळीच्या निमित्ताने आकाश कंदीलातून मतदानावर जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र तायडे,

पर्यवेक्षक योगेश्वर निकम, कलाशिक्षक सोपान करवंदे, सोनाली वाकळे, उपक्रमशील शिक्षक संदीप भदाणे, अनिता मुदिराज, सविता नागकीर्ती, गोविंद गायकवाड, सोनाली देसले, साहेबराव पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दीपावलीनिमित्त मराठी, हिंदी व सेमी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक आकर्षक व वैविध्यपूर्ण आकारातील आकाशकंदील स्वतः कल्पकतेने बनवले. व त्यावर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये व पालकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने चला लोकशाहीचा उत्सव साजरा करूया, चला उठा चला मतदानाला, मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो, लोकतंत्र बचाने के लिए तू वोट कर बाबा तू वोट कर, वृद्ध असो की जवान सर्वजण करा मतदान. अशा प्रकारचे मतदान जनजागृतीचे संदेश देण्यात आले.

यावेळी अनिता मुदीराज यांच्या विशेष पुढाकाराने मतदान जनजागृतीपर विद्यार्थिनींनी नाटिका तयार करून लोकशाही उत्सवाचा जागर केला. यावेळी विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी मतदान संकल्पपत्राचे व मतदार मार्गदर्शिकेचे वितरण करण्यात आले. मुख्याध्यापक रवींद्र तायडे यांनी पालकांना निवडणुकीच्या दिवशी मतदान करण्यास सांगा असे आवाहन केले. संदीप भदाणे यांच्या पुढाकाराने दिवाळी सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक फराळ म्हणून छात्र प्रबोधन दिवाळी अंकाचे वितरण करण्यात आले. प्रथम सत्र परीक्षा संपताच दिवाळी सेलिब्रेशन जल्लोषात करून विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांना प्राधान्य देण्याच्या उद्देशाने कार्यानुभव व चित्रकला शिक्षकांची मदतीने रंगीबेरंगी पर्यावरणपूरक आकाश कंदील व विविध कलाकृती साकारण्यात आल्या. शाळेमध्ये असे वेगवेगळे उपक्रम राबवत असल्याबद्दल विद्याथ्यर्थ्यांमध्ये चैतन्य व आनंददायी वातावरण निर्माण होते असे मत संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रदेव कवडे, उपाध्यक्ष प्रा. सुरेश पुरी, सचिव डॉ. नारायण वाकळे, जिल्हाधिकारी कार्यालया अंतर्गत मतदारांचे योग्य शिक्षण आणि निवडणूक सहभाग विभाग स्वीपचे अधिकारी विजय पाटोदी, भास्कर शिंदे यांनी व्यक्त केले.

## निराधार, विधवा महिलांसाठी दिवाळी भेट उपक्रमासाठी मदतीचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : दरवर्षी प्रमाणे यंदाही निराधार विधवा भगिनींनीसाठी मदतीचा हात पुढे करत समाज बांधवांना आवाहन शिवराणा सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

हातचे आलेले पिकसुद्धा गेल्याने कसली दिवाळी अशी परिस्थिती शिवराणा सेवा संघाच्या वतीने पाहणी करून ग्रामीण विधवा निराधार त्यांचे मुलं लहान आहेत. अशासाठी हा उपक्रम यांत देणगी देणाऱ्या च्या हस्ते मदतीचा हात कार्यक्रम मिठाई दिवाळी फराळ - कपडे आदी वाटप करण्यात येते. हा उपक्रम यावर्षी देखील हाती घेतला असून यातून सामाजिक बांधिलकी जोपासली जाणार आहे. दिपावली सण जवळ आला आहे. बाजारात खरेदीसाठी गर्दी ऊसळत आहे. परंतु ज्या घरातील कमावत्या पुरुषाचे निधन झाले आहे, त्या घरातील - त्या विधवा बहिणीचे काय..? तिच्या घरात सुद्धा दिवाळीचा दिवा पेटावा, मुलांना फराळाचे पदार्थ चाखायला मिळावे, साडी मिळावी यासाठी तसेच आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांनाच्या परिवाराचा समावेश आहे. नागरी विकास सेवा भावी संस्था व शिवराणा सेवा संघ दरवर्षी तर दानशूर व्यक्तीचे कौतुक व अभिनंदन करतात. तर तळमळीने झटणारेचा सन्मानदाते करतात अनोखा उपक्रम गेले पंधरा वर्षांपासून अशा भगीनीना कार्यक्रम घेऊन मदत करीत असते. यावर्षीसुद्धा विधवा भगीनीना दिवाळी भेट द्यायची आहे. दानशूर व्यक्तीनी गरजूना मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा. समितीच्या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष मदत करावी. असे आवाहन एल.डी. ताटू, ॲड. सुभाष कोकुल्डे, भोरासिंग राजपूत, आनंद बारवाल, अंजली कोकुल्डे, भरत घुनावत, ॲड आनदसिंह बायस, डॉ. जीवन राजपूत, डॉ. गिताताई शेवगण, प्रा. भगवान डोभाळ, तोताराम बहुरे, रामसिंग बहुरे, भगवान डेडवाल, प्रा गुरूदत्त राजपूत, रामेश्वर सोनेत, राजेंद्र कवाळ, शाम राजपूत, दुर्गासिंग महेर, कल्पेश ताटू, प्रा. भिमसिंग काहटे, सुरेश जोनवाल, शाम सिंगल, नारायण उटाडे, जयसिंग खोकड, शामसिंग खोकड सह आदींच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ किरण काळे यांना भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर : नवलभाऊ प्रतिष्ठान संचालित रुख्मिणीताई कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय अंमळनेर येथे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई आणि ऑल इंडिया राईट असोसिएशन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आज शास्वत आणि सर्वसामावेशक शहरी विकास आणि सामाजिक चळवळ या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या राष्ट्रीय परिषदेत शैक्षणिक, वैज्ञानिक आणि संस्कृतीक अश्या विविध गुणांचा आदर्श घेत राष्ट्रासाठी, शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आपले योगदान देत आहात. त्यामुळे आपला भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार देऊन आदरणीय डॉ किरण काळे यांनी यांना भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नवलभाऊ प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी मा. श्याम पवार सर, प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील सर, नवलभाऊ प्रतिष्ठानचे मानद संचालक मा. सुनील गरुड, प्राचार्य डॉ. एस जे शेख सर, ऑल इंडिया ह्यूमन राईट असोसिएशनचे मा. प्रमोद पाटील सर, प्रा. डॉ. युवराज मानकर सर, प्रा. डॉ. किरण काळे मॅडम, प्रा. सुनील वाघमारे सर, उपस्थित होते. या परिषदेत मोठ्या संख्येने संशोधक, प्राध्यापक आणि सर्व विषयांचे अभ्यासक मंडळी उपस्थित होती.

## पैशांसाठी विवाहितेला धमकी

छत्रपती संभाजीनगर : उसणे दिलेले पैसे परत न केल्याने विवाहीतेसह तिच्या पतीला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार २६ ऑगस्ट रोजी सकाळी पावणेनऊ वाजेच्या सुमारास कैलासनगरात घडला. सागर जीवन वडमारे (३३, रा. जयभवानीनगर, पुंडलिकनगर) असे धमकी देणाऱ्याचे नाव आहे. प्रकरणात ज्योती सचिन इंगळे (३३, रा. कैलास नगर) यांनी फिर्याद दिली. त्यानूसार, वडमारे याने फिर्यादीच्या पतीने उसणे पैसे घेतले होते. ते पैसे परत न केल्याने वडमारे याने फिर्यादीच्या घरी जावून त्यांच्या घराच्या दरवाजाला लाथा मारल्या, घरात घुसून फिर्यादीसह त्यांच्या पतीला ढकलून देत शिवीगाळ केली. तसेच तु गल्लीच्या बाहेर ये तुला दाखवतो असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली. प्रकरणात जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाविकास आघाडी कडून सतीश चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२८ ऑक्टोबर : गंगापूर विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

प्रारंभी गंगापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीत गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते, सामान्य नागरीक व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शिस्तबद्ध व शांततेत निघालेल्या या रॅलीत आ.सतीश चव्हाण यांनी शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. रॅली दरम्यान जवळपास पाच-सहा किलोमीटर गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावर मोठी गर्दी होती. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केलेले हे शक्तिप्रदर्शन पाहून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पहिल्यांदाच इतकी मोठी गर्दी जमा झाल्याचे लोकं बोलत होते, अशी विक्रमी गर्दी होणे हे आ.सतीश चव्हाण यांच्यासाठी अश्वासक वातावरण निर्माण झाल्याचे सिद्ध करते. या गर्दीने विरोधकांसमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे, हे ठळकपणे जाणवत होते. राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस या पक्षाचे कार्यकर्ते

मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री राजेश टोपे, जेष्ठ नेते सुधाकर सोनवणे, काँग्रेसचे जेष्ठ नेते जगन्नाथ खोसरे, उपजिल्हा प्रमुख लक्ष्मणभाऊ सांगळे, त्रिंबक तुपे, डॉ. नरेंद्र काळे, पांडुरंग तांगडे पाटील, राजू वरकड, दिनेश मुथा, अंकुश काळवणे, अनिल चव्हाण, संपत छाजेड, अनिल जाधव, संजय जैस्वाल, विश्वजीत चव्हाण, आदींसह राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस व महाविकास आघाडीतील मित्र पक्षाचे कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती.

## लातूर-पुणे आणि नांदेड-विजयवाडा विशेष रेल्वे धावणार

छत्रपती संभाजीनगर : दिवाळी आणि छट निमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड-पनवेल- नांदेड विशेष गाडी लातूर-पुणेमार्गे आणि नांदेड- विजयवाडा विशेष रेल्वे चालविण्यात येणार आहे.

नांदेड-पनवेल विशेष रेल्वेची एक फेरी ज्यात रेल्वे क्रमांक ०७६८५ हुजूर साहिब नांदेड ते पनवेल विशेष रेल्वे शनिवारी (दि.२) नांदेड रेल्वे स्थानकावरून सायंकाळी ४ वाजून १५ मिनिटाने सुटेल आणि पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी, लातूर रोड, लातूर, कुडूवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कर्जतमार्गे पनवेल येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजून १५ मिनिटाने पोहोचेल. पनवेल - नांदेड विशेष रेल्वेची एक फेरीत रेल्वे क्रमांक ०७६८६ पनवेल ते हुजूर साहिब नांदेड विशेष रेल्वे रविवारी (दि.३) पनवेल रेल्वे स्थानकावरून दुपारी १२ वाजून ३५ मिनिटाने सुटेल आणि पुणे, दौंड, लातूर, परळी, परभणीमार्गे हुजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजून ४५ मिनिटाने पोहोचेल. विजयवाडा-नांदेड विशेष रेल्वेची एक फेरीत रेल्वे क्रमांक ०७०२० विजयवाडा ते हजूर साहिब नांदेड विशेष रेल्वे दि. २८ ऑक्टोबर रोजी विजयवाडा येथून सायंकाळी ६ वाजून ४० मिनिटाने सुटेल आणि गुंटूर, सत्तेनापल्ली, सिकंदराबाद, निझामाबादमार्गे हजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजता पोहोचेल. तर नांदेड पनवेल नांदेड विशेष रेल्वे मार्गे मनमाड, कल्याण रद्द करण्यात आली आहे. रेल्वे क्रमांक ०७६२५/०७६२६ नांदेड पनवेल नांदेड विशेष रेल्वे मार्गे मनमाड कल्याण ही विशेष रेल्वे दिवाळी-छट निमित चालविण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु प्रवाशांचा अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे ही रेल्वे रद्द करण्यात आली आहे.

## तरुणाला मारहाण

छत्रपती संभाजीनगर : हॉटेलवर जेवण करण्यासाठी जात असतांना चौघांनी एका तरुणाला जबर मारहाण करुन चाकूने त्याच्यावर वार केल्याची घटना २५ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास नगरे टावर जवळ घडली, बंटी मुजंगे, अक्रम फकिर (दोघे रा. कुलेनगर, हरौल) व लांचे दोन साथीदार असे मारहाण करणाऱ्यांची नावे आहेत.

## महापालिकेचा उपक्रम : 'मतदार राजा जागा हो' पथनाट्यास नागरिकांचा प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आणि महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्या प्रेरणेतून तसेच मतदार नोंदणी अधिकारी व्यंकट राठोड, जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा महापालिका उपायुक्त अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात मतदान जागृती कार्यक्रम चालू आहे. त्याचाच एक भाग म्हणून महापालिका हर्सूल येथील केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हर्सूल, टी पॉईंट , टीव्ही सेंटर ,जाधवमंडी, हडको परिसर, भारतबाजार, या भागात 'मतदान राजा जागा हो' या पथनाट्याचे सादरीकरण केले. नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. मतदान जनजागृतीसाठी शहर परिसरात या पथनाट्याचे प्रयोग सुरू आहेत.



पाच वर्षे त्यांची आणि एक दिवस आपुला. आपले मतदान विकू नका. 'बोटाने आपले भविष्य घडवा. मतदार हा लोकशाहीतील राजा आहे. प्रलोभनाला बळी पडू नका, असे अनेक संवाद लोकांच्या पसंतीस पडत आहे. यातून सर्व मतदारांना भारताचे सुजाण नागरिक म्हणून मतदानचे पवित्र कर्तव्य बजावण्याचे आवाहन करण्यात येत आहे. स्वीप सदस्य महापालिकेचे शिक्षणाधिकारी भारत तिनगोटे, केंद्रीय मुख्याध्यापक संजीव सोनार, विजय कोल्हे, जगन्नाथ सपकाळ, सीबीएससीचे मुख्याध्यापक शशिकांत उबाळे, गोविंद कुलकर्णी, संजय कुलकर्णी हे पथनाट्याचे ठिकठिकाणी आयोजन करीत आहे.

पथनाट्यात आर्यन राजगुरे, साईराज सहाने, उबेद शेख, अब्दुल आहद, सृष्टी गौतम, यशोदा खेत्रे या विद्यार्थ्यांच्या भूमिका आहेत. पथनाट्याचे लेखन आणि दिग्दर्शन हर्सूल शाळेतील शिक्षक संजय कुलकर्णी यांचे आहे.

## वेळीच उपचार केल्यास पक्षघात झालेला रुग्ण बरा होऊ शकतो : डॉ. पांडुरंग वट्टमवार

छत्रपती संभाजी नगर

मेंदूतील रक्तस्त्राव बंद झाल्यास किंवा मेंदूमध्ये अचानक रक्तस्त्राव झाल्यास स्ट्रोक होऊ शकतो, स्ट्रोकचे लक्षणे जाणवल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता आणि वेळी स्टेटमेंट केल्यास रुग्ण बरा होऊ शकतो अन्यथा रुग्णाला कायमचा अपंगत्व वेळप्रसंगी त्याच्या जीवालाही धोका असल्याचे ओरीऑन सिटी केअर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. पांडुरंग वट्टमवार यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.



पुढे बोलताना डॉक्टर वट्टमवार म्हणाले २९ ऑक्टोबर हा जागतिक पक्षाघात दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचे कारण म्हणजे या आजाराबद्दल ची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवुन याविषयीची जनजागरुकता होणे फार गरजेचे आहे. जेणेकरून कुठल्याही व्यक्तित्ता स्ट्रोकचा ॲटॅक (पक्षाघाताचा झटका) आता तर त्या व्यक्तिला ताबडतोब उपचार मिळावेत आणि त्याचा आजार लवकरात लवकर आजार बरा होवुन तो पुर्ववत होण्यास मदत होईल. पहिल्या साडेचार तासांमध्ये रुग्ण जर वेळीच हॉस्पिटलमध्ये आला तर अशा रुग्णाला आम्ही इंजेक्शन देऊन डोक्यामध्ये रक्ताच्या झालेल्या गुठळ्या वितळू पक्षघात झालेल्या रुग्णांमध्ये पहिला तास हा गोल्डन हवर म्हणून पाहिला जातो,

आमच्या रुग्णालयातील मेंदूरोग विभागाने आतापर्यंत ३०० हुन अधिक प्रोम्बोलायसिस तर ७०० हुन अधिक न्युरो इंटरव्हेशनत शस्त्रक्रिया यशस्वी करून हजाराहुन अधिक रुग्णांचे पक्षाघातातुन पुर्नवसन केले आहे अर्थातच ओरिऑन सिटीकेअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथील मेंदूरोग विभागाच्या अत्याधुनिक उपचारपध्दतीने ते यशस्वीपणे बरे होवुन ते त्यांचे जीवन पुर्ववत जगत आहे.

यावेळी डॉक्टर वीरेंद्र वडगावकर यांच्यासह ओरिओन हॉस्पिटल चे तज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

# शक्तीप्रदर्शन करीत भाजपचे तान्हाजी मुटकुळेंची उमेदवारी दाखल

## माजी केंद्रीय मंत्री भागवत कराडांसह शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाईचे नेते, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ आक्टोबर**

भारतीय जनता पक्षाचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी सोमवार दि २८ आक्टोबर रोजी प्रचंड शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंगोली विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी येथील महात्मा गांधी चौकातून प्रंचड शक्तीप्रदर्शन करीत महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबडेकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास अभिवादन करण्यात आले. या शक्तीप्रदर्शनात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष बांगर, माजी संघटनमंत्री भाऊराव देशमुख, माजी आ. रामराव वडकुते, भाजपचे जिल्हाप्रमुख फुलाजीराव शिंदे, किसान मोर्चाचे सुरजितसिंह ठाकूर, शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, युवा नेते शिवाजी मुटकुळे, युवा जिल्हाध्यख पप्पू चव्हाण, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, सेनगाव तालुकाध्यक्ष हिम्मत राठोड, सरचिटणीस उमेश नागरे, आशिष वाजपेयी, बळीराम मुटकुळे, मारोती इंगोले यांच्यासह भाजप, शिवसेना, रिपाईचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी गांधी चौकातून ही भव्य रॅली निघाली. या रॅलीत महिलांची संख्या लक्षणीय होती.

शक्तीप्रदर्शनात हिंगोली आणि सेनगाव तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिला, पुरूष, युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग धेतला. शक्तीप्रदर्शन रॅली शहरातील गांधी चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, पोस्ट ऑफीस रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे उपविभागीय कार्यालयापर्यंत पोहोचली. यावेळी शहरातील व्यापारी, नागरिकांनी रस्त्याच्या दूतर्फा मोठी गर्दी करीत भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांचे स्वागत केले. यावेळी वारकरी सांप्रदायाचे पथकही शक्तीप्रदर्शनात सहभागी झाले होते. यावेळी ढोल ताशाच्या गजरात भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यानी जोरदार घोषणाबाजी केल्या. हिंगोली विधानसभेचा विकास हाच भाजपचा ध्यास अशा आशयाचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांचे फलक, भाजपचे, शिवसेना तसेच रिपाईचे झेंडे घेवून महिला आणि पुरूष शक्तीप्रदर्शनात सहभागी झाले होते. भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी केलेल्या प्रचंड शक्तीप्रदर्शनामुळे विरोधकांमध्ये धडकी भरली आहे.

उपविभागीय कार्यालयाजवळ आल्यानंतर भाजपचे उमदेवार यांनी सर्व जनतेचे आभार मानीत उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांचेकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष बांगर, भाऊराव देशमुख, शहराध्यक्ष कैलास काबरा यांची उपस्थिती होती.

**केलेल्या विकास कामांमुळेच जनता मला तिसऱ्यांदा विजयी करणार- तान्हाजी मुटकुळे**

हिंगोली विधानसभा मतदारसंघात मागील दहा वर्षात केलेल्या विकास कामांची दखल जनतेने घेतली आहे. दहा वर्षाच्या काळात पूर्णपणे इमानदारीने काम केले आहे. आम्ही जातपात, धर्म विसरून विकासाची कामे आणि लोकांची कामे करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढील काळातही हिंगोली मतदारसंघाचा विकास हाच माझा ध्यास आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित महिलांचे मी आभार मानतो. पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समर्थक, नागरिकांचा मला आशिर्वाद आहे. तिसऱ्यांदा जनता मला विजयी करणार याबद्दल मला ठाम विश्वास आहे. तुम्हीच उमेदवार आहात असे समजून आपआपल्या गावात, क्षेत्रात काम करण्याचे आवाहन यावेळी भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले.

**दहा वर्षाच्या काळात मतदारसंघात आणली विकासाची गंगा- भागवत कराड**

मागील दहा वर्षाच्या काळात भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी शहरी व ग्रामीण भागात रस्ते, वीज, पाणी तसेच सिंचनाची कोट्यावधींची कामे करून विकास केला आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच तत्परतेने विधानसभेत आवाज बुलंद केला आहे. अनेक गावांत सामाजिक सभागृहे, नर्सी नामदेव मंदिर विकासासाठी निधी, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे उभे केले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना सर्वसामान्य महिला, शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांपर्यंत पोहोचविण्यासाठी सतत काम केले आहे. या योजनांचा लाभ मतदारसंघातील नागरिकांना मिळाला आहे. त्यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघात विविध कामांच्या माध्यमातून विकास गंगा आणली आहे. देशातील जनतेने तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना विकास कामे आणि कल्याणकारी योजनांमुळे पंतप्रधान केले आहे. त्याचप्रमाणे हिंगोली विधानसभा मतदार संघातील जनताही भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना प्रचंड मतांनी विजयी करतील असा विश्वास यावेळी केंद्रीय मंत्री भागवत कराड यांनी व्यक्त केला.

## बियाणी नगरात बंद घराचे कुलूप तोडून १ लाख ९२ हजारांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ आक्टोबर**

शहरातील बियाणी नगर भागात बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी १ लाख ९२ हजार रूपयांचा ऐवज पळविल्याची घटना घडली असून याप्रकरणी रविवारी रात्री उशिरा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा झाला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरातील बियाणी नगर भागात देवीकांत देशमुख यांचे घर आहे. शनिवारी सुट्टीमुळे ते कुटुंबियांसह बाहेरगावी गेले होते. घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी घरातील सर्व साहीत्याची नासधूस केली. तसेच वरच्या मजल्यावरील लाकडी कपाटामध्ये एका पर्समध्ये ठेवलेले १७ हजार रूपये रोख आणि दीड तोळ्याचा सोन्याचा हार, एक तोळ्याच्या सोन्याच्या अंगठ्या असा एक लाख ९२ हजारांचा ऐवज पळविला.

दरम्यान, घराचा दरवाजा उघडा दिसल्यामुळे शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी या प्रकाराची माहीती देशमुख यांना दिली तसेच हिंगोली शहर पोलिसांना माहीती दिली. उपअधीक्षक भुसारे, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, सपोनि परगेवार, जमादार पोटे, संजय मार्के, धनंजय क्षीरसागर, अशोक धामणे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता एक चोरटा घरात प्रवेश करीत असल्याचे आढळून आले मात्र त्याचा चेहरा अस्पष्ट दिसत असल्यामुळे नेमके चोरट्याची ओळख पटण्यास अडचण निर्माण झाली आहे. याप्रकरणी देशमुख यांच्या तक्रारीवरून रात्री उशिरा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पेरगेवार हे करीत आहेत.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी नागरिकांना आवाहन करतांना सांगितले की, अनेकजण दिवाळी निमित्त बाहेरगावी जातात. घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरटे चोरी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिवाळीमध्ये चोऱ्यांचे प्रमाण रोखण्यासाठी पोलिस विभागाकडून शहरी व ग्रामीण भागात गस्त राहणार आहे. मात्र त्यानंतरही आपली जबाबदारी ओळखून नागरिकांनी घराला कुलूप लाऊन जातांना शेजाऱ्यांना बाहेर गावी जात असल्याची माहीती द्यावी तसेच घरात मौल्यवान वस्तू ठेवू नयेत. तसेच दिवाळीनिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी होत आहे. या गर्दीचा गैरफायदा घेवून चोरटे सक्रिय होण्याची शक्यता आहे त्यामुळे मोजके पैसे घेवून जावेत असे आवाहन कोकाटे यांनी केले आहे.



**हिंगोली- एकीकडे लोक दिवाळीनिमित्त विविध मौल्यवान वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी करीत आहेत तर दुसरीकडे निराधार, वृध्द महिला आणि पुरूष त्यांचे निराधाराचे तुटपुंजे मानधन हातात पाडून घेण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आवारात वाट पाहत तासनतास बसलेले दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

**मी विधानसभा निवडणुक लढणार नाही- नेहाल**

हिंगोली- हिंगोली विधानसभा मतदारसंघातून मी निवडणुक लढणार नाही. माझ्या समर्थकानी समाज माध्यमांवर ज्या पोस्ट टाकल्या आहेत. त्या माझ्या प्रेमापोटी टाकल्या असून त्यांनी अशा पोस्ट थांबवाव्यात असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी उपनगराध्यक्ष शेख नेहाल यांनी सांगितले. हिंगोली विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून अनिल पतंगे यांना उमेदवारी आम्ही मागितली होती परंतु सदरील जागा महाविकास आघाडीमध्ये उबाठा शिवसेनेला सुटली असून रूपाली राजेश गोरेगावकर यांना उमेदवारी मिळाली आहे. त्यामुळे आमचे वरिष्ठ नेते आम्हाल जो आदेश देतील तो आदेश पाळीत आम्ही निवडणुकीत काम करणार आहोत. जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघापैकी हिंगोली हा काँग्रेसचा मतदारसंघ होता, अशी प्रतिक्रिया माजी उपनगराध्यक्ष शेख नेहाल यांनी दिली आहे.

**मनसेचे जिल्हाध्यक्ष बंडू कुटे यांनी भरला अर्ज**



हिंगोली- हिंगोली विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष बंडू उर्फ प्रमोद कुटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांचेकडे कुटे यांनी समर्थकांसोबत उमेदवारी अर्ज भरला.

**शिवणी खु येथे जागेच्या वादातून शिवीगाळ**



हिंगोली- सेनगाव तालुक्यातील शिवणी खु येथे बौध्द समाजाच्या मंदिर बांधकामासाठी दिलेल्या नियोजित जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी समाजातील लोक गेले असता अतिक्रमणधारक आणि त्यांच्या कुटुंबियांनी शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी यावेळी काही काळ गावांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. याप्रकरणी प्रवीण खिल्लारे यांनी सेनगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पोनि संतोष तांबे करीत आहेत.

## माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ आक्टोबर**

वसमत विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांनी शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी जाहीर सभा घेतली

वसमत विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांनी सोमवारी शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तत्पूर्वी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी जाहीर सभेत महायुती सरकारच्या विरोधात टीका केली तसेच महायुतीचे तसेच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार राजु नवघरे यांचेवरही टीका केली. यावेळी हिंगोली लोकसभेचे खा नागेश पाटील आष्टीकर, आ. डॉ प्रज्ञा सातव, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे दिलीप चव्हाण, माजी नगराध्यक्ष अब्दूल हाफीज, आंबादास भोसले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच वसमत मतदारसंघातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शहरातील प्रमुख मार्गावरून शक्तीप्रदर्शन करीत जयप्रकाश दांडेगावकर यांनी उपविभागीय कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला.

## हिंगोली, कळमनुरीत बंडखोरीमुळे उमेदवारांची डोकेदुखी वाढणार?

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ आक्टोबर**

हिंगोली आणि कळमनुरी विधानसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरी करीत इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीतील उमेदवारांची डोकेदुखी वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना उमेदवारी देण्यात आली परंतु लोकसभा निवडणुकीपासून निवडणुकीच्या तयारीत असलेले रामदास पाटील सुमठाणकर यांना उमदेवारी न मिळाल्याने त्यांनी बंडाचा झेंडा रोवत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दि २९ आक्टोबर रोजी ते पत्रकार परिषदेमध्ये त्यांची भूमिका स्पष्ट करणार आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीकडून उबाठा शिवसेनेच्या रूपाली पाटील गोरेगावकर यांना उमेदवारी मिळाल्याने काँग्रेसचे दिग्गज नेते तथा माजी आमदार भाऊराव पाटील यांनी दि २९ आक्टोबर रोजी शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी दाखल करण्याची घोषणा केली आहे. तसेच माजी खा शिवाजीराव माने आणि भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे.

कळमनुरी मतदारसंघात महायुतीकडून शिंदे गटाचे शिवसेनेचे संतोष बांगर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या मतदारसंघात महायुतीमध्ये बंडखोरी झाली नाही परंतु महाविकास आघाडीकडून उबाठा शिवसेनेचे माजी आ. डॉ संतोष टारफे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. डॉ टारफे यांनीही मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. मात्र मागील विधानसभा निवडणुकीत संतोष बांगर यांच्याशी चुरशीचे लढत देणारे उबाठा शिवसेनेचे अजित मगर यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी कळमनुरी मतदारसंघात बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

हिंगोली आणि कळमनुरीमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये बंडखोरी झाली तर अधिकृत उमेदवारांची डोकेदुखी वाढणार आहे. दि ४ नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतीम तारीख असून त्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे.

## पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटेंचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ आक्टोबर**

जिल्ह्यातील नागरिकांनी दिवाळी सण आनंदात साजरा करावा तसेच पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्पही करावा असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

दिवाळी सणानिमित्त अनेकजण फटाक्याची आतिषबाजी करीत असतात परंतु फटाक्यांमुळे प्रदूषणही होते. त्यामुळे श्वसनाचे आजार असलेल्या व्यक्तींना त्याचा मोठा त्रास होतो. त्यामुळे शक्यतो हवा प्रदूषीत करणारे तसेच पर्यावरणाला प्रदूषीत करणारे फटाके उडवीणे टाळावे. तसेच कुटुंबातील लहान मुले फटाके उडवीत असतांना घरातील मोठ्या व्यक्तींनी त्यांच्यासोबत रहावे. विशेषत रूग्णालयाच्या परिसरात मोठ्या आवाजाचे फटाके उडविल्याने रूग्णांना त्रास होऊ शकतो ही बाब सर्वानीच लक्षात धेतली पाहीजे, नागरिकांनी यावर्षी दिवाळी पर्यावरणपूरक साजरी करण्याचा संकल्प करावा असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील २३ अवैध दारूविक्री व दारू बनविणाऱ्या ठिकाणावर छापे मारण्यात आले असून आरोपीतांकडून ८२ हजार ८६० रूपयांचा मुद्देमाल पथकांनी जप्त केला आहे. तसेच जिल्ह्यातील तपासणी नाक्यांना पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी सरप्राईज भेट दिली. यावेळी त्यांनी नाक्यावरील कर्मचाऱ्यांशी संवाद साधून एकही वाहन विना तपासणी सोडू नये अशा सूचना दिल्या. हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या नांदेड, यवतमाळ, परभणी, जालना, वाशिम या मार्गावर तपासणी नाके सुरू करण्यात आले आहेत. या ठिकाणी चोवीस तास कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. याठिकाणी वाहनांची कसून तपासणी करण्यात येत असून दारू, ५० हजारापेखा जास्त रोख रकमेच्या वाहतुककडेही पथकांकडून लक्ष दिले जात आहे.

## ओमप्रकाश पिपल्स बँकेतर्फे ३० आक्टोबरला दिपोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ आक्टोबर**

येथील ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप. बँकेतर्फे दि ३० आक्टोबरला दिपोत्सव तसेच दिवाळी पहाट, भक्तीसंगीताचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी ओमप्रकाश देवडा पिपल्स बँकेच्यावतीने दिवाळी निमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि ३० आक्टोबर बुधवारी उत्सव फाऊंडेशन हिंगोली यांच्यावतीने दिपोत्सव २०२४ हिंदी आणि मराठी भक्तीसंगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील स्व शिवाजीराव देशमुख सभागृहात सकाळी ६.३० ते ९ वाजेपर्यंत हा कार्यक्रम गायक कलाकार सादर करणार आहेत. या कार्यक्रमात सिम्फनी ग्रुप छत्रपती संभाजीनगर येथील कुशल जैन, सौ पल्लवी तामणे, नुपुर गायकवाड, अवंती जैन, संदीप निपटे, सायली देशमुख, अजय बेलसरे, मंगेश पांडे, गजानन रत्नपारखी, अमर वानखेडे, अमित निर्मल, अंकुश बोर्डे आदी कलाकार सहभाग घेणार आहेत.

दिपोत्सव २०२४ आणि दिवाळी पहाट या कार्यक्रमाला संगीत प्रेमी श्रोत्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँक आणि उत्सव फाऊंडेशन हिंगोली यांच्यावतीने करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम निशुल्क असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## धाराशिवमध्ये जेवण करण्यास गेलेल्या दोन तरुणांना मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

धाराशिव येथे दोन तरुणांना मारहाण करून त्यांच्याकडून पैसे जबरीने काढून घेतल्याची घटना घडली आहे. ही घटना २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता तेरणा कॉलेज जवळील वसीम मच्छी सेंटर येथे घडली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मंगेश गजानन मोरे (वय २२, रा. बॅंक कॉलनी आदिवासी मुलांचे वस्तीगृह, मूळ रा. उमरधरवाडी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) आणि त्यांचा मित्र व भाऊ गणेश मोरे हे जेवण करण्यासाठी वसीम मच्छी सेंटरमध्ये गेले असताना आयान अली अहमद अली कुरेशी, आजिम सलीम शेख आणि ईम्रान आयुब पठाण (तिघेही रा. शालिमार कॉलनी, धाराशिव) या तिघांनी त्यांना थाबुक्यांनी आणि बेल्टने मारहाण केली. मारहाणी दरम्यान मंगेश मोरे यांच्या पॅन्टच्या खिशातील २ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले.

भांडण सोडवण्यासाठी आलेल्या मंगेश यांच्या मित्रालाही आरोपींनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी मंगेश मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३०९ (४), ३५२, ३५१(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### आकाशवाणी पिटीसी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी देविदास पाठक

**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**



महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात काम करणाऱ्या आकाशवाणीच्या पिटीसी जिल्हा वार्ताहर संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी धाराशिव येथील आकाशवाणीचे जिल्हा प्रतिनिधी देवीदास पाठक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. २७ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे आकाशवाणी वार्ताहरांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या दरम्यान झालेल्या संघटनेच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. पिटीसी संघटनेच्या महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी जळगाव येथील राजेश यावलकर यांची तर वाशिम येथील जिल्हा प्रतिनिधी सुनील कांबळे यांची प्रदेश सचिवपदी निवड करण्यात आली.



### ‘अक्षरवेल’ मंडळाच्या अंकुर दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन

**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

अनेक वर्षांपासुन सातत्याने साहित्य चळवळ जोपासत असलेल्या व दिवाळी अंक प्रकाशनाची परंपरा चाल वणाऱ्या अक्षरवेल साहित्य मंडळाच्या ‘अंकुर’ दिवाळी अंकाचे नुकतेच प्रकाशन झाले. अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त अक्षरवेल मंडळाने यावर्षी अहिल्याबाई होळकर यांच्यावर विशेषांक काढला आहे. या अंकाचे प्रकाशन अपूर्वाई प्रकाशन, पुणे यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. मीना जिंतुरकर व आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा प्रेमा पाटील या उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष स्नेहलता झरकर, प्रा. विद्या देशमुख, सचिव अपर्णा चौधरी, कोषाध्यक्ष शिवनंदा माळी तसेच अक्षरवेलच्या सर्व सदस्य व शहरातील रसिक मैत्रिणी उपस्थित होत्या.

### प्रभाकर मुळे यांचे निधन

**जळकोट, दि.२८ ऑक्टोबर -**



येथून जवळच असलेल्या तूगाव (ता. उमरगा) येथील मुळ रहिवासी व मित्रनगर (सोलापूर) येथे वास्तवव्यास असलेले सोलापूर जेलरोड पोलिस स्टेशनचे सेवानिवृत्त पोलिस अधिकारी प्रभाकर विश्वनाथ मुळे (वय ६५) यांचे सोलापूर येथील निवास्थानी शनिवार (दि.२६) रोजी रात्री नऊच्या सुमारास प्रदिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तुगाव येथील शेतात रविवारी (दि.२७) दुपारी एक वाजता अंत्यसंस्कार आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ भाऊ, २ बहिणी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भैय्या किलजे यांचे सासरे होत.

# आ. कैलास पाटील यांचा शक्तीप्रदर्शनाने उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

धाराशिव विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर म हाविकास आघाडीचे शिवसेना (उबाठा) पक्षाचे विद्यमान आम दार कैलास पाटील यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करत धाराशिवात रॅली काढली. या रॅलीने संपूर्ण शहरात जोशाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांची मतदारांशी जुळवलेली नाळ आणि त्यांचा प्रभाव पुन्हा एकदा दिसून आला.

आज सकाळी आमदार कैलास पाटील यांनी त्यांच्या प्रचार यात्रेला येरमाळातील येडाई देवीच्या दर्शनाने सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी तेर येथील संत गोरोबा काकांचे दर्शन घेतले आणि तुळजापूरच्या तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. या विविध तीर्थक्षेत्रांवर दर्शन घेऊन, आशीर्वाद घेताना त्यांनी आगामी निवडणुकीतील विजयासाठी देवी-देवतांची कृपा मिळवण्याचा प्रयत्न केला.

धाराशिव शहरात दाखल झाल्यावर, रॅलीची सुरुवात अण्णाभाऊ साठे चौकातून झाली. रॅली मार्गे धारासूर मर्दिनी मंदिर, आणि हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी दर्गा या महत्वाच्या स्थळांवरून गेली. धारासूर मर्दिनी देवीच्या दर्शनानंतर, आमदार कैलास पाटील यांनी ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांच्या दर्ग्यावर चादर चढवली. ही रॅली एक शक्तीप्रदर्शन ठरली,





ज्यामध्ये ठिकठिकाणी फुलांची उधळण केली गेली आणि फटाके फोडून रॅलीला स्वागत करण्यात आले. समर्थकांच्या गगनभेदी घोषणांनी वातावरणात जोश आणला होता.

या रॅलीने शहरात मोठा उत्साह निर्माण झाला आहे. कैलास पाटील यांची लोकप्रियता, त्यांच्याकडे असलेला जनसमर्थनाचा ओघ आणि प्रचंड जनसमुदाय हे त्यांच्या राजकीय अस्तित्वाची ताकद दर्शवतात. यंदा धाराशिव विधानसभा निवडणुकीसाठी पाटील यांचा हा दुसरा प्रयत्न असून, त्यांनी मतदारांमध्ये प्रचंड विश्वास आणि निष्ठा निर्माण केली आहे.

रॅलीच्या दरम्यान, स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी आ. पाटील यांचे ठिकठिकाणी स्वागत केले.

त्यांच्या समर्थकांनी फुलांच्या उधळणीसह त्यांचे स्वागत केले. फटाक्यांच्या आवाजाने शहर दुमदुमले होते. पाटील यांची ही शक्तीप्रदर्शन रॅली आणि धार्मिक स्थळांवर त्यांनी घेतलेले दर्शन हे निवडणुकीपूर्वीचा महत्वाचा धार्मिक आणि राजकीय संकेत मानला जात आहे.

## उमरग्यात प्रतिबंधित गुटखा जप्त; दुकानदारावर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ ऑक्टोबर -**

उमरगा पोलिसांनी गुरुवारी स्वामी समर्थ एंटरप्रायजेस या दुकानावर छापा टाकून ६ लाख १८ हजार ३८५ रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी दुकानदार महादेव बंडप्पा शिवनेचारी (वय ५४, रा. गुंजोटी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या आदेशानुसार उमरगा पोलीस ठाण्याचे पथक गुरुवारी अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईसाठी गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना गुप्त माहिती मिळाली की, शिवनेचारी यांच्या दुकानात प्रतिबंधित गुटखा साठवण्यात आला आहे. पोलिसांनी तात्काळ छापा टाकून हा गुटखा जप्त केला. शिवनेचारी यांच्याविरुद्ध भादंवि कलम २७४, २७५, २२३, १२३ आणि अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार, पोलीस निरीक्षक भोसले, पोउपनि पुंजरवाड आणि इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी केली.

## जिल्ह्यात चोऱ्यांचे सत्र सुरूच; गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्यात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून मुरुम, कळंब आणि आनंदगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत शेळ्या, बुलेट मोटरसायकल आणि टिव्हीएस मॅक्स मोटरसायकल असा एकूण ८३ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याच्या घटना घडल्या आहेत.

याबाबत माहिती अशी की, मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत अचलेर शिवारातील रोहन जमादार यांच्या शेतातील शेडमधून ८ शेळ्या, एक बोकड आणि चार पिल्ले असा एकूण ६३ हजार रुपये किंमतीचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत घडली. चोरट्यांनी शेडचे पत्रे उचकटून शेळ्या चोरून नेल्याची माहिती आहे.

तसेच कळंब तालुक्यात पोलीस ठाण्याच्या हद्दीत शशिकांत इंगळे यांची ६० हजार रुपये किमतीची बुलेट मोटरसायकल चोरीला गेली आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी रात्री ९ ते २६ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ या वेळेत घडली. चोरट्यांनी त्यांच्या घरासमोरूनच म ोटरसायकल चोरून नेली आहे. तिसऱ्या घटनेत धाराशिव शहर आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनायक शेळके यांची २० हजार रुपये किमतीची टिव्हीएस मॅक्स मोटरसायकल चोरीला गेली आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत घडली. पुष्पक मंगल कार्यालय जवळील पॅरा मेडीकल कॉलेज समोरील गेटजवळून त्यांची मोटरसायकल चोरीला गेली आहे.

तिन्ही घटनांप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## सततच्या पावसाचे निकष शिथील करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात सततच्या पावसाने झालेल्या पीक आणि शेतीच्या नुकसानीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्याव्यतिरिक्त अन्य महसूल मंडळातही मोठे नुकसान झाले आहे. भूम, परंडा, तुळजापूर आणि धाराशिव तालुक्यातील वगळण्यात आलेल्या बहुतांश महसूल मंडळातही मोठे नुकसान झाले आहे.

त्यामुळे सततच्या पावसाचे निकष शिथील करावे. पाच दिवसांत ५० मिलीमीटर किंवा त्यापेक्षा अधिकचा पाऊस झाल्यासही पिकांचे नुकसान होते, हे गृहित धरून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीअंतर्गत मदत देण्यात यावी. आचारसंहिता काळातही नियम ानुसार निवडणूक आयोगाच्या परवानगी घेऊन मदत देता येऊ शकते त्यासाठी आपण मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिवांकडे पाठपुरावा करीत असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात अतिवृष्टी आणि सततच्या पावसाम ुळे नुकसान झाले असल्याचे अहवालात नमूद केल्याची बाब लक्षात आल्यानंतर आ. पाटील यांनी प्रधान सचिव मदत व पुनर्वसन यांना १८ ऑक्टोबर रोजी पत्र लिहून जिल्ह्यातील अन्य महसूल मंडळातील वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. धाराशिव, भूम, परंडा आणि तुळजापूर तालुक्यातील २४ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद नाही. मात्र झालेले नुकसान मोठे आहे. त्यामुळे २०२२ साली ओढवलेल्या आपत्तीवेळी नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल ज्याप्रमाणे शासनाकडे सादर करण्यात आला होता. तीच प्रक्रिया अनुसरून नुकसानीची व्याप्ती लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार उर्वरित २४ महसूल मंडळात दोन वर्षापूर्वी ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ नुकसानीच्या निकषानुसार केलेल्या पाहणीचा अहवाल ग्राह्य धरला होता, अगदी त्याप्रमाणेच २४ महसूल मंडळातील शेतकऱ्यांनाही तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, असेही पाटील यांनी या पत्रात नमुद केले आहे.

## निवडणूक निरीक्षक (सामान्य) गोपाल चंद धाराशिव जिल्ह्यात दाखल



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

२४२- उस्मानाबाद आणि २४३- परंडा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक (सामान्य) गोपाल चंद, (भा.प्र.से.) यांचे आज जिल्हयात आगमन झाले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२३४१३६ हा असून त्यांचा भ्रमणध्वनी नंबर ९०२१५५५३४९ हा आहे.

निवडणूक निरीक्षक (सामान्य) यांच्याशी निवडणूक विषयक प्रश्नाबाबत भेटीची वेळ ही सकाळी ९ ते सकाळी ११ वाजताची आहे.

## एकलव्य विद्या संकुलात विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त कपडे व फराळाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ ऑक्टोबर -**

एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यगरवाडी (ता. तुळजापूर) येथे वस्तीगृहात राहणाऱ्या भटके विम ुक्त समाजातील वीस विद्यार्थ्यांना डोंबिवली येथील सीस फाउंडेशनचे संचालक अभिजीत जोशी, अवंती जोशी यांच्यावतीने नवीन कपडे व दिवाळीनिमित्त फराळ देण्यात आला.

गेल्या बारा वर्षापासून अभिजीत जोशी गरीब व वंचित विद्यार्थ्यांना दिवाळीच्या फराळ व नवीन कपडे घेऊन त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करतात.

याही वर्षी त्यांनी सोनाली गिरी, पायल साळुंके, रूपाली गिरी, नागेश अलमले, अनिता कडगंचे, गणेश शिंदे, वैष्णवी गायकवाड, प्रांजल भोसले, शिनु कलमुळे, यशोदा गान गोळे, शंकर गांगुळे, चरण गानगोळे, लक्ष्मी विभुते, कार्तिक पांचाळ, आरोही चौगुले, धनश्री कदम, शुभांगी, आजापा कोमारे, रेखा कलमुळे, अक्षरा छबिले, आर्यन जाधव या मुला मुलींना नवीन कपडे घेऊन दिले आहेत. तसेच दिवाळीनिमित्त फराळ दिला आहे.

यावेळी अभिजीत जोशी, अवंती जोशी यांच्या दातृत्वाबद्दल व सामाजिक भान ठेवून विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुखदेव काळे, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचीत, वस्तीगृह अधीक्षक फुलाजी ताटी कुंडलवार, संगीता पाचंगे, सुजाता गणवीर,



यशवंत निंबाळकर, मयूर अंतरेड्डी, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर यांनी सीस फाऊंडेशनचे आभार मानले.

## स्व-कष्टातून व्यवसाय उभा केलेल्या ३८ महिलांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२८ ऑक्टोबर -**

कळंब (जि.धाराशिव) येथे दि.२७ ऑक्टोबर रोजी अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस आणि पर्याय सामाजिक संस्थेच्या वतीने उद्योजिका महिला सन्मान व गुंतवणूकदार सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. हा सोहळा आर्थिक साक्षरतेसह महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला असून, स्थानिक उद्योजिकांच्या प्रगतीचा सन्मान करण्यासह अनिकच्या गुंतवणूकदारांना कंपनीच्या कार्यप्रणालीबद्दल विश्वास व जागरूकता देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र लोकविकास मंचचे कोंढाळकर होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अनिकचे व्यवस्थापकीय संचालक विश्वनाथ तोडकर, तसेच अनिकचे संचालक सुभाष तगारे, हेमंतकुमार वाळवेकर, बालासाहेब सुर्यवंशी, महाराष्ट्र लोकविकास मंचचे रमाकांत कुलकर्णी, रविकांत आदरकर, अनिताई तोडकर, अनिकचे संचालक ऋषीकेश तोडकर, सुरज सुर्यवंशी, विकाराबाद शाखा व्यवस्थापक श्रीरंग वाळवेकर, तसेच सुशांत पाईकराव यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमात अनिक मुख्यालयाचे प्रतिनिधी उमेश टोणपे यांनी अनिकची व्यावसायिक स्थिती सविस्तरपणे उलगडली. ज्यामध्ये अनिकचा २० वर्षांचा यशस्वी प्रवास, कंपनीचे नवीन उपक्रम, आणि भविष्यातील योजना त्यांनी मांडल्या. अनिकचे संचालक ऋषीकेश तोडकर यांनी धाराशिव जिल्ह्यातील अनिकच्या कार्यपद्धतीवर विशेष भाष्य केले.

त्यांनी अनिकच्या कामाची प्रक्रिया, गुंतवणूकदारांचा विश्वास कसा जपला जातो, आणि त्यांच्या गुंतवणुकीचा योग्य विनियोग कसा केला जातो याबद्दल सविस्तर माहिती दिली. यानंतर, कोंढाळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अनिकच्या समाजोपयोगी कार्याचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित गुंतवणूकदारांना कंपनीकडून स्मृतिचिन्ह भेट देण्यात आली. यानंतर, अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेसतर्फे धाराशिव जिल्ह्यातील ३८ म हिला उद्योजिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भैरवानाथ कानडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिकचे विकास कुदळे, बालाजी शेंडगे, भिकाजी जाधव, अतुल चिलवंत, वैभव शिंदे, वैभव चौंदे, रियाज शेख, प्रकाश तोडकर, दर्शन जोगी, मनोज क्षीरसागर, रहीम शेख, सुशील कुंभार, सुरज भालेराव, दिगंबर लाडके, अशोक शिंदे तसेच सर्व महिला कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

## जिल्ह्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी मारहाणीच्या घटना



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ ऑक्टोबर -**

भुम तालुक्यातील वालवड येथे डॉ. वाघमारे हॉस्पिटल समोर योगेश उर्फ अतुल मोहिते यांना चार जणांनी मारहाण केल्याची घटना घडली. पांडुरंग मोहिते, गौतम मोहिते, प्रशांत मोहिते आणि उषाबाई लोमटे अशी आरोपींची नावे आहेत.

याबाबत माहिती अशी की, मागील भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी योगेश यांना शिवीगाळ करून मोटरसायकल आडवी करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लोखंडी गज, लाकडी काठी, दगड आणि तिखट डोळ्यात टाकून गंभीर दुखापत केली. याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच धाराशिव तालुक्यातील साठेनगर तेर येथे अजिंक्य कांबळे यांना सात जणांनी मारहाण केल्याची घटना घडली. वैभव साळुंके, जयसंग्राम रसाळ, ललीता साळुंके, ओमसंग्राम रसाळ, नितीन रसाळ, बायनाबाई रसाळ आणि मोहरबाई रसाळ अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून अजिंक्य यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी, कोयता आणि चाकूने मारहाण करून जखमी केले. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या अजिंक्य यांच्या आजींनाही आरोपींनी मारहाण केली. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही घटनांमध्ये आरोपींनी जिवे मारण्याची धम की दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# राजेभाऊ फड यांचा उमेदवारी अर्ज दाखल; मतदारसंघातून नागरिकांची मोठी उपस्थिती



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील युवक नेते राजेभाऊ श्रीराम फड यांनी सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मतदारसंघातील माता - भगीनिंची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अर्ज दाखल करतेवेळी मतदारसंघातील जनतेची मोठ्या प्रमाणावर स्वयंस्फूर्तीने उपस्थिती होती. जनतेच्या आग्रहास्तव आपण उमेदवारी अर्ज दाखल करत असून शेवटच्या श्वासापर्यंत मी जनसेवेसाठी स्वतःला वाहून घेणार असल्याची प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केली. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राजेभाऊ फड यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला संबोधित केले. तद्नंतर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह सर्व महामानवाच्या पुतळ्यास हार घालून अभिवादन केले.

परळी विधानसभा मतदारसंघात युवक नेते राजेभाऊ फड यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मतदारसंघातील जनता आपल्याला अनुकूल असून यंदाची विधानसभा निवडणूक आपण लढवावी असा जनतेचा आग्रह आहे. देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांचा मी कालही आदर करत होतो आणि आजही आदर करतो. पक्षाने कोणालाही जरी उमेदवारी जाहीर केलेली असली तरी शेवटपर्यंत काहीही होऊ शकते. आम्ही आजही आशावादी आहोत, पवार साहेब नक्कीच आमचा विचार करतील. परळी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या भागाचा विकास करण्याऐवजी मतदारसंघाची वाट लावली. आजच्या घडीला मतदारसंघात त्यांनी भ्रष्टाचाराला त्यांनी पाठबळ दिले. इथला उद्योग आणि व्यापार बंद पडले. त्यामुळे हजारो तरुण आज बेरोजगार झालेले आहेत. शेतकरी आणि कष्टकरी वर्गाचे बेहाल झालेले आपल्याला दिसेल.

हे सर्व चित्र आता बदलायचे असेल तर आता बदल घडवावा लागेल. मतदारसंघात ऊस उत्पादक शेतकरी संख्या जास्त आहे. असे असतांनाही येथील कारखानदारी जवळपास बंद पडला तर जमा आहे. इथली कारखानदारी संपुष्टात आणली. तुम्ही मला आमदार करा मी तुम्हाला कारखाना देतो. जो कारखाना कधीही बंद होणार नाही असे आश्वासन हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या जनसमुदायाला राजेभाऊ फड यांनी दिले.

# ऑनलाइन खरेदी टाळू आपली बाजारपेठ मजबूत करू-अमित घाडगे पाटील



परळी (प्रतिनिधी):- परळीची व्यापार पेठ एकेकाळी खूप मोठी व्यापार पेठ म्हणून प्रसिद्ध होती. दररोज लाखो रुपयांची उलाढाल मार्केटमध्ये होत होती. परंतु या बाजारपेठेला अनेक समस्यांनी ग्रासले आहे. ऑनलाइनच्या जमान्यात नागरिकांचा कल दिवसेंदिवस ऑनलाइन खरेदीकडे मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याचा फटका परळीच्या व्यापार पेठेला मोठ्या प्रमाणात बसत आहे. येथील व्यापाऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून अनेक व्यापाऱ्यावर उपासमारीची वेळ येत आहे. मोठे आर्थिक संकट त्यांच्यावर कोसळत आहे. परळी शहरातील व परिसरातील सुज्ञ नागरिकांनी ऑनलाईन वस्तू खरेदी ऐवजी बाजारपेठेत जाऊन वस्तू खरेदी कराव्यात असे आवाहन परळी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अमित घाडगे पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकात केले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात परळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित घाडगे पाटील यांनी म्हटले आहे की, परळीची बाजारपेठ एकेकाळी प्रचंड गजबजलेली असायची दररोज लाखो रुपयांची उलाढाल या व्यापार पेठेत होत होती. परंतु दिवसेंदिवस ऑनलाइन खरेदी करण्याचे फॅड नागरिकात निर्माण झाल्याने परळीच्या मार्केटवर मोठा परिणाम निर्माण झाला. परिणामी व्यापारी धंदा मंदावल्याने आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे नागरिकांनी ऑनलाइन खरेदी टाळून आपली बाजारपेठ मजबूत करू करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. कारण परळीचा व्यापारी अतिघाईच्या वेळी रात्री-अपरात्री दुकान उघडून मदत करत असतो. आपल्या सुख-दुः खात सहभागी होणारा, वेळेला मदतीला धावुन येणारा कोरोना सारख्या जागतिक महामारीच्या वेळी ऑनलाईन सेवा बंद असतांना आपल्या जीवाची पर्वा न करता सर्वांना सेवा देणारा आपला स्थानिक दुकानदारच होता. म्हणूनच कुटुंबा समवेत बाहेर पडा, बाजारपेठांमध्ये खरेदी करा, शहरातील बाजारपेठा मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करा .ऑनलाईन खरेदी करु नका असे आवाहन अमित घाडगे पाटील यांनी केले आहे.

## इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : रांजणगाव शेणपुंजी येथे क्लीप्टन वाईन शॉपच्या पाठीमागे बाभळीच्या झाडाला फेट्याच्या सहाय्याने देवीदास बाबुराव नरवाडे वय ४६ वर्ष, रा.थोरावा ता. वसमत जि. हिंगोली यांनी गळफास घेतल्याने त्यांना बेशुद्ध आवस्थेत घाटी रुग्णालयात दाखल केले असता , डॉक्टरांनी तपासुन मयत घोषीत केले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोह चौथे करीत आहेत.

## वृद्धेच्या गळ्यातील पोत हिसकावली

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : आंबेलोहळ येथील वृद्ध महिला हौसाबाई सोनवणे वय-८० या शेतात गवत कापण्याचे काम करीत असतांना अर्जुन रतन प्रधान वय-२१ वर्षे याने गळ्यातील अंदाजे ०२ ग्रॅम वजन असलेले डोरले हिसकावले. महिलेने मदतीसाठी आरडा-ओरडा करताच त्याठिकाणी उपस्थित असलेल्या नातेवाईकांनी पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या अर्जून प्रधान यास पकडून पोलिसांच्या हवाली केले. याविषयी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिवाजी जाधव यांचे निधन



कन्नड :- दि.२८ ऑक्टोबर - जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य व जिजामाता विद्यालय पिंपरखेडा येथील सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी काशिनाथराव जाधव यांचे अल्पशा आजाराने दि.२८ रोजी सकाळी १० वाजता निधन झाले त्यांचा अंत्यविधी पिशोर येथील स्मशानभूमी येथे झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, नातवंडे परिवार आहे. ते धर्मवीर संभाजी कर्मचारी शिक्षक पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांचे काका व सतीश जाधव पोलीस निरीक्षक यांचे वडील होत.

# मार्शल आर्ट कुंग -फु कराटे ग्रेड परीक्षेत ४२ विद्यार्थी उत्तीर्ण



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ ऑक्टोबर मिशन मार्शल आर्ट्स अँड वुशू कुंग- फु स्पोर्ट्स कराटे असोसिएशन इंडिया. यांच्या वतीने दि २७ ऑक्टोबर वार रविवार रोजी सारा गोकुळधाम सोसायटी चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या मार्शल आर्ट कुंग -फु कराटे ग्रेड बेल्ट परीक्षेत ४२ विद्यार्थी उत्तीर्ण.उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे खालील प्रमाणे नावे.

ग्रेड येल्लो बेल्ट - कु. सान्वी भुतेकर, समिका काळे, भुवनेश शंकरपेल्ली, अर्णव सरडे, वेदांत खंडाळकर,ग्रेड ऑरेंज बेल्ट- शरण्या पाठक, अद्विका होळकर, शांभवी पुजारी, सान्वी कबले, देवी गणगे, अनुश्री तर्टे, स्वाची लहाने,टीस्टा सिंग, अरणा गौतम, स्वनिका जैन, ओवी पाटील, जोहा सय्यद, महती पलानीकुमार, आधव पलानीकुमार, रिषीत वरुडकर, निहाल झुनझुनवाला, रियांश खेडकर, कैवल्य पाठक, सोहम बजाज, प्रणव गुळभिले, शाश्वत लहाने,भौमिक गुजराती, दीवित अग्रवाल .ग्रेड ग्रीन बेल्ट - अर्पिता पहाडे, ओजस्वी बारगजे, गौरी घुगे,नव्या दरगड, आर.अरुंधती, आहना प्रसाद, युवराज परकाळे ग्रेड ब्लू बेल्ट - श्राव्या यावले, स्वरूप बनकर, राजवर्धन भोळे.ग्रेड ब्राऊन बेल्ट प्रथम,द्वितीय - मानसी क्षीरसागर,ईस्मिता गाडगे,सान्वी पेडणेकर, विहान शरद.व ब्लॅक बेल्ट मधील अनुश्री घुगे,आश्लेषा रीडलोन, गजराज चावरिया, यशोधन घुगे यांनी मार्शल आर्ट मधील चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. या सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुने सचिन क्षीरसागर, (एस.टी महामंडळ छत्रपती संभाजीनगर चे विभाग नियंत्रक ) मिशन मार्शल आर्ट्स संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पवन घुगे, सचिव व मुख्य कराटे प्रशिक्षक प्रविण घुगे,सारा गोकुळधाम सोसायटीचे चेअरमन अशोक इंदुरकर, सचिव अभिमन्यू गणगे, निलेश देशमुख, सागर बजाज, यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ग्रेड बेल्ट व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षिका नंदा घुगे, राधा घुगे, कोमल राठोड, कराटे प्रशिक्षक शाम बुधवंत, गौरव टोकटे व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दीपोत्सवात विद्युत सुरक्षेला द्या प्राधान्य महावितरणचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : आनंदाचा व उत्साहाचे पर्व असलेल्या दिवाळीत विद्युत सजावट, रोषणाई तसेच फटाक्यांची आतषबाजी मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र हे करताना विद्युत सुरक्षेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सार्वजनिक विद्युत यंत्रणेसोबतच घरगुती रोषणाईच्या विद्युत उपकरणांपासून सावध राहावे. कोणत्याही प्रकारचा धोका न पत्करता दिवाळी साजरी करावी, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्युत वाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर आदी यंत्रणा उघड्यावर असल्याने फटाके फोडताना त्यापासून सुरक्षित अंतर ठेवावे. फटाक्यांच्या आतषबाजीत सार्वजनिक विद्युत यंत्रणेला आगीचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. रोहित्र, फ्यूज पेट्या, फिडर पिलर, रिंग मेन युनिटजवळ फटाके फोडू नयेत किंवा त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये अथवा तो जाळू नये. वीज वाहिन्यांना स्पर्श होईल किंवा धोका निर्माण होईल असे रॉकेटसारखे फटाके वाहिन्यांखाली उडवू नयेत. मोकळ्या जागेतच फटाके उडवावेत. विद्युत यंत्रणेला आग लागल्यास, धोका निर्माण झाल्यास, वीजपुरवठा खंडित झाल्यास महावितरणच्या २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटरच्या १८००-२१२-३४३५, १८००-२३३-३४३५ किंवा १९१२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा मंडल कार्यालयात दैनंदिन संनियंत्रण समिती कक्षास संपर्क साधावा. त्यांचे मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत : छत्रपती संभाजीनगर शहर मंडल - ७०६६०४२४१२, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडल - ७८७५७५६६५२.

दिवाळी साजरी करताना घरगुती विद्युत उपकरणांपासूनदेखील सावध राहावे. घराच्या किंवा इमारतीच्या रोषणाईसाठी दिव्यांची विद्युत माळ चांगल्या दर्जाची असल्याची खात्री करून घ्यावी. विद्युत माळेचे वायर, दिवे, सॉकेट दर्जेदार नसल्यास धोका निर्माण होऊ शकतो. घर किंवा इमारतीचे अर्थिंग योग्य असल्याची तपासणी करावी. घराबाहेर आकाशकंदील लावताना तुटलेल्या वायरचा वापर टाळावा किंवा तुटलेली वायर चांगल्या दर्जाच्या इन्सुलेशन टेपने सुरक्षित करून घ्यावी. घरगुती उपकरणांसह विद्युत माळेपासून सुरक्षित अंतरावर तेलाच्या वातीचे दिवे लावावेत. विद्युत सॉकेटवर अधिकचा भर टाकू नये. आकाश कंदिल किंवा दिव्यांच्या विद्युत माळेसाठी श्री पीनचा वापर न करता वायर्स थेट प्लगच्या छिद्रात आगपेटीच्या काड्यांच्या साह्याने खोचले जातात. त्यामुळे त्या प्लगमध्ये स्पार्किंग होऊन आग लागण्याची शक्यता असते. गॅलरीमधील लोखंडी जाळी किंवा घराचा लोखंडी जिना किंवा इतर कोणत्याही लोखंडी वस्तूपासून विद्युत दिव्यांची व आकाश कंदिलाची वायर दूर ठेवावी. ही वायर एकसंध असावी. तुटलेली किंवा सेलो टेपने जोडलेली नाही याची खात्री करून घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# चायनीज खाताय : सावधान अनेक आजारांना आमंत्रण



वाळूज महानगर (प्रतिनिधी): चायनीज पदार्थ सहज आणि स्वस्तात उपलब्ध असल्यामुळे ते खाण्याकडे बहुतेकांचा कल असतो. परंतु, चायनीज पदार्थ अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होतात. त्यात जिभेला चव येण्यासाठी जे अजिनोमोटो म्हणजे मोनोसोडियम ग्लुटामेट यांसारखे पदार्थ वापरले जातात. यामुळे पचनसंस्थेसह रक्तदाब वाढणे, डोके दुखणे, घाम येणे असे शरीराचे इतरही नुकसान करू शकतात.

### जेवण व्यवस्थित तर जीवन चुस्तीत

आपण दैनंदिन आहारामध्ये जर चायनिज, फास्ट फूड, किंवा अजिनोमोटो मिश्रित पदार्थ घेत असल्यास, स्थूलता , मधुमेह, रक्तदाब इत्यादी आजार होण्याचे संभाव्यता असते आणि तसेच असे जंक फूड खाल्ल्यास त्याचा मेंदूवर ही परिणाम दिसून येतो. रिसर्च नुसार असे दिसून आले आहे जे लोक जंक फूड खातात त्यांना विसरभोळेपणा, नैराश्य, चिडचिड पना व तसेच लैंगिक समस्या पण उद्भवतात. त्यासाठी आपला आहार सकस असावा.

**डॉ.विशाल आर. वाठोरे**
**मेंदू व मन विकार, व्यसन मुक्ती, सेक्स रोग तज्ञ.**

चायनीज पदार्थ आरोग्याला हानिकारक

चायनीज पदार्थांमध्ये शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च, कॉर्न, मोनोसोडियम ग्लुटामेट यांसारखे पदार्थ वापरल्यामुळे त्याचा पचनशक्तीवर ताण येतो. सोबत नूडल्स, चिकन किंवा मांस अर्धकच्चे शिजवले गेले तर पचायला हानीकारक ठरते. त्यामध्ये निकृष्ट दर्जाचे तेल आणि भाज्या वापरल्या जातात.

आरोग्यावर काय परिणाम होतो

मोनोसोडियम ग्लुटामेटच्या वापराने प्रक्रिया करायला आतड्यांना वेळ लागतो आणि टाकाऊ पदार्थ मूत्रपिंडांमार्फतच बाहेर टाकले जात असल्यामुळे मूत्रपिंडांच्या कार्यावर ताण येतो. सोबत हृदयाचे ठोके वाढणे, रक्त दाब आदी त्रास होतो.



या पदार्थांचा होतो वापर?

चायनीज पदार्थामध्ये अजिनोमोटो म्हणजेच मोनोसोडियम ग्लुटामेट, शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च, कॉर्न, नूडल्स, चिकन आणि तेल यांचा वापर होतो.

## परंपरेचा आणि सर्जनशीलतेचा सुंदर मिलाफ

अहमदनगर - फिनिक्स मार्केटसिटी पुणेने दिवाळी साजरी करण्यासाठी एक खास 'सागा ऑफ एन्सियंट फेदर्स नावाचा सुंदर उत्सव सुरू केला आहे. या उत्सवात परंपरेची, साहित्याची आणि कलेची सुंदर सादरीकरणं आहेत, ज्यामुळे मॉल मध्ये येणारे खरेदीदार, अभ्यागत आणि कला प्रेमींना एक अनोखा अनुभव देत आहे.या अप्रतिम सजावटीचा मुख्य भाग आहे 'द टाइमलेस क्विल, एक ३५ फुटांची भव्य मूर्ती. दोन पुरातन काळातील शाईपेने आकर्षक नक्षीकाम आणि मिरर मोज़ेकने सजवलेली आहेत, जी सर्जनशीलता आणि शब्दांची ताकद दर्शवणारे प्रतीक आहे. हे प्रकाशमान शिल्प हवेतील काव्यात्मक शब्द प्रकाशमय करीत आहे तसेच अभ्यागतांना त्यांच्या दिवाळीशी संबंधित प्रतीकांसह मंत्रमुग्ध करीत आहे.

## शक्ती पंप्स (इंडिया) लि.ची दमदार कामगिरी

नाशिक: शक्ती पंप्स (इंडिया) लि(एसपीआयएल) ने ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीच्या कामगिरीबाबत आनंद व्यक्त करताना शक्ती पंप्स (इंडिया) लि.चे अध्यक्ष दिनेश पाटीदार म्हणाले की,महसूलात आणि नफ्यात वाढीसह कंपनीसाठी आणखी एक अद्वितीय तिमाही निकाल जाहीर करताना अत्यंत आनंद होत आहे.यामुळे आर्थिक वर्षातील पहिली सहामाही देखील उल्लेखनीय ठरली आहे.आमची कामगिरी ही देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही क्षेत्रांमधील असलेल्या ऑर्डर्सच्या जलद अमंलबजावणीचा थेट परिणाम आहे.नफा क्षमतेमध्ये देखील लक्षणीय वाढ दिसली असून याचे श्रेय तिमाही दरम्यानच्या वाढलेल्या कामकाजामुळे अर्थव्यवस्थेतील व्यापकतेला जाते.

# बादशाहने शुजा गौहरला दिली दुसरी संधी, विशालला आपला निर्णय बदलावा लागला

छत्रपती संभाजीनगर - सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर शुभारंभ करण्यासाठी सज्ज आहे आणि प्रेक्षक देखील त्याच्या स्वागतासाठी तितकेच उत्सुक आहेत. या सीझनमध्ये बादशाह, श्रेया घोषाल आणि विशाल ददलानी हे तिघे परीक्षक या नात्याने देशातील अनोख्या आवाजाचा शोध घेताना दिसतील. काश्मीरहून आलेली शुजा गौहर एक असाच होतकरू स्पर्धक आहे आणि आपल्या जबरदस्त ऑडिशनने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सज्ज आहे.

त्याच्या ऑडिशन दरम्यान, परीक्षकांशी बोलताना शुजाने त्यांना विनंती केली की, तो जर ऑडिशनमध्ये उत्तीर्ण झाला नाही, तर त्याचा व्हिडिओ टेलिव्हिजनवर दाखवण्यात येऊ नये.

आपला इतिहास अपयशाने सुरू झाल्याचे पडद्यावर येऊ नये, अशी त्याची इच्छा होती. हे ऐकल्यावर बादशाहचे कुतूहल चाळवले आणि त्याने शुजाला त्याची कहाणी विचारली. शुजा म्हणाला, नऊ वर्षांपूर्वी मला एक मुलगी भेटली आणि आमच्यात संभाषण सुरू झाले. काही वर्षांनी, आम्ही रिलेशनशिप मध्ये होतो, तेव्हा एक दिवस तिच्या आईवडीलांना आमच्याबद्दल समजले आणि मग परिस्थिती अचानक बदलली. त्यांनी तिच्या बाबतीत फारच कडक धोरण स्वीकारले आणि तिचा फोनदेखील जप्त केला. त्यानंतर मी चंदीगडला गेलो. काही दिवसांनी मला समजले की, ती सुद्धा तिथेच जवळपास राहात होती, पण आम्ही भेटलो नव्हतो. मला मनोमन असे वाटते की, संगीतात मी जे काही करतो, ते आम्हा दोघांना जोडून ठेवते. आजचा परफॉर्मन्स देखील मी तिलाच समर्पित केला आहे.

ऑडिशनमध्ये शुजाने म्हटलेले पहिले गाणे होते, 'फितूर'. पण दुर्दैवाने तो परीक्षकांना प्रभावित करू शकला नाही. त्याच्या परफॉर्मन्सनंतर, विशाल नाराज झाला होता शुजाला उद्देशून तो म्हणाला, मी माझे प्रामाणिक मत सांगतो. तुझ्या प्रेमकहाणीत तुला रस असेल, पण आम्हाला नाही आहे. या शोसाठी तू अजून तयार नाहीस. मात्र काही वर्षात तू नक्की तयार होशील. तुझ्यात क्षमता आहे. पण अजून तू कच्चा आहेस.

इतिहास पाहिला, तर विशालचा निर्णय एकदा झाला की तो बदलत नाही, पण क्षणभराच्या शांततेनंतर बादशाहने शुजाला मोहित चौहानने गायलेले 'मसक्कली' गीत गायला सांगितले. विशाल चक्रावून गेला. पण ते गाणे उत्तम प्रकारे सादर करून शुजाने सर्व परीक्षकांचे मन जिंकून घेतले. विशाल तर फारच प्रभावित झाला. तो म्हणाला, जर तू हे करू शकत होतास, तर मग तू ते का केलंस? तू मला माझा निर्णय बदलायला भाग पाडत आहेस आणि ते मला आवडलेले नाही. मी एकदा निर्णय दिला की मग मागे हटत नाही. पण तुझ्या या परफॉर्मन्सने माझ्यासाठी काही पर्यायच ठेवला नाही! इंडियन आयडॉलच्या मंचावर येण्यास तू पात्र आहेस. दोस्ता, तुझा आवाज सुंदर आहे!

विशालने आपल्या सह-परीक्षकांचे आभार मानले की, त्यांनी शुजाला दुसरी संधी देऊन विशालला त्याचा निर्णय बदलण्यासाठी प्रभावित केले. शुजाला दुसऱ्यांदा गाण्याची संधी देण्याच्या बाबतीत बादशाहची अंतःस्फूर्ती खरी ठरली. दुसऱ्यांदा गाण्याची संधी मिळाल्यावर शुजाने इतका जबरदस्त परफॉर्मन्स दिला की, विशालच्या मनातील संदेह कुठल्या कुठे पळाला आणि बादशाहच्या मताशी तो सहमत झाला. ही दुसरी संधी गेम चेंजर ठरली.

# शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी फटाके स्टॉलला परवानगी नाकारा

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२८ ऑक्टोबर - शहरात मध्यवर्ती ठिकाणी बेकादेशीर पणे होलसेल व किरकोळ फटाके विक्री होत असून यावर कारवाई करत बंदी घालण्याची मागणी परवाना धारक फटाके विक्रेत्यांनी केली आहे.

परवानाधारक फटका विक्रेते कायेदेशीर बाबींची पुतर्ता करुन फटाका स्टॉल लावत असतांना शहारामध्ये, ठिकठिकाणी बेकायदेशीर पध्दतीने फटाका विक्री चालू असल्याने दिसून येत आहे. ती ठिकाणे खालील प्रमाणे असून आम्ही प्रशासणास विनंती करतो की, सदरील वेकायदा विक्री ठिकांणावर तात्पुरती बंद न करता त्यांनी माल ठेवलेल्या ठिकाणांवर गोदामावर दुकानातील मागील बाजू येथे छापे ठाकून कार्यवाही करावी जेणे करुन ह्या बेकायेदेशीर बाबी मुळासकट बंद होतील. शहरामध्ये साठे चौक परिसर, आंनदीबाई कोल्हे प्रबोधन सभागृह समोरील रोडवर, तसेच शहरातील दोन फटाका व्यापरी नागरीवस्तीत दुकानात कोणत्याही कायदेशीर बाबींची पुर्तता न करता खबरदारी न-घेता सदरील ठोक व किरकोळ फटाका विक्री करीत असून यावर कुठलीही कायदेशीर होताना दिसून येत नाही. या नागरी वस्तीत सुरु असलेल्या मोठे व्यापारी तसेच रस्त्याच्या कडेने हातगाडी वर बेकादेशीर फटाका विक्री करणाऱ्यांवर छापे टाकून कायदेशीर कार्यवाही महसूल प्रशासन व पोलिस प्रशासनाकडे करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर अरुण राऊत, युनूस शेख , पांडुरंग घोंगते , शैलेश आगलावे, रमेश हिरे, हरिचंद्र चव्हाण, सागर सोनवणे, राजू केवट आदींच्या स्वाक्षऱ्या आहे.

## तालुक्यातील निराधार, दिव्यांगांचा निधी आला

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२८ ऑक्टोबर - तालुक्यातील निराधार दिव्यांगांचा निधी आल्याने त्यांचा दिवाळी गोड झाला आहे. तालुक्यातील ९ हजार ७८१ विधवा, वृद्ध, निराधार व दिव्यांग

लाभार्थीचे चार कोटी ११ लाख ८४ हजार ४०० रुपयाचा निधी बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. कन्नड तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे चार हजार १४० लाभार्थी असून त्यांना प्रति महिना एक हजार ५०० रुपये निधी देण्यात येतो. त्यांचा एक कोटी ७९ लाख ८२ हजार ९०० रुपयाचे वाटप करण्यात आले तर श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या अंतर्गत तीन हजार ७६९ लाभार्थी येतात, यांना प्रति महिना एक हजार ५०० रुपये निधी देण्यात येतो, त्यांचा एक कोटी ६४ लाख ११ हजार ५०० रुपयाचा निधी वाटप करण्यात आले तर श्रावण बाळ राज्य निवृत्ती वेतन योजने अंतर्गत थेर डिबीटी द्वारे एक हजार ८७२ लाभार्थ्यांना ६७ लाख ९० हजार निधी वाटप करण्यात आल्याची माहिती तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी दिली आहे. यावेळी नायब तहसीलदार दिनेश राजपूत, अव्वल कारकून गणेश सवाई लिपिक सरफराज बेग हजर होते.

# ड्रोन व तत्सम उड्डाणांना मनाई

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका):- कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रोलाईट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स, हॉट एअर बलून इ. च्या उड्डाण क्रियांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये मनाई करण्यात आली असल्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी निर्गमित केला आहे. हे आदेश दि.३१ ऑक्टोबर ते ३० डिसेंबर २०२४ या कालावधीत लागू राहतील छत्रपती संभाजीनगर पोलिसांकडून हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या लेखी विशिष्ट परवानगीने कर ण्यात येणाऱ्या कारवाई यास अपवाद असेल.या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.


## भरधाव कारने दुचाकीला उडवले; दुचाकीस्वार जखमी

छत्रमती संभाजीनगर : रॉंग साइट आलेल्या भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला असुन दुचाकीचे देखील नुकसान झाले आहे. हा - अपघात १८ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊ वाजेच्यासुमारास बॅबहे हॉस्पीटन समोर झाला. प्रकरणात रेणुका शाम महाशब्द (३०, रा. द्वारकांदा नगर, एनआयटी परिसर) यांनी फिर्याद दिली, त्यानुसार, फिर्यादी यांचा भाऊ फिर्यादीच्या दुचाकीने (एमएच-२०-एफव्ही-९३८३) बाळापुर फाटय कडे मित्राला भेटण्यासाठी जात होते. बेबडे हॉस्पीटल समोर रॉंग साईट आलेल्या भरधाव कारच्या (एमएच-१४-केबी-६३६८) चालकाने कार निष्काळजी पणे चालवून दुचाकीला धडक दिली. अपघातात फियांदीचा माऊ जखमी झाला असून दुचाकीचे देखील नुकसान झाले आहे. प्रकरणात सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दिवाळीत खाद्यतेल दरवाढीचा उडाला भडका

छत्रपती संभाजीनगर : दिवाळीमध्ये खाद्यतेलाचा वापर अधिक असतो. केंद्र सरकारने कच्च्या व रिफाइंड खाद्यतेलावरील मूळ आयात करात २० टक्क्यांनी वाढ केली आहे. त्यामुळे खाद्यतेलाच्या दरात प्रति लिटरमागे २० ते ३० रुपयांची वाढ झाली आहे. या दरवाढीचा फटका दिवाळीच्या फराळाला बसणार आहे. ऐन दिवाळी सणापूर्वी खाद्यतेलासह धान्य, कडधान्य, डाळी, साखर, रवा, मैद्याच्या दरात वाढ झाली आहे. दरवाढीमुळे ग्राहकांच्या खिशाला कात्री बसत आहे. गरिबांना दैनंदिन दोनवेळचे अन्न पोटभर मिळेनासे झाले असताना सणासुदीलाही गोड धोडापासून वंचित राहावे लागणार आहे. सुरुवातीला १०५ ते ११० रुपये लिटर तेलाच्या पिशवीचा दर होता. मात्र, आता त्याच पिशवीला १४० ते १४९ रुपये मोजावे लागत आहेत. किलोमागे २० ते ३० रुपयांची दरवाढ झाली आहे.

## आता सनशाईन हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य सेवा उपलब्ध



छत्रपती संभाजीनगर- बीड बायपास रोडवरील सनशाईन हॉस्पिटल येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्यसेवा प्रदान करण्यास प्रारंभ केला आहे. या योजनेचा उद्देश गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध करणे हा असल्याचे हॉस्पिटलच्या वतीने सांगण्यात आले.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंतर्गत १५,००० पेक्षा जास्त आजारावरील उपचारांवर शंभर टक्के अनुदान उपलब्ध आहे. यामुळे नागरिकांना उपचारासाठी अधिक खर्च करावा लागणार नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना केवळ नोंदणी प्रक्रियेत सहभागी व्हावे लागणार आहे. सर्वसमावेशक आरोग्य: दारिद्र्यरेषेखालील आणि वरील कुटुंबांनाही गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे. आर्थिक भार कमी करणे, महागड्या उपचारांमुळे होणारा आर्थिक भार कमी करून, रुग्णांना आर्थिक सुरक्षा प्रदान करणे, आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवणे, ग्रामीण आणि शहरी भागात आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवून, आरोग्य सेवांना सर्वसमावेशक बनवणे हे या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील तसेच मराठवाड्यातील गरजू रुग्णांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सनशाईन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.